
# आनंदलहरी

## चांदणे कैवल्याचे



॥ श्री गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ॥

# चांदणे कैवल्याचे

## प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने


संकलन

**श्री. गोपाळ गोडसे**

संपादन

**डॉ. सौ. माधुरी पणशीकर**



प्रकाशन

**श्री भगवती प्रकाशन**

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रकाशन दिवस**
विजयादशमी
गुरुवार
आश्विन शु. १०
शके १९१६
१३ ऑक्टोबर १९९४

**मुखपृष्ठ**
आमोद दामले

**मुद्रक**
अरुण नाईक
अक्षर प्रतिरूप प्रा. लि.
वडाळा,
मुंबई ४०० ०३१

**प्रकाशक**
श्री भगवती प्रकाशन
६/१, साईविहार
कर्वेनगर, पुणे-५२

**किंमत रु. २५**

# अनुक्रम

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | नऊ |
| १. | एक तरी ओवी अनुभवावी | १ |
| २. | आरती पंचायतनाची | २७ |
| ३. | चित्तशुद्धीची पराकाष्ठा | ५३ |
| ४. | सर्वे सन्तु निरामया: | ६० |
| ५. | बुद्धि दे रघुनायका | ७४ |
| ६. | गुण गाईन आवडी | ८२ |
| ७. | लोकभिरामं श्रीरामं भूयोभूयो नमाम्यहं | ११० |
| ८. | सर्वेऽपि सुखिन: सन्तु | १२५ |
| | परिशिष्टे | १३५ |


## आगामी प्रकाशने

द्विसाहस्त्री - भाग २
श्रीकृष्ण चरित्र
श्रीदेवी भागवत



**प. पू. दत्तमहाराज, खर्डा, १९४८**

*छायाचित्र: श्री. अशोक कवीश्वर यांच्या सौजन्याने*








प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञानअंधार निरसी।
जीवात्मया परमात्मयासी। ऐक्यता कारी ।।
विघडले देव आणि भक्त। जीव शिवपणें द्वैत।
तया देवभक्ता येकांत। करी तो सद्‌गुरु ।।

जेथें सारासार विचार। तेथ होय जगोध्दार।
नवविधाभक्तीचा आधार। बहुत जनांसी ।।
म्हणोनी नवविधा भजन। जेथे प्रतिष्ठिलें साधन।
हें सद्‌गुरूचें लक्षण। श्रोतीं वोळखावे ।।

तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।
नानासाधने समर्था। सद्‌गुरूपासीं ।।
अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान। बाह्य निष्ठेचे भजन।
तेथे बहु भक्त जन। विश्रांति पावती ।।

# श्री सद्‌गुरु मांदियाळी




श्री दत्तात्रेय



पू. श्रीपादश्रीवल्लभ



पू. नृसिंह सरस्वती



पू. वासुदेवानंद सरस्वती


।। गुरो तुझी ही पदवारीधारा। धुवो सदा कायिक दोष सारा ।।

ओम् नमो सद्गुरु तूं ज्योतिषी। एकात्मतेचे घटित पाहसी।
चिद्ब्रह्मेंसी लग्न लाविशी। ओम् पुण्येंसीं तत्वतां॥
वधूवरां लग्न लाविती। हें देखिलें असे बहुतीं।
आपुली आपणा लग्नप्राप्ती। हे अलक्ष्य गती गुरुराया॥


ओम् नमो सद्गुरु धन्वंतरी। ज्याची दृष्टीचि निरुज करी।
त्यावांचोनि संसारीं। भवरोगु दुरी न करवे।
ज्या भवरोगाचेनि दर्पें। फुंफात तापलीं त्रिविधतापें।
'मी माझें' येणें संकल्पें। वाग्जल्पें जल्पती॥

जय जय सद्गुरु परम। जय जय सद्गुरु पुरुषोत्तम।
जय जय सद्गुरु परब्रह्म। ब्रह्मा ब्रह्मनाम तुझेनी॥
जय जय सद्गुरु चिदैक्यस्फूर्ती। जय जय सद्गुरु चिदात्मज्योति।
जय जय सद्गुरु चिन्मूर्ती। मूर्तामूर्ती चिद्रूप॥


## श्री सद्गुरु मांदियाळी



पू. लोकनाथतीर्थ स्वामी



पू. दीक्षित स्वामी



पू. गुळवणी महाराज



पू. धुंडिराज महाराज

॥ सदैव माझे मन वाणी शुध्द। करो तुझे नाम पवित्र सिध्द॥

ओम् नमो जी श्रीगुरुराया। म्हणोनि सद्भावें लागें पायां।
तवं मीपण गेलें वायां। घेऊनियां तूंपणा ॥
नवल पायांचें कठिणपण। वज्रें न तुटे लिंगदेह जाण।
त्याचेंही केलें चूर्ण। अवलीळा चरण लागतां ॥

ओम् नमो श्रीगुरु शिवशिवा। नमनें जीवत्व जीवा।
नुरविसी, तेथें देहभावा। कैसेनि रिघावा होईल ॥
जीवें घेऊनि जीवा। देहत्व मोडूनि देहभावा।
याहीवरी करविसी सेवा। हें लाघव देवा नवल तुझें ॥

एवं स्वस्वरूप द्यावयासी। उदारत्व तुजपासीं।
हें न ये गा आणिकांसी। हृषीकेशी कृपाळुवा ॥
तो तूं परम उदार ऐसा। राया रंका समभावें सरिसा।
भावो तेथ भरंवसा। तू आपैसा आतुडसी ॥



प. पू. ताईमहाराज चाटुफळे

‘जागृती’ जागे तुझेनि हरिखें। ‘स्वप्न’ स्वप्ना तुझेनि देखे।
‘सुषुप्ती’ सुखावे जेणें सुखें। पूर्ण संतोखें तुझेनि ।।
मी जे जे ‘विषय’ भोगीं। तें भोक्तेपण तुझे अंगी।
तुझेनि निजसंयोगीं। मी पणें जगीं वर्तविशी मज ।।

सुखेंचि तुझें नाम घेतां। घातु करिसी जीविता।
जीवु घेऊनि तत्त्वतां। होसी सर्वथा कृपाळू ।।
तुझे नामाचें प्रबळ बळ। माथा नुधविती कळिकाळ।
चारी मुक्ति केवळ। होती निश्चळ निजदासी ।।

आतां सद्‌गुरु वर्णवेना। जेथे माया स्पर्शो सकेना।
ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ।।
न कळे न कळे नेति नेति। ऐसें बोलतसे श्रुती।
तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठे ।।

॥ श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः ॥

# दीपस्तंभ

प्रकाशाकडे जाण्याची ओढ माणसाच्या मनातल्या सनातन अंधाराला सतत लागलेली आहेच. लौकिक जीवनात-वासनांचे थैमान चालू असतेच. त्यातून बाहेर काढून मंगलमय, उदात्त जीवनाकडे जीवाला घेऊन जाणाऱ्या श्रीगुरुंचे माहात्म्य परमार्थाच्या मार्गातले वारकरी जाणतात. ‘गुरुर्साक्षात् परब्रह्म’ ह्या शब्दात श्रीगुरुंचे अत्युच्च स्थान नि:संदिग्ध शब्दात मांडलेले दिसते. लिंगदेहाची गाठ सोडविणारे, भवसागरातून बोट धरून पैलतीराला नेणारे श्रीगुरुंच्याशिवाय कोण आहे? त्यांच्याविषयी उत्कट भक्तीभाव असणाऱ्यांना ठाऊक आहेच की आपल्या प्रत्येक श्वासावर त्यांचा अधिकार आहे, प्रत्येक शब्दाचे ते सूत्रधार आहेत. इतकेच नाही तर आपल्या आजूबाजूच्या प्रत्येक कणातून केवळ त्यांचेच अस्तित्व ओसंडून वहाते आहे.

आज विजयादशमीला त्यांनीच प्रेरीत केलेला शब्दफुलांचा हा हार त्यांच्या श्रीचरणांवर अर्पण करतांना मनात भावोर्मी दाटून आल्या आहेत. ही शब्दपूजा त्यांनी स्वीकारावी अशी मन:पूर्वक प्रार्थना!

तुकाराममहाराजांनी ‘शुध्द बीजापोटी। फळे रसाळ गोमटी’ म्हटले आहे. अनेक संतचरित्रांच्या परिशीलनातून ह्या उक्तीची यथार्थता जाणवते. समर्थ रामदासांच्या घराण्यात एकवीस पिढ्या

रामभक्तीची परंपरा होती. श्री एकनाथांचे वडील आजोबा विठ्ठलभक्त होतेच पण पंढरपूरचा विठोबा त्यांच्या पणजोबांनी दक्षिणेतून परत पंढरपूराला आणल्याचीही कथा आहे. म्हणजे त्यांच्याही कितीतरी पिढ्या विठ्ठल भक्तीत एकरूप झाल्या होत्या. ज्ञानेश्वरादि भावंडांचा जन्म विरक्तीची माळ गळ्यात घालूनच झालेला दिसतो. ज्या महाराष्ट्राची माती अशा उज्वल संतपरंपरेने पवित्र झाली त्याच मातीत मांगल्य, उदात्तता उराशी बाळगणाऱ्या कवीश्वर घराण्याची परंपरा जन्माला आली. कवीश्वर ईश्वरभक्त आहेत. त्यांच्या अनन्य साधारण ईश्वरभक्तीच्या कितीतरी आठवणी जनमानसात स्थिरावलेल्या दिसतात. प. पू. दत्तमहाराजांच्या आजोबांचा वक्रतुंड महाराजांचा भक्तीभाव बघून 'राजूर' येथील श्रीगणेशाची मूर्ती त्यांनी आणलेले अन्न खाऊन तृप्त झाल्याची कथा अनेकांना ठाऊक आहे. प. पू. महाराजांच्या देवात एक गणपतीची मूर्ती आहे. त्याविषयी श्री. अशोक कवीश्वरांनी सांगितलेकी ती मूर्ती त्यांच्या पणजोबांच्या आजोबांना मिळाली. त्यांना दृष्टान्त झाला. स्वप्नात श्रीगजाननाने सांगितले की 'मोरगावला शमीच्या वृक्षाखाली मी आहे, मला घेऊन जा? आजोबांनी हलक्या हाताने शमी वृक्षाखालची माती उकरली. तिथे ती गणपतीची सुंदर मूर्ति त्यांना मिळाली. कवीश्वर घराण्यात मोरया गणपतीची उपासना किती वर्षे चालू आहे हे बघण्यासाठी इतक्या सुदूरच्या भूतकाळाशी नाते जोडावे लागते. प. पू. वक्रतुंडमहाराजांची अनेक अपत्ये गेली. त्यांची उदासीनता पाहून श्री. गोविंद स्वामींनी दत्तूबाळाची मूर्ती त्यांना दिली. आजही ती मूर्ती प. पू. दत्तमहाराजांच्या देवपूजेत आहे. त्यानंतर



प. पू. वक्रतुंडमहाराजांना झालेले अपत्य म्हणजे प. पू. धुंडिराज महाराज! श्री. अशोक कवीश्वर यांनी सांगितले की त्यांच्या पणजीबाई दत्तूबाळाची तेलाने टाळू भरत असत. त्याला नवेनवे कपडे करत असत. पाळण्यात घालून अंगाई म्हणत आणि पहाटे भूपाळी म्हणून उठवत. प. पू. वक्रतुंड महाराज दत्तूबाळाची मूर्ती सदैव आपल्याजवळ बाळगत. एकदा कसा कुणास ठाऊक दत्तूबाळ हरवला. वक्रतुंड महाराज अतिशय अस्वस्थ झाले. त्या दिवशी ते जेवले तर नाहीतच पण पाणीसुद्धा प्यायले नाहीत. मध्यरात्री कोणाला तरी दत्तूबाळ सापडला. प. पू. वक्रतुंड महाराजांचे डोळे आनंदाने भरून आले. त्यानंतर त्यांनी आंघोळ, पूजा केली आणि मग अन्नग्रहण केले. वक्रतुंड महाराज भागवत, रामायण, महाभारत सांगत गावोगाव हिंडत असत. त्यांच्या भक्तीरसपूर्ण प्रवचनांनी अनेकांचे कान तृप्त झाले. एकदा ते फिरत फिरत खर्ड्याला आले. आणि गावाबाहेर कृष्णमंदिरात उतरले. देवळात झाडलोट करावी, पाणी भरावे असे त्यांनी सात-आठ दिवस शांतपणे काम केले. तिथे एका विद्वान व्यक्तीचा भागवत सप्ताह होणार होता. पण परमेश्वराची इच्छा काही निराळीच होती. ते प्रवचनकार काही कारणानी येऊ शकले नाहीत तेव्हा 'आम्ही ही सेवा केली तर चालेल का?' असे गावाच्या प्रमुखांना नम्रपणे वक्रतुंड महाराजांनी विचारले. त्यांच्या होकार येताच अत्यंत आनंदाने त्यांनी तिथे भागवत-सप्ताह केला आणि गावाचे मन जिंकून घेतले. तहानलेल्या चातकाने वर्षाऋतूची वाट पहावी त्याप्रमाणेनंतर दरवर्षी वक्रतुंड- महाराजांच्या वाटेकडे खर्डेकर डोळे लावून बसू लागले. खर्ड्याची भूमी त्यांच्या अमृतवाणीत

भिजून गेली. आपल्या आजोबांच्या पावलांनी पुनीत झालेल्या त्या गावात प. पू. दत्तमहाराज आवर्जून-जात असत. प्रवचनही करत असत.

अशा शास्त्रशुध्द आचारसंपन्न ज्ञाननिष्ठ कवीश्वरांच्या घराण्यात २ मार्च इ. स. १९१०, माघ वद्य षष्ठी, शके १८३१ ला प. पू. दत्तमहाराजांच्या रूपाने एक पुण्यात्मा जन्माला आला. दुपट्यात गुंडाळलेल्या त्या बालजीवाकडे बघून, 'काय, वक्रतुंड महाराज, आपण आलात?' असे उद्‌गार प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांनी काढले आणि फक्त अन्नमय कोष बदलून कोणती विद्वत्ता आपल्या पोटी जन्माला आली आहे ते प. पू. दत्तमहाराजांच्या मातोश्रींना समजले.

अनेक संतांच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या नरसोबाच्या वाडीला कृष्णानदीच्या तीरावर प. पू. महाराजांच्या बाल मनावर ज्ञानाचे उत्तम संस्कार त्यांचे गुरु पू. श्री दीक्षित स्वामी महाराजांनी केले. ते संस्कार ग्रहण करून मूळातच लखलखीत असलेली महाराजांची बुध्दी न्यायमीमांसादि विविध ज्ञान शाखातले ज्ञान आत्मसात करण्यासाठी अधिकच स्वीकारशील झाली. तिथेच गुरुंच्या साक्षेपी नजरेखाली प. पू. महाराजांचा पहिला भागवत सप्ताह झाला. महाराजांच्या शुध्द शब्दोच्चारांनी गुरुंचे अंत:करण प्रसन्नतेने बहरले. त्यांनी आपल्या शिष्याचा कीर्ती-सुगंध सर्वत्र दरवळेल असा आशीर्वाद देऊन स्वहस्ते त्यांना शाल पांघरली आणि चांदीचे फुलपात्र संध्या करण्यासाठी दिले. अजूनही त्या वस्तू भावोत्कट वृत्तीने महाराजांनी जपून ठेवल्या आहेत.

माघ वद्य चतुर्थीला १९३० मध्ये वाडीकरांच्या अंगणात प. पू.



महाराजांचा विवाह शालीन, सुशील, आणि नावाप्रमाणेच सुंदर असणाऱ्या कु. सुंदर पाठकशी झाला आणि सुंदरच्या सौ. लक्ष्मीबाई दत्तात्रेय कवीश्वर होऊन त्यांनी माप ओलांडून कवीश्वरांच्या घरात प्रवेश केला. तेव्हा त्या होत्या अवघ्या बारा वर्षांच्या आणि महाराज होते वीस वर्षांचे. (ती. सौ. ताई-महाराजांनी सांगितले की सौ. आईसाहेबांना 'सौ. भक्तीलक्ष्मी' असे म्हणा. कारण (बुध. २८ सप्टेंबर १९९४) पहाटे पुण्याला त्या साधना करत असतांना, सौ. आईसाहेबांची पावले पांघरुणाबाहेर येऊन पावलातली जोडवी त्यांना दिसली. ती विलक्षण तेजाने झळाळत होती. तेव्हा सौ. ताईंच्या मनात 'ही वैभवलक्ष्मी आहे' असा विचार आली तेवढ्यात एक आवाज उमटला 'वैभव लक्ष्मी नाही भक्ती-लक्ष्मी म्हणा. कारण भक्ती असेल तर सर्व काही आहे') तेव्हापासून आजपर्यंत सौ. आईसाहेबांनी हसतमुखाने प्रपंच सांभाळला. नुसताच सांभाळला नाही तर घरात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जीव लावला. वास्तविक पहाता महाराजांकडे दिवसाच्या कोणत्याही प्रहरी माणसे येत असतात. पण सौ. आईसाहेब अत्यंत आनंदाने सर्वांचे स्वागत करतात, त्यांच्या सर्वांगावरून तो आनंद नुसता ओसंडून वहात असतो.

१९३५ नंतर प. पू. महाराजांचे वास्तव्य पुण्यात झाले. त्याच्याआधी शिक्षणाच्या निमित्ताने ते धारवाडला होते. व्याकरण, मीमांसा आणि न्याय शाखेत त्यांनी विशेष नैपुण्य संपादन केले.

सुखदु:खाचे अनेक आघात सहन करत अंतर्मुख वृत्तीने

चाललेल्या महाराजांच्या जीवनप्रवाहात विवेक आणि संयम हे दोन खुंट अगदी बळकट असल्याने दिसते. त्यांचा एक मुलगा चार वर्षांचा होऊन गेला, मुलगी चि. शोभा १९५७ मध्ये गेली. मुलांच्या मृत्यूचा तीव्र आघात पचवून त्यांनी मन स्थिर ठेवले. चि. शोभाच्या मृत्यूंतर वर्षभरातच कामकोटीच्या श्रीमद् शंकराचार्यांकडून विद्वत्तेचा गौरव करणारे सुवर्ण कंकण त्यांना मिळाले. पण दु:खाच्या लाटेत वाहून न गेलेले महाराज, सुखाच्या लाटेतही अविचलितच राहिले.

**'दक्षिण-उत्तर मारुता। मेरु जैसा पांडुसुता।**
**तैसा सुखदु:ख प्राप्ता। मध्यस्तु जो ॥'**

असे ज्ञानी पुरुषाचे ज्ञानेश्वरांनी केलेले वर्णन इथे आठवते.

स्वत:विषयी कधीच आणि काहीच न बोलणाऱ्या महाराजांचा शोध जितक्या तीव्रपणे व्याकुळतेने आपण घ्यावा तितके ते आपल्या हातातून निसटून जातात. त्यांची ओळख करून घेणे म्हणजे अमर्याद आकाशाची मर्यादा आपल्या चिमणीच्या डोळ्यांनी न्याहाळण्यासारखे आहे. पण क्वचित कधीतरी एखादी हृद्य आठवण ते सांगतात. गतवर्षी गुरूद्वादशीला वाडीला एका रम्य संध्याकाळी चि. रोहित मुजुमदार, आणि मी देवाच्या कट्ट्यावर बसलेल्या महाराजांना नमस्कार करून बाजूला उभे राहिलो. महाराजांनी पटकन् विचारले, 'काय देवाला प्रदक्षिणा वगैरे घालता की नाही?' उत्तरादाखल आमच्या माना खाली गेलेल्या पाहून ते म्हणाले, ''घालाव्या प्रदक्षिणा. पुण्य मिळतं त्यांनी. आमच्या मातोश्री रोज पाचशे प्रदक्षिणा घालायच्या.



त्यांची अडचण असली म्हणजे आम्हाला सांगायच्या. मग आम्ही प्रदक्षिणा घालायचो. त्या पुण्यकर्माचं त्यांना फळ मिळालं.''

--मी महाराजांकडे बघत होते. त्यांचे डोळे वर्तमानात नव्हतेच. बालपणीच्या गुहेत ते उत्कटतेने शिरले होते. मातोश्रीच्या आठवणीचा आनंद त्यांच्या चेहण्यावरून पाझरत होता. त्या भावमग्न स्थितीत त्यांना नमस्कार करून, आमची पावले प्रदक्षिणा घालायला लागली.

महाराज मातृभक्त आहेत. त्यांच्या आई वृत्तीने मोठ्या धार्मिक होत्या, रोज ओलेत्याने देवपूजा करण्याचा त्यांचा नेम होता. इ. स. १९६९ मध्ये माघ पौर्णिमेला सुलतानपूर इथे त्या समाधीस्थ झाल्या.

ह्या वर्षी देऊळगाव राजा इथे प. पू. महाराजांची रौद्री शांती झाली. तिथे श्री. जगनशेट धन्नवतांनी प. पू. महाराज आणि त्यांच्या मातोश्रींच्या संदर्भात एक विलक्षण गोष्ट सांगितली. ते म्हणाले की एकदा छोट्या उत्सवास मोठ्या आईसाहेबांनी त्यांना भाजी आणायला सांगितली. त्यांनी २५/३० माणसांना पुरेल एवढी भाजी आणली. प्रत्यक्षात मात्र चार-पाचशे माणसे आली. तेव्हा मोठ्या आईसाहेबांनी प. पू. दत्तमहाराजांना बोलावले. महाराज आले, त्यांनी देवाचे नाव घेऊन असलेल्या अन्नावर प्रोक्षण केले आणि तयार असलेल्या स्वयंपाकात सर्व माणसे सहज जेवून गेली.

आजच्या विज्ञानाचा जबरदस्त पगडा असलेल्या आधुनिक युगात अशा चमत्कारावर कोणी विश्वास ठेवणार नाही. कारण डोळ्यांनी दिसते तेवढेच असते, असे आज मानले जाते. पण

दृष्टीगोचर नसलेल्या शक्ती असू शकतात. विश्वात्मक मनाला त्या शक्ती समजू शकतात. मात्र त्या शक्ती अंकित झाल्या तरी संत पदोपदी चमत्कार करत नसतात. कारण त्यांचा भर वैचारिक परिवर्तनावर अधिक असतो. संतांच्या चरित्रात चमत्काराच्या गोष्टी नेहमीच येतात. त्या संदर्भात एकदा महाराजांना विचारले असता ते म्हणाले, ''ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली हा आपल्याला चमत्कार वाटतो. पण त्यांच्या दृष्टीने ती सहज गोष्ट होती. सर्वत्र केवळ चैतन्यच आहे म्हटल्यावर अशक्य काय आहे?''

अनेक वेळा आश्रमात एक दृश्य बघितले आहे. संध्याकाळी काही अभ्यासक महाराजांच्या जवळ बसून वाचत असतात. महाराजांच्या हातात पुस्तक नसूनही वाचणारे अडले की पुढचा श्लोक महाराज पूर्ण करतात. महाराजांना सर्वच कसे पाठ असते असा अचंबा मनाला वाटतो. ह्या संदर्भात गुरुदेव रा. द. रानडे यांची एक गोष्ट सांगतात. एकदा ते तत्त्वज्ञानाचे इंग्रजी पुस्तक वाचत होते. त्यातला विचार त्यांना पुरेसा निटपणे उलगडत नव्हता. दुसऱ्या दिवशी काहीशा अस्वस्थ मन:स्थितीत ते आपले गुरु उमदीकर महाराज यांचेकडे गेले. गुरुमाऊलीने त्यांच्या अस्वस्थपणाचे कारण विचारले त्यांनी ते सांगताच, महाराजांनी त्यांच्याकडे पुस्तक मागितले. पुस्तक इंग्रजीत होते आणि त्यांना इंग्रजी येत नव्हते. म्हणून रानडे यांना काय करावे ते कळेना. पण त्यांनी पुस्तक दिले. उमदीकर महाराजांनी ते पुस्तक वाचून गुरुदेव रानडे यांच्या शंकांना नीट उत्तरे दिली. त्यावर 'आपल्याला तर इंग्रजी येत नाही मग आपण हा खुलासा कसा केलात? असा प्रश्न रानडे यांनी विचारला. महाराज हसले आणि म्हणाले, ''भाषा



कोणी निर्माण केल्या? देवाने ना? मग ज्याने कारण जाणले त्याला कार्य जाणणे अवघड आहे का?'' ह्या प्रसंगातून आपल्या मनात नक्कीच एक सुसंगत चित्र तयार होते. आणि शंकेचा उलगडाही होतो.

१९५४ मध्ये परिव्राजकाचार्य टेंबे स्वामी महाराजांच्या समग्र ग्रंथांचे प्रकाशन त्यांनी केले. त्यासाठी किती परिश्रम करावे लागले असतील, बारीक वाचन करावे लागले असेल तथापि महाराज याविषयी मौन पाळून असतात. त्या परिश्रमात असणारा एक बौद्धिक, भावनिक आनंदही त्यांनी भरभरून अनुभवला असेल. हे सर्व काम चालू असतांना महाराजांनी दाढी केली नव्हती. अशी हकीगत सौ. सुलभाताईंच्याकडून समजली.

कृष्णगुणगान हा प. पू. महाराजांच्या विशेष आवडीचा विषय आहे. अनेक भागवत सप्ताह महाराजांनी केले. भगवान श्रीकृष्णांच्या लीला, त्यांचे कर्तृत्व, त्यांचे भक्तवासल्य भरभरून त्यांनी लोकांपुढे मांडले. कृष्ण कथांचा अन्वय लावताना ते रंगून जातात. एकदा 'मामेकं शरणं व्रज'चे विवेचन करतांना द्रौपदी वस्त्र हरणाची कथा त्यांनी सांगितली. ते म्हणाले, ''हातात साडी धरून ती जोवर त्याचा धावा करत होती. तोवर श्रीकृष्णांनी वस्त्र पुरविले नाही पण दोन्ही हात सोडून देऊन फक्त त्याच्यावर भरवसा ठेवून ती उभी राहिली तेव्हा मात्र तिच्या हाकेला कृष्ण धावून गेले. म्हणजे सर्वस्वी शरण आलेल्यालाच भगवंत आपला म्हणतात'' ईश्वराला शरण जाणे म्हणजे काय याचा आणखी खुलासा करण्याची आवश्यकताच नाही. महाराजांच्या अंतर्यामी असणाऱ्या कृष्णभक्तीची अत्यंत रम्य आणि हृद्य अशी बाह्य खूण

काही जणांनी सांगितली. ती अशी की काही मुंबईकर मंडळी महाराजांबरोबर पश्चिम यात्रेला गेली होते. 'श्यामलाजी' स्थान जसजसे जवळ येऊ लागले तसतसे महाराजांचे डोळे निळे निळे, कृष्ण-श्यामल होऊ लागले. ज्ञानेश्वरांच्या 'धनु वाजे घुणघुणा' ह्या विरहगीतात कृष्ण विरहाने व्याकुळ झालेली प्रेयसी शेवटी म्हणते,

**'दर्पणी पाहतां रूप न दिसे वो आपुले**
**बापरखुमादेवीवरे मज ऐसे केले'**

म्हणजे ती इतकी कृष्णमय झाली आहे की आरशात डोकावते तेव्हा तिला स्वत:चे प्रतिबिंब न दिसता, कृष्णच दिसतो. प. पू. महाराजांची त्या विरहिणीप्रमाणे असणारी तन्मयता त्यांचे डोळे श्यामल करून गेली.

मला नेहमी वाटते की महाराजांनी साधना केव्हा आणि कशी केली असेल? त्या उत्कट भावतंद्र वृत्तीत अंतर्बाह्य भिजलेले महाराज कधी बघायला मिळतील का? भावसमाधीच्या प्रशांत अवस्थेतली त्यांची स्तब्धता ज्या क्षणांमध्ये दाटलेली असते ते क्षण आपल्याला कधी पकडता येतील का? प. पू. महाराजांची अशी काहीशी स्थिती काही भाग्यवंतांना बघायला मिळाली आहे. एकदा हरिहरेश्वरला श्री. नागले यांचेकडे महाराजांचा मुक्काम होता. मोठ्या बंगल्यात महाराज आतल्या खोलीत होते. इतर मंडळी इकडे तिकडे पांगलेली होती आणि महाराज काय करत आहेत, त्यांना काही हवे आहे का अशा विचाराने श्री. नागले त्यांच्या खोलीत गेले.

आणि एका विलक्षण दृष्याने ते शांत उभे राहिले. 'नारायण,



दत्तात्रेय' असा गंभीर ध्वनी त्या खोलीत भरून वहात होता. त्यांनी महाराजांकडे बघितले, महाराजांचे डोळे मिटलेले होते आणि ओठ हलत नव्हते. त्यांच्या श्वासोश्वासाची लय पकडून 'नारायण, दत्तात्रेया'ची धून लहरत होती.

प. पू. महाराजांची साठी शांती गुरुमहाराजांच्या अधिपत्या-खाली झाली. १९९० मध्ये सहस्त्र चंद्रदर्शन सोहळाही पुण्यात मोठ्या उत्साहाने पार पडला. वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांनी याग केले. चर्चा-प्रवचनं कीर्तनं झाली. प्रचंड अन्नदान झालं. सवत्स-धेनू दान करून महाराज अंतर्यामी समाधान पावले. १९८६ मध्ये 'वामननिवासा'ची भव्य वास्तू बांधून परिपूर्ण झाली. आपल्या गुरुंच्या नावे वास्तू उभारून ते कृतार्थ झाले.

ह्याच वास्तूत १९९३ च्या रामनवमीला स्त्रीया-मुलांसाठी 'श्रीतुळजाभवानी आरोग्यधाम' महाराजांनी सुरु केले. आपल्या-कडच्या धार्मिक संप्रदायांकडे समाजोपयोगी विधायक कार्य करण्याची दृष्टी नाही अशी टीका अनेक वेळा केली जाते. संत केवळ 'टाळकुटेपणा' करतात असाही आरोप केला जातो. ह्या संदर्भात प. पू. महाराजांचे हे कार्य विशेष लक्षणीय ठरले आहे. हे हॉस्पिटल सर्व सामग्रींनी सुसज्ज असून आयुर्वेद, होमिओपॅथी आणि ॲलोपॅथी अशा तिन्ही मार्गातले निष्णात डॉक्टर्स तिथे काम करत आहेत.

सर्व संतांमध्ये समाजोध्दाराची प्रेरणा तीव्र असते. 'बुडती हे जन। न देखवे डोळा' अशा आर्त मन: स्थितीतून आजूबाजूच्या समाजाला मदतीचा हात ते सहज देत असतात. आधुनिक काळात निरनिराळ्या स्तरांवर समाजाला मदत करण्याची गरज

आहे हे जाणणाऱ्या महाराजांनी, गेल्या वर्षी (सप्टें. १९९३) मराठवाड्यात झालेल्या भीषण भूकंपातील अगतिक माणसांना संस्थात्मक आणि वैयक्तिक पातळीवरही देणगी दिली. इतकेच नाही तर तिथल्या त्रस्त आक्रोश करणाऱ्या जनतेला मानसिक शांतता मिळावी म्हणून आश्रमात सर्वांना 'दिगंबराचा' जप करायला सांगितला. प. पू. महाराजांनी आधुनिक युगाची नुसतीच ओळख नाही तर ह्या जगातल्या स्पर्धात्मकतेचीही जाणीव आहे. सौ. ताईंच्या मुलांना त्यांनी सांगितले की ह्या स्पर्धेत टिकून रहायचे असेल तर शिक्षण घेणे आवश्यक आहे. आज ज्ञान शाखांचा विविध दिशांनी जो विस्तार होतो आहे त्या ज्ञानाकडेही महाराज आदरानेच बघतात.

इ. स. १९९४ हे महाराजांच्या रौद्री शांतीचे वर्ष! वयाला ८५ वर्षे झाली की 'रुद्र' देवतेची शांती करायची असते ही शांती. 'देऊळगाव राज इथे भक्तगणांच्या जयघोषात २३ ते २७ एप्रिल १९९४ रोजी पार पडली. अतिशय सुंदर पताकांनी सजवलेल्या यज्ञमंडपात पाच कुंडे तयार केली होती. दाराबाहेर मोठमोठ्या रांगोळ्या काढल्या होत्या. वेदशास्त्रसंपन्न श्री. कृष्णाभाऊ अर्वीकरांनी अरणी मंथन करून अग्नि प्रज्वलित केला. यज्ञमंडपात वेदघोषांनी पवित्र वातावरण निर्माण झाले. प. पू. महाराज आणि ती. सौ. आईसाहेबांच्या दर्शनाला लोकांची अशरशः रीघ लागलेली होती. सर्वांच्या डोळ्यात कौतुक आणि आनंद दाटून राहिला होता. समस्त देऊळगाववासी अत्यंत अगत्यशील आणि प. पू. महाराजांच्या विषयी नितान्त भक्तीभाव असलेले दिसत होते. तिथली प्रत्येक व्यक्ती 'आपल्या घरच्या' ह्या कार्यात



मनःपूर्वकतेने सहभागी झाली होती. त्या गावातले दगडमातीसुद्धा महाराजांच्या पदस्पर्शाने रोमांचित झाले होते. पाच दिवस चाललेल्या यागाची सांगता बालाजीच्या मंदिरात बाहेर झालेल्या महाराजांच्या रौप्य तुलेने झाली. हजारो भाविकांची अंतःकरणे त्या दृश्याने उमलली, त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. इतकेच नाही तर तुलेच्या वेळेस तिथे एका कपिराजांचेही आगमन झाले आणि महाराज नेहमी श्रेष्ठभक्त म्हणून हनुमंतांचा उल्लेख करतात त्याची आठवण झाली.

तिथेही सवत्स धेनुदान महाराजांच्या हस्ते झाले. गंमत अशी घडली की प्रचंड जनसमुदाय बघून छोटे वासरू बावरले. ते पुढे जाईना तेव्हा ती. सौ. ताईमहाराजांनी सांगितले, 'गर्दी जरा बाजूला करा आणि गाय-वासराला महाराजांचं दर्शन होऊ द्या' त्याप्रमाणे लोकांना बाजूला केल्यावर गाईला महाराजांचे दर्शन झाले आणि तिने वासराला थोडीशी दुशी दिली त्याबरोबर ते वासरू तुरुतुरु चालत महाराजांच्या जवळ जाऊन उभे राहिले.

देऊळ गाव राजाच्या याग समाप्तीनंतर जालना येथे ती. सौ. ताईमहाराजांच्या पवित्र अस्तित्वाने भारलेल्या 'श्रीदत्ताश्रम'त विष्णुयागाचा सोहळा झाला.

ती. सौ. ताईमहाराज आणि त्यांचे कुटुंबीय, कवीश्वर कुटुंबीय यांच्या सहवासाने तृप्त झाली. सौ. ताईमहाराजांचें वडिल प. पू. श्री. काजळकर महाराज यांचे कार्य ह्या भागात विशेष झाले. अनेक शक्ती अंकित असलेले ते सत्पुरुष होते. त्यांचे गुरु प. पू. महाराजांचे वडील धुंडिराजमहाराज हे होते. सौ. ताईंना श्री. धुंडिराज महाराजांचे वयाच्या अकराव्या वर्षी दर्शन झाले.

विवाहानंतर सर्व चाटुपळे कुटुंबीयांनी धुंडिराजमहाराजांची दीक्षा घेतली. त्यांनी दिलेल्या मंत्राचाच सौ. ताई रोज तप करतात. मोठ्या आईसाहेबांनी ताईंना श्रीदत्तमहात्म्याची पोथी दिली, त्याची ताईंनी असंख्य पारायणे केली. लहानपणापासून विरक्तवृत्ती असलेल्या सौ. ताईंना, त्याचे धाकटे चिरंजीव संतोष दोन वर्षांचे असतांना नांदेड येथे शक्तीसंचार झाला. जालन्याला त्यांची एक मैत्रिण सौ. बंडेलवार यांनी त्या प्रसंगाचे असे निवेदन केले की बालाजीच्या देवळात सौ. ताई बसलेल्या असताना बालाजींच्या शरीरातून एक ज्योत निघून ती सौ. ताईंच्या शरीरात विलीन झाली. नांदेडला सौ. ताई रोज पहाटे ३॥-४ वाजता गोदरावरीवर स्नानाला जात आणि घरातली मंडळी उठायचा आत आन्हिक वगैरे आटपून बसत. नांदेडला असतांना आणि पुढे जालन्यातील गणपती गल्लीत रहायला आल्यावर त्या रोज स्वयंपाक केल्यावर प्रथम गोग्रास काढीत आणि दर मंगळवार-शुक्रवार गोग्रासासाठी दोन छोट्या गुळाच्या पोळ्या करीत. विशेष म्हणजे दोन्ही ठिकाणी दुपारी एक गाय तो घास खायला येत असे. सौ. सुलभाताईनी सौ. ताईंच्या संदर्भातल्या काही घटना सांगितल्या. त्यापैकी एक म्हणजे गंगापूरचे गोटीरामबाबा देऊळगावहून जालन्याला आले. ते कोणाच्याही हातचे काहीही खात नसत. पण ते स्वत:हून ताईंकडे आले आणि सौ. ताईंची खरी ओळख आणि अधिकार त्यांना समजलेला असल्याने त्यांनी ताईंकडे सरबत करून मागितले. दुसरी घटना अशी की प. पू. गुळवणी महाराज निर्गुणात गेले तेव्हा ताईंना एकाएकी निळंनिळं आकाश दिसलं, घंटा मोठमोठ्यांनी वाजत



असून, आरती चालली आहे असं दृश्य दिसले. तेव्हा सौ. ताईंनी आजूबाजूच्या बायकांना 'आज कुणीतरी संत गेले आहेत' असे सांगितले. त्यांना खरे वाटले नाही पण दुसऱ्या दिवशी बातम्यांमधून प. पू. गुळवणी महाराजांच्या निर्वाणाची बातमी समजली. 'कवीश्वर उत्तराधिकारी झाले आहेत' ही गोष्टही सौ. ताईंनी सांगितली.

सौ. ताईंनी स्वत:चे घर बांधण्याच्या आधी सुलतानपूर येथे प. पू. महाराजांच्या मातोश्रींची समाधी बांधून आपल्या गुरुमातेवरची श्रद्धा, भक्ती व्यक्त केली. ही समाधी झाल्यावर, ज्यांनी ती उभी रहावी म्हणून कष्ट घेतले त्या आपल्या भक्तांना महाराजांनी आशीर्वादपर पत्र पाठवले. ते त्या पत्रात म्हणतात, ''सौ. ताई-महाराजांच्या सदिच्छेनुसार आपण सर्व मुंबईकर सज्जन दात्यांनी, दूर असणाऱ्या स्थानात एका श्रेष्ठ सतीचे स्मारक वृंदावन निर्माण करण्याचे कार्य तनमन व धनाचे सहाय्य करून पूर्ण केले याबद्दल आपण सर्व कार्यकर्ते धन्यवादास पात्र आहात. ईश्वर किंवा ईश्वरभक्त यांच्या स्थानाचा जीर्णोद्धार करणे हे उत्तम शास्त्रविहित कर्म स्वपरकल्याण साधक असल्याचे, श्री भगवान गोपाल-कृष्णांनी उद्धवजींना सांगितले आहे. असे मोठे पुण्यकर्म आपणाकडून ईशकृपेने पूर्वसुकृतानुसार घडून आले आहे. हे पाहून समाधान वाटते. याचे अनंत फल श्रीभगवानच आपणास देणेस पूर्ण समर्थ आहे.

सौ. ताईमहाराजांची सत्कर्म निष्ठा व तशी शक्ती प्रशंसनीय अनुकरणीय आहे. त्यांचा संकल्पप्रभाव पुष्कळ दिवसांपासून असलेला, या पूर्णतेस कारण झाला असे समजण्यास हरकत

नाही.'' प्रस्तुत पत्रात केलेल्या कार्याबद्दल आनंद महाराजांनी व्यक्त केला आहेच पण शास्त्रविहित कर्माचे फळ काय असते तेही सांगितले आहे.

जालन्याच्या श्रीदत्तआश्रमात अनेक साधक सौ. ताई महाराजांचे मार्गदर्शन घेण्यास येतात. सौ. ताईंवर नितांत श्रद्धा असलेली मंडली अर्थशून्य चिकित्सा न करता त्यांचा शब्द तंतोतंत पाळतात.

संस्कृत ही भारतातल्या अनेक भाषांची जननी आहे. पण आजच्या शिक्षणक्रमात तिला मानाचे स्थान नाही. प. पू. महाराजांसारखी जुन्या पठडीतून शास्त्रोक्त अभ्यास संस्कृतात केलेली मंडळी आज दुर्मिळच आहेत. संस्कृतवरच्या नितान्त प्रेमामुळे, आस्थेमुळे ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही संस्कृत पाठशालांचे कार्य चालू ठेवले अशा ८० विद्वानांचा सत्कार ७-८ मे १९९४ ला हिंगोली येथे; 'गांधीसेवा ट्रस्ट' ह्या संस्थेने केला. महाराजांचे शिष्य श्री ॐप्रकाशजी देवडा यांनी राज्यस्तरीय 'महाराष्ट्र संस्कृत शिक्षण संमेलन' भरवून प. पू. दत्तमहाराज कवीश्वरांच्या हस्ते त्या विद्वानांचा आदर सत्कार केला.

रौद्री शांती सोहळा देऊळगाव राजाला झाला. पुण्यातही २०, २१, २२ मे १९९४ ला पुणेकरांनी वामन निवासात तुला, याग, कीर्तन, प्रवचन असा भव्य कार्यक्रम केला. संतांच्या संदर्भात चमत्काराच्या कथा खूप ऐकायला मिळतात. प. पू. महाराजांच्याही अनेक भक्तांना अलौकिक अनुभव पुष्कळच आलेले आहेत. तथापि संतांच्या जीवनाचे अवलोकन आणि परिशिलन करतांना त्यांची शिकवण मनावर ठसली पाहिजे. ते



वागतात कसे, बोलतात कसे याचे निरीक्षण आपल्याला जगायला बळ देऊन जाते. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की जसे रत्नाचे स्वरूप आत बाहेर चोख असते किंवा सूर्य जसा आतबाहेर सारखाच प्रकाशमान् असतो, तसा बाहेरचा भाग कर्माने धुवून काढलेला असतो आणि आत ज्ञानाचा दिवा उजळलेला असतो तिथे शुचित्व असते. आणि अशा व्यक्तीचे शुद्ध अंतःकरण त्याच्या कृतीतून सहजपणे प्रगट होते.

**'म्हणोनि सद्भाव जीवगत। बाहेरि दिसती फाकत।**
**ते स्फटिक गृहींचे डोलत। दीप जैसे ।।'**

प. पू. महारांचांच्या प्रत्येक कृतीचा जन्मच मुळी शुचित्वाच्या गर्भातून होत असतो. विश्वात्मक मन झालेल्या महाराजांची ज्ञानावर अविचल निष्ठा आहे. ती ज्ञानभूमिका ते जगतात. ज्या पद्धतीने ते मार्गदर्शन करतात त्यातून ते प्रकर्षाने जाणवते. एकदा मी त्यांना विचारले, ''एकच चैतन्य सर्वत्र भरलेले आहे हे बौद्धिक पातळीवर मान्य होते. पण प्रत्यक्ष जगतांना लबाड, स्वार्थी, ढोंगी दुनियेचा अनुभव येतो. तेव्हा 'शठम् प्रति शाठ्यम्' असे वागणे योग्य ठरेल का?'' प. पू. महाराज कमालीच्या शांत पण दृढ शब्दात उत्तरले, ''जगात शठ हे असणारच. पण सारखा असा विचार करून आपली बुद्धी त्याच कर्मात वाया घालवणे इष्ट होईल का? दुसरे असे की भडकलेल्या अग्नीला इंधन न घालणे हाच विझवण्याचा उपाय आहे. गवत घातले की अग्नि भडकून उठणारच. म्हणून त्याला निरिंधन ठेवावे.आणि दोष दुसऱ्याचे का बघावेत? ज्ञानी पुरुषाला दोषघ्न म्हणतात. तो दोष

बघतो पण बोलनू दाखवत नाही. भगवान् शंकर विष प्यायले, ते त्यांनी कंठात ठेवलं. बाहेर येऊ दिलं नाही. धैर्य असेल तर आपले दोष बोलून दाखवावेत. दुसऱ्याचे कशाला?''

हे ऐकतांना मला आठवले की गुरुमहाराजांनी आपल्या ह्या शिष्योत्तमाचे कौतुक करतांना 'ते दोषही गुणस्वरुप करून घेतात' अशा शब्दात गौरव केला होता.

'अमानित्व' ह्या गुणाचे व्याख्यान करतांना ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे,

**'पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ती कानी नायकानी।**
**हा आमुका ऐसी नोहावी। सेची लोकां ॥ १८८:१३ ॥'**

प. पू. महाराजांच्या आचरणातून हे तत्त्व त्यांनी किती आत्मसात केले आहे ते जाणवते. एका संध्याकाळी आश्रमात महाराज बसले होते. मी दूर कोपऱ्यात स्वस्थ होते. दोन स्त्रिया इकडे तिकडे बघत तिथे आल्या. प. पू. महाराजांना नमस्कार करून म्हणाल्या, ''आम्ही शक्तिपात दीक्षेविषयी बरेच वाचले आहे. कोणीतरी आम्हाला ह्या आश्रमात अधिक माहिती मिळेल असे सांगितले म्हणून आम्ही आलो. अशी दीक्षा कोण देतं?'' असे म्हणून त्यांनी काही व्यक्तींची नावे महाराजांना सांगितली पुढे त्या म्हणाल्या, 'त्या व्यक्तींना आम्ही पाहिलेलं नाही, त्यांच्याशी आमची ओळखही नाही. तेव्हा आम्ही त्यांच्याकडे कसं जावं!'' महाराज शांतपणे म्हणाले, ''आम्ही त्यांना ओळखतो. आपल्याला पाहिजे असेल तर आम्ही त्यांना सांगू'' महाराजांचे ते उद्‍गार ऐकल्यावर माझ्या डोळ्यांतून पाणी वहायला लागले. किती अमानित्व अंगात



असावं! स्वत: शक्तिपात विद्येचे अधिकारी असूनही त्याचा उच्चारसुद्धा त्यांनी केला नाही. ज्यांचा 'अहं'भाव पूर्णपणे वितळलेला आहे अशाच व्यक्तींच्या संदर्भात हे शक्य आहे. अर्थात् इथे व्यक्ती म्हणजे 'एक माणूस' ह्या अर्थाने मी शब्द वापरलेला नाही. कारण देहात्मबुद्धी नसलेल्या आत्मस्वरूपाचाच ते आविष्कार आहेत ही भावना माझ्या मनात दृढ आहे.

विचार आणि भावनेची अपरंपार समृद्धी असणाऱ्या महाराजांनी संयम, औदार्य, सहिष्णुता, त्याग ह्या मूल्यांची जोपासना जन्मभर स्वत: केली आणि त्याची शिकवणही दिली. सामाजिक व्यवहारातली कटुता परस्परामधला प्रेमभाव वृद्धिंगत झाला तर कमी होते हे जाणून महाराजांनी प्रेमाच्या वेली मन:पूर्वकतेने लावल्या. संतांनी सांगितलेल्या भक्तीमार्गाचा आग्रह धरला. 'धर्मो रक्षति रक्षित:' हे अनेकवेळा उच्चारणाऱ्या महाराजांच्या दृष्टीने धर्म-संकल्पना संकुचित अर्थात बंदिस्त झालेली नसून ती चिरंतन स्वरूपाची, सर्व विश्वाला स्थितीगती प्राप्त करून देणारी विश्वात्मक संकल्पना आहे.

**'मनसश्चेन्द्रियाणां च ह्यैकाग्र्यं + परमं तप:।**
**तज्जातसर्व-धर्मेभ्य: स धर्म: पर उच्चते ॥' म. भा.**

मन आणि इंद्रियांच्या एकाग्रतेतून होणारे आत्मिक समाधान हेच जीवनाचे श्रेयस् आहे, हाच श्रेष्ठ धर्म आहे. या अर्थाने त्यांची धर्मनिष्ठा जाज्वल्य आहे. त्यामुळेच त्यांच्यासारख्या व्यक्ती दीपस्तंभासारख्या प्रकाशमान असून प्रगल्भ प्रज्ञेमुळे अनेकांची वाट प्रकाशमान् करतात.

प्रस्तुत पुस्तकात सहस्त्र चंद्रदर्शन शांती सोहळा, रौद्री शांती सोहळा अशा प्रसंगी महाराजांनी केलेले प्रगट आत्मचिंतन आपल्याला वाचायला मिळेल. तसेच ज्ञानेश्वर महाराजांच्या संदर्भातले विचार आपल्याला वेगळ्याच विश्वात घेऊन जातील. कथाभाग रसाळ पद्धतीने सांगताना तत्त्वज्ञानात्मक विचार श्रोत्यांपुढे ठेवण्याची त्यांची हातोटी विलक्षण असल्याचेही आपल्याला जाणवेल. श्रीतुळजाभवानी आरोग्यधामाच्या स्थापनाप्रसंगी स्त्री-शक्तीविषयी मनुची जी मते त्यांनी मांडली आहेत, ती आपल्याला विचाराच्या निरनिराळ्या दिशा दाखवणारी ठरतील यात शंका नाही. सहस्त्र चंद्रदर्शन सोहळ्या-निमित्त त्यांनी व्यक्त केलेला संशय त्यांची वैचारिक खोली आणि मानसिक उंची दाखवणारा आहे म्हणून ही प्रवचने घाईघाईत न वाचता शांतपणे त्यातल्या विचारांचे चिंतन करून वाचून मानसिक उन्नयनाची दिशा धरावी. निरनिराळ्या प्रसंगी प. पू. महाराजांनी व्यक्त केलेले विचार परिशिष्टात घातले आहेत. शेवटी,

**'अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एवच।**
**निर्ममो निरहंकारः समदुःख सुखः क्षमी ॥'**

अशा महाराजांना वंदन करून लेखणी खाली ठेवते.

**डॉ. सौ. माधुरी पणशीकर**
११, गुडविल बिल्डिंग
मनमाला टँक रोड
माहीम
मुंबई ४०० ०१६



# ॥ एक तरी ओवी अनुभवावी ॥

## १८ जून १९८६ रोजी डोंबिवली येथील कार्यक्रमात ज्ञानेश्वरांच्या मूर्ती स्थापनेच्या वेळचे प्रवचन

ज्ञानेश्वर महाराजांच्या मूर्तीच्या स्थापनेचा उत्सव चालू आहे. शास्त्रीय विधी जाणणारी विधीज्ञ मंडळी या ठिकाणी उपस्थित आहेत.

संत शिरोमणी ज्ञानेश्वरमहाराज ७०० वर्षापूर्वी होऊन गेले. त्यांनी जे मार्गदर्शन करून ठेवले आहे त्या मार्गाप्रमाणे ही सर्व मंडळी आजही चालताहेत. या ठिकाणी काही राष्ट्रपतींचा वटहुकूम काढायचा आहे, असा कांही एक संबंध नाही. त्यांनी जे मार्गदर्शन करून ठेवलेले आहे त्याप्रमाणे आषाढी, कार्तिकी वारीला मंडळी जातात. आळंदीहून पंढरपूरला जाण्याकरिता त्यांची पालखी निघते. त्याबरोबर हजारो मंडळी निघतात आणि पदयात्रा करून पंढरपूरला जाऊन दर्शन करतात. हा त्यांचा संकल्प आहे.

**किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।**
**भजिजो आदिपुरुखीं। अखंडित ॥**

त्या आदिपुरूषाला सर्व लोकांनी विसरू नये, हा जो संकल्प झालेला आहे, त्याप्रमाणे आजही कार्य चालू आहे. पूर्ण लोकशक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती इच्छाशक्ती इ. शक्तींचा

समन्वय ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रांत आपल्याला दिसून येतो. नियमनशक्ती ही फार मोठी शक्ती आहे. सर्वांचे नियमन करणे ही गोष्ट निराळी, परंतु स्वत:ची इंद्रिये, मन आणि बुद्धि यांचे नियमन करणे हे अतिशय कठीण आहे. सर्व इंद्रिये आपल्या ताब्यात असणे, ही मोठी योगशक्ती आहे. पूर्ण वैराग्य आहे; अमानित्व पूर्ण आहे, अमानित्वाची व्याख्याच त्यांनी स्वत:वरून केली आहे.

**पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ती कानी नायकावी।**
**हा अमुका ऐसी नोहावी सेचि लोका ।।**

हे अमानित्व! ही ज्ञानसाधना! याला भगवान ज्ञानच म्हणतात. ही साधना ज्ञानाची सांगितलेली आहे. 'एतद् ज्ञानम् इति प्रोक्तम्। शेवटी उपसंहार करताना भगवान् सांगताहेत, यालाच ज्ञान म्हणतात! अमानित्व हे यांच्या ठिकाणी इतकं आहे की ते साक्षात ज्ञानच आहेत. त्यामुळे त्यांचे नेतृत्व, त्यांचे मार्गदर्शकत्व आजही आपल्याला, सर्व लोकांना मान्य आहे.

अष्टमीला, नवमीला पुण्याला पालखी येते तेव्हा दर्शनाला हजारो लोक रस्त्यामध्ये असतात. विद्यार्थी, प्राध्यापक, बायका, पुरूष सर्वही जण वाट पहात असतात की पालखी केव्हा येते आणि केव्हा पादुकांचे दर्शन होते. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन ज्यांना झालेले असेल, त्यांची संगती ज्यांना प्रत्यक्ष लाभली असेल ती त्यावेळची मंडळी किती पुण्यवान् भाग्यवान् असतील याची कल्पनाही आपल्याला करता येणार नाही. भारतवर्षाचे हे फार मोठे भाग्य आहे की असे महात्मे ईश्वररूपच झालेले आहेत.



वेदांतशास्त्रांत किंवा भगवत्गीतेत भगवान सांगताहेत, 'ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:' सर्व जीव म्हणजे माझे अंश आहेत. म्हणजे सर्वही जीव ईश्वररूप आहेत. 'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती' हे संतांचे स्वरूप आहे. गीतेमध्ये १०व्या अध्यायात विभूती विचार आला आहे सर्व विश्व हे परमेश्वराचे स्वरूप असले तरी 'विभूती' म्हणून जे आहे ते वेगळे आहे. विशेषत्वाने ज्या ठिकाणी तेजाचा, विभूतीस्वरूपाचा अविर्भाव झाला आहे, ते विभूतीस्वरूप म्हणून भगवान् सांगताहेत. म्हणजे ध्यान वगैरे करण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग होतो. संपूर्ण विश्वाचे ध्यान करणे, सर्वही विश्व परमेश्वरस्वरूप आहे अशी भावना होणे, याला कितीतरी जन्म घ्यावे लागतील. पण निदान ज्या ठिकाणी अशा प्रकारचे लाकोत्तरत्व आहे, त्या त्या वस्तूंचे विभूती रूपाने दिग्दर्शन, भगवंतानी केले आहे, त्या वस्तूंचे ध्यान म्हणजे परमेश्वराचे ध्यान आहे असे समजायला हरकत नाही.

त्याप्रमाणे सर्व संतमहात्मे हे भगवंताच्या विभूती आहेत. ज्या ठिकाणी ज्ञान आहे, पूर्ण वैराग्य आहे, पूर्ण नियामकशक्ती आहे, संकल्पशक्ती मोठी आहे, अशा लोकोत्तर शक्तींचा अविर्भाव ज्या ठिकाणी झालेला आहे, ती ईश्वराची विभूती आहे, असे भगवान् सांगताहेत. ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र विलक्षण आहे. त्यांनी स्वत:चे उदाहरण दिले आहे. लहान वयामध्ये सर्वज्ञता मिळाली. सुकृतामध्येच ज्यांचे अनेक जन्म गेलेले आहेत, ईश्वराची पूर्ण कृपा ज्यांनी संपादन केली, ईश्वरस्वरूपाचा साक्षात्कार ज्यांनी करून घेतलेला आहे, असे जे, महात्मे आहेत

ते सर्वज्ञ असतात. म्हणजे ईश्वरस्वरूपच झालेले असतात. अशा प्रकारचे महात्मे ज्ञानेश्वरमहाराज आहेत. त्यांनी ग्रंथही करून ठेवले आहेत. तत्वज्ञान किंवा अध्यात्मविद्या ज्याला म्हणतात, भगवंतांनी ज्या विद्येचे महत्व वर्णन करून ठेवले आहे ती खरी अध्यात्मविद्या आहे, ज्या विद्येच्य सहाय्याने जीवभावही नाहीसा होतो, जीव ईश्वरस्वरूप होतो, अशी विद्या लोकांना समजावी याकरिता भावार्थ दीपिका, अमृतानुभव यांसारखी काही ग्रंथरचना करून ठेवलेली आहे.

भगवंतांनी रणांगणावर जो अर्जुनाला विज्ञानाचा उपदेश केला, तो व्यास महर्षिंनी सगळा जसाच्या तसा लिहून ठेवला. व्यासमहर्षि तिथे त्यावेळी होते असा त्या अर्थ नाही. तिथे जो उपदेश केला तो राजवाड्यामध्ये धृतराष्ट्राला संजयाने जसाच्या तसा सांगितला. त्यालाही तशी शक्ती दिली होती. भगवंतानी ७०० श्लोकांमध्ये गीता नावाचा जो उपदेश केला तो जसाच्या तसा महाभारतात आहे, भीष्मपर्वामध्ये ही गीता आली आहे. ती गीता संस्कृत भाषेत आहे. महाभारत संस्कृत भाषेमध्ये आहे. जे जे काही महाभारतात सांगितले गेले आहे, तेच अन्यत्र सांगितले आहे. 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' हे प्रसिद्ध आहे. महाभारतात सर्व काही आलेले आहे. त्यात भगवत् गीता हा ग्रंथ आहे. पण संस्कृत भाषा आता दूर झालेली आहे. आपणच तिच्यापासून दूर झालो. पूर्वकालामध्ये संस्कृत भाषेचा अभ्यास चालू होता, अनेक ऋषिमंडळी वेदशास्त्र अध्यायन करीत होते. त्यांच्याजवळ अध्ययन करण्याकरिता समाजामध्ये असलेली जी काही मुले होती, ती उपनयन झाल्याबरोबर गुरुकुलांत आलेली असत.



निसर्गाच्या सान्निध्यामध्ये अध्ययन चालायचे. शुद्ध बालबुद्धि आहे, ऋषींच्याजवळ अनेक गायी असायच्या. त्या गोदुधाचा आहार असायचा. जवळ इतर ऋषिमंडळींचे आश्रम असायचे तिथून या विद्यार्थ्यांना भिक्षान्न मिळत असे. 'आहारौ सत्व शुद्धी,' हा नियम शास्त्राकारांनी सांगून ठेवला आहे. आहार जर शुद्ध असेल तर अंत:करण शुद्ध रहाते आणि अंत:करण जर शुद्ध असेल तर गुरुची जी विद्या मिळालेली आहे ती शुद्ध राहते, तेजस्वी राहते. सर्वही लोकांकरिता त्या विद्येचा उपयोग करण्याचे सामर्थ्य त्या यजमानाला प्राप्त होते.

म्हणून अग्नीची उपासना, सूर्यनारायणाची उपासना, सद्गुरूंची उपासना हे सर्वही त्या विद्यार्थ्यांकडून चालवायचे. त्यांच्या बुद्धीचे संरक्षण हे त्या ऋषीमंडळीनी करायचे आणि विशिष्ट उपकारक ज्ञान त्यांना द्यायचे, त्यांचेही कल्याण व्हावे व समाजाचेही कल्याण व्हावे म्हणून ब्रह्मचर्य आश्रमामध्ये ज्ञानर्जन करायचे. अध्यात्मविद्येत अधिकारी असलेला महात्मा, तोही त्यावेळी अध्ययन करीत असे आणि एखाद्याचे पूर्वसंस्कार जर बलवत्तर असतील तर ब्रह्मचर्याश्रमातून संन्यासश्रमही तो धारण करीत असे, संन्यासाश्रम केल्यानंतर तो लोकांच्या उपयोगी पडत असे. संन्याशांनी एका गावात जास्त वेळ रहायचे सुद्धा नाही. संन्याशाला शास्त्राचा आदेश आहे. एका गावांत एका रात्रीशिवाय जास्ती मुक्काम करावयाचा नाही. पूर्ण विचार केलेला आहे सगळ्याचा, विवेक, वैराग्य आदि सगळी आहेत. श्रवण, मनन, निदिध्यासन करून आत्मज्ञान प्राप्त करून घेतलेलं आहे. आणि सर्वसंगपरित्याग करून पृथ्वीवर संचार चाललेला आहे. जिज्ञासू

जर असतील त्या गावांत रहाणारे, त्या जिज्ञासूनी एखाद्या मंदिरात किंवा कुठेतरी राहायचे, मध्यान्हीच्या वेळेला कुठेतरी भिक्षा मागायची. त्यांना काय जे प्रश्न असतील, मनामध्ये जर कांही संदेह निर्माण झाला असेल तर तो संदेह त्यांच्याकडून दूर करून घ्यावयाचा, योग्य मार्गदर्शन मिळवायचे व त्याप्रमाणे वागायचे. या काळी स्पेशल मोटार वाहन करायचे नाही. अलीकडे राष्ट्रसंत वगैरे मंडळींना शासनाकडून वाहन मिळते. धर्मातीत राज्यामध्येसुद्धा अशी व्यवस्था करण्याची पाळी आली आहे. कारण मनाची, बुद्धीची सुधारणा ही राज्यशासनाने करता येण्यासारखी नाही. केवळ तसा कायदा करून मनाची सुधारणा शकत नाही. तशा प्रकारची ईश्वरशक्ती ज्याच्या जवळ आली आहे, ज्याच्या दृष्टीमध्ये शक्ती आहे, ज्याच्या संकल्पामध्ये शक्ती आहे, असा एकच महात्मा जरी असला तरी तो कार्य करू शकतो. राज्यशासनाने त्याला सहाय्य करावे अशी अपेक्षाच नाही. त्यामुळे संन्यासाश्रम घेऊन फिरणारे जे महात्मे आहेत त्यांच्या कर्तृत्वाने गावामध्ये असलेल्या जिज्ञासूंना लाभ होतो. मार्गदर्शन होते.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या काळामध्ये संस्कृत भाषेपासून सगळी मंडळी दूर झालेली होती. पण ज्ञान संस्कृतात असल्याने संस्कृत भाषेला जास्ती महत्व होते. मराठी भाषेमध्ये कांही करू नये असे म्हणणारी मंडळी होती. नाथमहाराजांना किती त्रास झाला. एकनाथी भागवत मराठी भाषेत करायचे नाही. त्यांचा उद्देश कांही निराळाच आहे. मराठी भाषेचा द्वेष करावयाचा असा त्याचा अर्थ नाही. संस्कृत भाषेचा आग्रह कायम राहिला पाहिजे, अशी



कदाचित् त्याची भूमिका असेल. परंतु ते ज्ञान, सर्वही जिज्ञासू लोकांना मिळाले पाहिजे अशी संतांची भूमिका होती. जिज्ञासू मंडळी सर्वत्र आहेत. कोणत्याही जातीत असला तरी जिज्ञासा त्याला नसते असे नाही. एखादा असतो, सर्वच जिज्ञासू नसतात. पण त्या जिज्ञासू वर्गाला ज्ञान मिळाले पाहिजे अशी ह्यांची भूमिका होती. निवृत्तीनाथांची - गुरुमहाराजांची आज्ञा झाली, आणि त्यामुळे 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ निर्माण झाला. 'नामा म्हणजे ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी, एक तरी ओवी अनुभवावी' म्हणतात, ज्ञानेश्वरीचा अनुभव घेण्याकरिता हा ग्रंथ आहे. अध्यात्मविद्या मिळेल, समजेल पण अनुभवात्मक जे ज्ञान आहे ते शेवटचे ज्ञान आहे. जे अनुभवात्मक ज्ञान आहे त्याचे फल आचार्य महाराज असे सांगतात की त्या ज्ञानाने इंद्रियांची शांती झालीच पाहिजे. ते ज्ञान म्हणजे ईश्वरस्वरूप साक्षात्कार. जे ज्ञान मिळाल्यानंतर सर्व इंद्रियांची शांती होते ते वास्तविक साधन आहे.

**श्रद्धावान् लभते ज्ञानम् . . .**

हे भगवान् सांगताहेत. ज्ञानाच्या साधनामध्ये अंतरंग साधन होते. बहिरंग साधना, आरंभाला त्यांनी सांगितली.

**तत विद्धी परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानम्**
**ज्ञानेनस्तत्वर्शनः ।**

तत्वदर्षी महात्मे जे आहेत, ते या ज्ञानाचा उपदेश करताहेत, कशाने? तर या तीन साधनांनी. प्रथम प्रणिपात! जिज्ञासूंनी नमस्कार करणे, नम्रतेने त्यांच्याजवळ जाणे ही सुद्धा साधना

आहे. नंतर जे जे आपल्या मनांत आलेले आहे ते ते बोलून दाखवणे, प्रश्न करणे, म्हणजे ते महात्मे त्याला उत्तर देऊ शकतात. त्यांच्याजवळ दोन्हीही शक्ती आहेत. ज्ञान जरी मिळविले तरी ते ज्ञान दुसऱ्यापर्यंत पोचविण्याची शक्ती आहे. दुसऱ्याला ज्ञान द्यायचे म्हणजे त्याच्यामध्ये अनेक अडथळे येतात. अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. अनेक संदेह निर्माण होतात. त्या सगळ्या संदेहाची निवृत्ती करणे आणि ते ज्ञान त्याला पटवून देणे ही सुद्धा मोठी शक्ती आहे. 'शाब्दे परेच निष्णात्' असे त्या महात्म्यांचे वर्णन केलेले आहे. शब्दांनी सुद्धा ज्ञान दिले जाते. परिपाक पाहिजे, परिश्रम करणाराही पाहीजे आणि सेवा हे तर साधन आहेच! पण या साधनांनी सुद्धा ज्ञानाचा उपदेश होईल असे म्हणत नाहीत. उपदेश करतील, म्हणाले, योग्यता वगैरे पाहून! ही सगळी साधनेसुद्धा कदाचित् बहिरंग साधने असतील कारण परीक्षा पाहाण्याकरता कोणीही नमस्कार करू शकतो. प्रश्न कोणालाही विचारता येतात, ते काय जिज्ञासू बुद्धीनेच विचारले पाहिजेत असे नाही. म्हणून ही जी साधने आहेत ती सुद्धा बहिरंग साधने आहेत.

अंतरंग साधने भगवान् शेवटी सांगताहेत 'श्रद्धावान लभते ज्ञानम्' ज्याच्या मनांत श्रद्धा, विश्वास निर्माण झालेला आहे, गुरूवाक्यावर व उपनिषदवाक्यावर विश्वास आहे त्याला ज्ञान मिळते उपनिषदवाक्य ही ईश्वराची वाक्ये आहेत. गुरूवाक्याची महती सांगितली आहे, सद्‌गुरूस्वरूप हे देखील ईश्वराचेच स्वरूप आहे. ईश्वराचे अनेक अवतार झालेले आहेत, नियम करण्यासाठी. धर्माधर्माचा विचार नुसता शब्दांनी काही मांडता येत



नाही, किंवा त्याप्रमाणे सगळ्यांचे आचरण होऊ शकत नाही. म्हणून अधार्मिक अशा प्रकारचे जे राजे होऊन गेलेले आहेत, रावणासारखे म्हणा, त्याला शासन करण्यासाठी ईश्वराने अवतार धारण करून त्याला शासन केले. 'विनाशायच दुष्कृताम्' त्यांना प्राणदंडच दिला आहे. समाजामध्ये श्रेष्ठता मिळवलेला जो आहे तो कशाही प्रकारे श्रेष्ठता मिळवू शकतो. तो जर शास्त्रामर्यादेचं उल्लंघन करू लागला तर त्याला प्रथम शासन करावयाचे आणि शास्त्रमर्यादेचे निर्भयपणाने संरक्षण करणारा जो आहे त्याचे संरक्षण करावयाचे, ही ईश्वराची कार्ये आहेत. नियम करावयाचे. संतांची, सज्जनांची, संरक्षण करणारांची बुद्धि सुरक्षित ठेवणे आणि धर्ममर्यादा उल्लंघन करणाऱ्यांची बुद्धि बाजूला करणे, हे फार मोठे काम आहे. हे ईश्वराशिवाय कोणी करू शकणार नाही. त्याला शब्दामध्ये शक्ती पाहिजे आणि मानसशक्तीही फार मोठी पाहिजे.

'अभय सत्वसंशुद्धिः' ही जी दैवी संपत्ती म्हणून सांगितलेली आहे, ती मानसिक शक्ती ज्या महापुरूषाजवळ आहे, तो हे कार्य करू शकतो. अशा रितीने परमेश्वराने अवतार धारण करून सज्जनांचे संरक्षण करणे म्हणजे त्यांच्या बुद्धीचे संरक्षण करणे आणि दुर्जनांच्या बुद्धीचा नाश करणे हे त्यांचे कार्य आहे. ही जी नियामक शक्ती ती ईश्वराचे स्वरूप आहे असे शास्त्रकार सांगताहेत.

पण या नियामक शक्तीचे दुसरेही कार्य आहे. हे दुसरे कार्य म्हणजे, अनेक जीव वारंवार जन्माला येतात, त्यांना मृत्यू येतो. असे कितीतरी जीव जन्म घेत असतात, त्यांना अध्यात्मविद्या कशी मिळायची व त्यांचा उद्धार कसा व्हावयाचा? हे मोठे कार्य

आहे. त्याकरिता ईश्वराचे दुसरे स्वरूप म्हणजे गुरुस्वरूप आहे. सद्गुरूस्वरूप हाही अवतार आहे, भगवान् दत्तात्रेय, भगवान् ज्ञानेश्वरमहाराज, भगवान् शंकराचार्य महाराज, हे सगळे अवतारी महात्मे आहेत, विभूतीरूप आहेत. अवताररूप आहेत.

आणि यांच्या अवतारांचे प्रयोजन म्हणजे, लोकांच्या बुद्धीचे संरक्षण करणे, म्हणजे त्या बुद्धीला मार्गदर्श करणे हे एक मोठे कार्य आहे. सज्जनांच्या बुद्धीच्या संरक्षणाकरिता प्रयत्न केला पाहिजे, त्यांना प्रतिबंध करणारी दुर्जनांची बुद्धि ईश्वराने बाजूला ठेवली, तरीसुद्धा त्यांच्या बुद्धीमध्ये जर कांही दोष निर्माण झाले तर ईश्वर दूर करतो धर्ममर्यादा पालन करणारांच्या बुद्धीमध्येसुद्धा दोष निर्माण होण्याचा संभव आहे. अगदी शास्त्रीय पद्धतीने वागणारे, शास्त्राकडून आपली उन्नति करून घेणारे जे महात्मे आहेत, त्यांच्याही बुद्धीमध्ये कांही दोष निर्माण होण्याचा संभव आहे, तो दूर कोणी करावयाची?

ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रामध्ये चांगदेवांचे चरित्र आहे. ज्ञानेश्वरमहाराजांची ज्ञानशक्ती मोठी आहे हे त्यांना पटले. योग्यशक्ती आपल्याजवळ आहे पण यापेक्षाही ज्ञानशक्ती फार मोठी आहे, याची चांगदेवांना जाणीव झाली. पूर्णज्ञान झाल्यानंतर 'संयमेत् इंद्रियः' परिपूर्ण साधन आहे. ज्ञानाची सगळी साधने साधकावस्थेत आरंभाला परिपूर्ण झालेली नसतात. ज्ञान साक्षात्कार झाल्यानंतर ती परिपूर्ण होतात. अहिंसा, सत्य, अस्तेय, परिग्रह, यमनियम सगळे सांगितलेले आहेत पण त्या नियमांची पूर्णता सर्वात शेवटी होणार आहे.

तेव्हा चांगदेवांच्या मनामध्ये ज्ञानेश्वरमहाराजांच्याविषयी



आदरभाव निर्माण झालेला आहे. परंतु आपल्याजवळच्या शक्तीचा अभिमानही आहे. तेव्हां ज्ञानेश्वरमहाराजांना शरण जाऊन त्यांच्याजवळ जो मोठा ज्ञानयोग आहे, जी अध्यात्मविद्या आहे ती आपल्याला मिळावी अशी इच्छा निर्माण झाली. प्रसिद्ध आहे कथा ही. ती इच्छा निर्माण झाल्यानंतर त्यांना आपले पत्र लिहावे, आपली इच्छा व्यक्त करावी आणि त्यांचं बोलावणं आलं म्हणजे जावं. म्हणून पत्र लिहायला बसल्यानंतर त्यांच्या मनामध्ये संशय निर्माण झाला, ज्ञानेश्वरमहाराजांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद लिहावा. अज्ञान, अश्रद्धा व संशय हे तीन दोष धर्ममर्यादापालन करणाऱ्या मनामध्येही उत्पन्न होऊ शकतात, याचे हे उदाहरण आहे. मृत्यूलासुद्धा ज्यांनी चौदा वेळेला बाजूला केले, 'शतायु पुरूष' म्हणतात त्यांना, चौदाशे वर्षे आयुष्य वाढविलेले आहे, त्यांच्या मनात दोष निर्माण झाले. भारतात जुन्या काळी प्रयोगशील शास्त्रे होती तशी प्रयोग करणारी बुद्धी नाही आज आमच्याजवळ! हे सर्व दोष श्रद्धा, संशय आणि अज्ञान-हे-प्रतिबंधक आहेत. त्यामुळे चांगदेवांच्या मनांत संदेह निर्माण झाला.

वास्तविक ज्ञानेश्वरमहाराजांच्याकडे अध्यात्मविद्या आहे आणि ती मला मिळवायची आहे अशी जिज्ञासा त्यांच्या मनांत निर्माण झाली. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे जायचे, उपदेश घ्यायचा हे सर्व मनामध्ये ठरलेले आहे. तरीसुद्धा, 'आपल्याजवळ जी विद्या आहे, ती कमी नाही, आपण इतके आयुष्य मिळवले आहे. हा जो मोठेपणाचा अभिनिवेश आहे तोही मनांत आहे. त्यामुळे २०/२१ वर्षाच्या ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहिता येईना. 'मी

१४०० वर्षांचा आहे. त्यांना नमस्कार कसा लिहायचा?' आशीर्वाद लिहावा तर पुन्हा मनांत विचार आला, त्यांच्यापासून आपल्याला अध्यात्मविद्या घ्यायची आहे, तो उपदेश त्यांच्याकडून घ्यायचा आहे, त्यांना आशीर्वाद कसा लिहायचा?' त्यांना गुरूस्थानी समजायचे, त्याशिवाय ती विद्या कशी मिळणार? हेही चांगदेवाना कळत होते म्हणजे आदरही आहे आणि अनादरही आहे.

अशी द्विधा चित्तवृत्ती झाली म्हणजे 'संशयात्मा विनश्यती'! काहीही कार्य होत नाही. संशय घेण्यापेक्षा विपरीत ज्ञान असण्यापेक्षा 'ते लहानच आहेत', 'मी मोठा आहे' असं वाटलं असतं तर काय हरकत होती? पण मोठेपणा मानावा की लहानपणा मानावा, म्हणजे नमस्कार करावा, की आशीर्वादही मागावा ह्या संदेहाने कार्यबंद झाले, सर्व शास्त्रे संदेहवृत्ती दूर करण्याकरता जन्माला आली आहेत. संशय हा फार मोठा प्रतिबंध होतो; तो संशय दूर करण्याकरिता सगळी शास्त्रे आहेत.

शेवटी कोराच कागद पाठवून दिला, शिष्यांनी आणून दिला, निवृत्तीनाथांच्या हातात आला, कोरा कागद आहे म्हणाले 'पुढे पाठीमागे, यावर काहीही लिहिलेले नाही' 'चौदाशे वर्षे जगून कोराच राहिलेला आहे', असे मुक्ताबाई स्पष्ट म्हणाली. काय उपयोग आहे? दीर्घायुष्य मिळाले, योगशक्ती असेल पण मनाचा निर्धार करण्याची जी शक्ती आहे, ज्ञानशक्ती ज्याला म्हणतात ती अद्याप नाही. ज्ञानेश्वरमहाराजांना आज्ञा झालेली, 'उत्तर पाठवा,' आता पत्रांत काही लिहिले असले तर द्यायचे, परंतु



त्यांनी उत्तर लिहिले चांगदेवपासष्टी तयार झाली. पहिलीच ओवी अशी आहे.

**स्वस्ति श्री वटेशु। जो लपोनी जगदाभासु।**
**दावी मग ग्रासु। प्रगटीला जगी॥**

वटेश्वर चांगदेव हे त्यांचे नांव होते

'वटेश्वर चांगदेवांचे कल्याण असो'. असे, ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. त्यांच्या मनांत काही संदेह नाही. लहान असले तरी लहानांनी सुद्धा मोठ्यांचे कल्याण चिंतन करणे कांही अयोग्य नाही. गुरूभावना असेल तर मोठ्यांनाही लहानाचे कल्याण चिंतता येते. दोन्हीकडे लागणारा शब्द आहे 'स्वस्ति' हा. वटेश्वर चांगदेवांकडे पाहण्याची बुद्धि ही अध्यात्मबुद्धि आहे. वटेश्वर चांगदेव म्हणजे आत्मरूप आहेत. सच्चिदानंद, परमात्मा जो आहे. सर्वव्यापी सर्वस्वरूप देशकालमर्यादारहित जो आहे, विश्वव्यापी आहे, विश्वात्मा, तो चांगदेव झालेला आहे. तो जर लपून राहिला म्हणजे अज्ञानाचे आवरण त्याच्यावर आले, तर हा जगदाभास म्हणजे सगळा व्यवहार दृढ होतो. हा चांगदेवांना उपदेशही आहे आणि अध्यात्मविद्येचे प्रगटीकरणही आहे. चांगदेव म्हणजे परमात्मस्वरूप आहेत. परमात्मा आवृत्त झाला, आच्छादित झाला, तर अज्ञानाचे कार्य म्हणजे आभास, सगळा व्यवहार तेथे येतो आणि तोच जर प्रगट झाला तर सगळा विश्वाभास नाहीसा होतो.

म्हणजे चांगदेवाकडे पहाण्याची ज्ञानेश्वरांची दृष्टि परमात्मरूप आहे. विश्वात्मक आहे, पण चांगदेवाची दृष्टि तशी नाही.

'ज्ञानेश्वर लहान आहेत, मी मोठा आहे', असे ते मानतात म्हणजे देहापर्यंतच त्यांची बुद्धि आलेली आहे. चौदाशे वर्ष आयुष्य फक्त देहाचे आहे. आत्म्याला काही आयुष्य वगैरे कांही नाही, आत्मा अनादि-अनंत आहे, त्याला कसलं आयुष्य! अजरामर आहे तो. पण देहाला आयुष्य आहे. तेव्हा मी चौदाशे वर्षाचा आहे म्हणजे मी मोठा आहे, ज्ञानेश्वरमहाराज २१ वर्षांचे आहेत म्हणजे ते लहान आहेत, म्हणजे ज्ञानेश्वरमहाराजांकडेसुद्धा ते देहबुद्धीने पाहताहेत, गुरुबुद्धि अद्याप उत्पन्न झालेली नाही. ही गुरूबुद्धि उत्पन्न झाल्यानंतर अध्यात्मविद्येकडे प्रवेश आहे. त्याशिवाय अध्यात्म विद्येकडे प्रवेश नाही. देहबुद्धिवरच थांबलेले आहेत, पुढे अद्यापि गेलेच नाहीत. म्हणून त्यांना ज्ञानेश्वरमहाराजांनी समजावून सांगितले आहे की, 'बाबा तूही विश्वात्मा आहेस. परमात्मस्वरूप आहेस.' ज्ञानेश्वरमहाराज आत्मदृष्टीने सर्व जगताकडे पाहताहेत. चांगदेव मात्र स्वत:कडे, 'मी चांगदेव आहे ह्या दृष्टीने बघत असल्याने त्यांच्या मनात गुरुभक्ती उत्पन्न होणे कठीण होते.

भगवान उद्धवजींना सांगताहेत, 'आचार्य म्हणजे मी आहे. ईश्वररूप आहे.' बाहेरच्या एकंदर सर्वही विश्वाला परमात्मरूपाने पाहणे ही ज्ञानी मनुष्याची लक्षणे आहेत. आणि जो अज्ञानी आहे तो प्रत्यक्ष गुरूबुद्धि ज्या ठिकाणी ठेवायची, त्या प्रत्यक्ष गुरूंकडेसुद्धा देहबुद्धीने पहातो. म्हणजे माझ्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये अंतर नाहीच आहे, असा विचार त्यांच्या मनात आपोआप येतो. ज्ञानेश्वरमहाराजांची दृष्टी व्यापक आहे. वय-देहाचे आहे, या वयाला कांहीही महत्व नाही. जे दिव्य ज्ञान



आहे, त्या दिव्य ज्ञानाचे महत्व आजही लोकांना पटते आहे.

भगवान् शंकराचार्यांनी संपूर्ण उपनिषद् विद्या प्रगट केली आहे, भगवत्‌गीतेवरही भाष्य केले आहे. भगवत्‌गीतासुद्धा संपूर्ण उपनिषदाचे साररूप आहे. व उपनिषदामध्ये असलेला अर्थ भगवत्‌गीतेमध्ये भगवंतांनी सांगितला, व्यासांनी लिहून ठेवला, तोही मोठा उपकारक आहे. साक्षात् उपनिषद वाक्यांचा अर्थ समजण्याकरता लागणारी बुद्धी आहे; ती वेगळी आहे. त्याकरता 'वाक्यशास्त्र' म्हणून शास्त्रकारांनी केलेले आहे. मीमांसाशास्त्र व वेदान्तशास्त्र ही दोन वाक्यशास्त्रे आहेत. वाक्याचा अर्थ कसा करावा याकरता त्या शास्त्रामध्ये विचार आहे. नुसते एखादे वाक्य ऐकले, मागचा संदर्भ नाही, पुढचा संदर्भ नाही, पण तेवढ्या पुरते आपल्याला पटेल तसे ऐकले असा वाक्य विचार करत नाहीत.

'ईशावास्य उपनिषदा'मध्ये परमात्मस्वरूप हे जसे दूर आहे, तसेच जवळही आहे असे म्हटले आहे. हे असे परस्परविरोधी कां लिहिलेले आहे? तो अर्थ समजून घेणारी जी ज्ञानी माणसांची दृष्टी आहे ती वेगळी आहे. 'जे जगा धाकुटे होईजे, ते जवळीक माझी' ज्ञानेश्वरमहाराजांनी याचा खुलासा केलेला आहे.

**'म्हणुनी थोरपणा सांडिजे । तेथ व्युत्पत्ति आघवी विसरीजे ।**
**जे जगा धाकुटे होईजे । ते जवळीक माझी ।**

जगामध्ये आपले महत्व नाही.

**'हा आमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ।**

ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. स्वत:बद्दल काहीही उल्लेख नाही. अन्नमय, प्राणमय, आनंदमय, हे पंचकोश किंवा, सूक्ष्म कारणदेह

वगैरे देह यांच्यापेक्षा बाजूला जो झालेला आहे, असा शुद्ध 'अहं' मी आहे आणि तो शुद्ध अहम् परमात्मा आहे. इथपर्यंत ज्यांची बुद्धि गेलेली आहे त्यांना मनात काही अहंकार नसल्याने कळले आहे की ईश्वर जवळ आहे आणि तो स्वत: ईश्वररूपच आहे.

म्हणजे उपनिषदांचा अर्थ लावतानासुद्धा बुद्धीची योग्यता कशी पाहिजे, हेही ज्ञानेश्वरमहाराजांनी सुचविलेले आहे. फार कठीण आहे ते. वेदवाक्याचा अर्थ समजण्यासाठी आपल्या इच्छेने कोशामध्ये असलेल्या शब्दाचा अर्थ पाहून काही उपनिषदांचा अर्थ समजून घ्यायचा नाही. तशा प्रकारचे महात्मे जे आहेत, त्यांच्या मुखातूनंच वेदांत श्रवण झाला पाहिजे, तर त्याचा काहीतरी परिणाम आपल्या बुद्धीवर होईल. त्याकरिता ज्ञानेश्वरमहाराजांनी हा ग्रंथ करून ठेवलेला आहे. त्याचे स्पष्टीकरण ९००० ओव्यांत करून ठेवलेले आहे. निरनिराळ्या रितीने मानवाच्या बुद्धीमध्ये उत्पन्न होणारे जे काही अनुकूल-प्रतिकूल विचार असतील, ते विचार बाजूला झाले पाहिजेत. त्याकरिता निरनिराळ्या पद्धतीने शंकराचार्य महाराजांनी सांगितले, भाष्य करून ठेवले आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीही हे भाष्य मराठीत केले आहे. त्यांनी उपनिषदांचाच अर्थ या रूपाने प्रतिपादन केलेला आहे. 'अध्यात्मविद्येचे जिज्ञासू अधिकारी महात्मे फार थोडे असतात' असे भगवान म्हणतात. ऐकणारा एखादाच, सांगणारा एखादाच, जाणणारा एखादाच! फार कठीण आहे. ही बुद्धि बाह्य संस्कारानी इतकी भरलेली आहे आणि त्या बाह्य व्यवहाराला त्या संस्काराला अनुसरून जर कांही असेल तर ते आमच्या बुद्धीला पटतं. अशी बुद्धीची स्थिती झालेली



असल्याकारणाने, आचार्य महाराज सांगताहेत, तो आम्हाला समजत नाही. त्या स्वानुभवापर्यंत आमची बुद्धी जाऊच शकत नाही ना! ती बुद्धी जात नाही म्हणून तर आमचा अनुभव हाच खरा असेल असे आम्ही म्हणणार. जग जे दिसतय ते सत्य आहे त्याला आभास कसे म्हणायचे? त्या ज्ञानाचे बुद्धीमध्ये संक्रमण झाले नाही तर बुद्धीवर काय परिणाम होणार! ते संस्कार जसेच्या तसे कायम राहतील. उलट हे जे विरुद्ध आहेत, हेच योग्य आहे असे वाटत राहील. प्रत्यक्ष प्रमाण आहे ना! देहाच्या पलीकडे आपल्याला कांही दिसत नाही. शास्त्रांनी जरी स्थूलदेह निराळा, सूक्ष्मदेह निराळा, हा विचार मांडला. पंचकोश सांगितले, त्याच्यामध्ये विवेक केलेला आहे, सगळं दाखविलेले आहे, पण ते केवळ शब्दप्रमाण आहे आणि हे प्रत्यक्ष आहे, हेच संस्कार आमच्या बुद्धीवर अधिक झालेले आहेत. त्यामुळे शब्दाप्रमाणाबद्दल विश्वासच उत्पन्न होत नाही.

श्रद्धा म्हणून जे अंतरंगसाधन महत्वाचे सांगितले आहे, ही श्रद्धा आपल्या बुद्धीमध्ये उत्पन्न होत नाही, श्रद्धा उत्पन्न झाल्यानंतर, जिज्ञासा ज्याला म्हणतात ती हवी. अश्रद्धा जर असेल तर जिज्ञासासुद्धा थांबून जाईल किंवा त्या जिज्ञासेतून विरूद्ध ज्ञान निर्माण होण्याचा संभव अधिक आहे. म्हणून 'ते निश्चित आहे' ही श्रद्धा हवी म्हणजे शब्दप्रमाणावर बुद्धीचा विश्वास बसला पाहिजे. आपण त्या शब्दप्रमाणाच्या विरुद्ध आपल्या बुद्धीने काही दाखवू शकत नाही. 'ईश्वर नाही' हे बुद्धीने दाखविता येत नाही. हे सांगायलासुद्धा त्याच्याबद्दल थोडा काहीतरी अनुभव असायला पाहिजे. 'अमुक मनुष्य त्या ठिकाणी

आला होता काय?' कृष्णराव आले होते कां हो?' असे कुणी विचारले. आता यांनी कधी पाहिलेलेच नाही, तो कृष्णराव आले होते की नाही हे सांगूच शकणार नाही. तसं ईश्वर नाही असे आम्ही सांगणे, ईश्वराबद्दल कांहीतरी आरोप करणे, तो ईश्वर नाही असे म्हणणे योग्य नाही कारण अभाव हे सुद्धा प्रमाण आहे, अभाव सांगायलासुद्धा काहीतरी त्याबद्दलचे थोडेफार ज्ञान लागते. प्रत्यक्ष नसेल.

तर अशा दृष्टीने बुद्धीला सवयच नाही आमच्या. अनेक संस्कार, अनेक जन्मांचे संस्कार आहेत. त्यामुळे शब्दप्रमाण जरी आहे तरी त्यावर विश्वास नाही. उपनिषद वाक्य हे ईश्वरांचे वाक्य आहे. त्याने सर्वही ईश्वरस्वरूपाचे प्रतिपादन केलेले आहे. आत्मस्वरूप कसे आहे, हे सगळे मांडून दाखविलेले आहे. आता यापैकी आम्हाला जीव आणि आत्मा याची कल्पना नाही. स्वत: जीव शरीरामध्ये असतानासुद्धा, देहामध्ये राहणारा मी एक स्वतंत्र जीव आहे याची सुद्धा कल्पना आम्हाला येत नाही. ती कल्पना आल्याशिवाय धर्माचरण म्हणा, ईश्वराची भक्ती म्हणा हा पुढचा मार्गच नाही. देहांत रहाणारा देही निराळां आहे, हे आधी समजायला हवे.

भगवत्‌गीतेच्या उपदेशाला सुरूवात झाली तेव्हा आरंभाला भगवंतानी हेच सांगितले आहे. देही निराळा आहे.

**'अंतवंत इमे देहा . . . युद्धस्व भारत' । अर्जुना तू'**

स्वधर्माचरण केले पाहिजे, स्वधर्माचरणवृत्ती होण्याकरिता देह वेगळा व 'देही' म्हणजे देहांत राहणारा जीवात्मा वेगळा आहे तो



अनादि अनंत आहे, देह नाशवंत आहे, हे प्रारंभाला सांगितलेले आहे. देहापेक्षा देही वेगळा आहे. हे समजून मग तत्वज्ञानात धर्मशास्त्राचा अभ्यास करावा लागतो. हा सगळा पारमार्थिक दृष्टिकोन विचार, देही वेगळा आहे ही बुद्धि असल्याशिवाय करताच येत नाही. जो खरा प्रत्यक्षदर्शी आहे, प्रत्यक्षज्ञान ज्याला झालेले आहे, त्याच्या शब्दावर विश्वास ठेवायला काय हरकत आहे? ईश्वराने जे गुरूस्वरूप धारण केले आहे, त्या गुरूस्वरूपावर, त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवायला पाहिजे, ते तत्वदर्शी आहेत ना!

रामायणात वर्णन आहे की सगळी वानर मंडळी समुद्रापर्यंत जाऊन पोचलेली आहेत, पण पुढे लंका कुठे आहे त्याचा पत्ता दिसत नाही. समुद्रामध्ये कुठेतरी आहे. प्रायोपवेशन करून देहत्याग करण्याकरिता ती बसलेली असतांना, तो संपाती आलेला आहे. त्याने चौकशी केली तेव्हा ती वानरमंडळी म्हणाली, 'सीता शोधनाकरता आम्ही आलेले आहोत', तो म्हणाला, 'ही सीता मला समोर दिसते आहे, ही लंका राजधानी आहे. तिथे अशोकवन आहे, तिथे तो वृक्ष आहे, त्याच्याखाली सीता बसली आहे, तिच्यासमोर राक्षसींचा पहारा आहे, हे सगळे मला दिसत आहे. तुम्हा कुणाला जायची शक्ती असेल तर जा' म्हणजे प्रत्यक्ष पाहून सांगणारा संपाती आहे ना! त्या वानरांनी म्हटलं असतं; तुला दिसते आहे पण आम्हाला एकालासुद्धा दिसत नाही. बहुमत आमचं आहे, बहुमतांनी राज्य करायचं म्हणजे सीतेचे शोध लागलाच नसता. हा आग्रह त्यावेळेला नव्हता.

प्रत्यक्षदर्शी जो आहे त्याच्या शब्दावर विश्वास ठेवला पाहिजे, संपाती प्रत्यक्ष पाहून सांगत होता, आम्हाला दिसत नाही. आमच्या नेत्रामध्ये शक्ती कमी आहे आणि दूरदर्शनाची शक्ती ईश्वराने त्याला नेत्रामध्ये दिलेली आहे, म्हणून प्रत्यक्षदर्शी जो आहे, त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून कार्य करावे.

गुरूचरित्रांत जी गोष्ट सांगितली आहे, नृसिंहसरस्वती महाराज एकटेच गाणगापूरला गेले. संगमावर नहात होते, अजून गावात आले नव्हते. दुपारच्या वेळेला भिक्षा करण्याकरिता गेले. त्या गावांत एक गरीब ब्राह्मण रहात होता. कोरडी भिक्षा मागायची, पंचमहायज्ञ व्यवस्थित करायचे. धर्माचरण व्यवस्थित चाललेले आहे. त्याच्या घरात एक म्हैस होती पण वांझ होती, वासरू नाही, अर्थात् दूध नाही. काही कामाधामाच्या निमित्ताने, ओझे आणण्यासाठी, कांही माल आणण्यासाठी ती म्हैस न्यावी लोकांनी आणि कांही पैसे द्यावे. एके दिवशी महाराज त्या ब्राह्मणाच्या घरी गेले तेव्हा ब्राह्मण बाहेर भिक्षा मागायला गेलेला होता 'त्या महाराज, बसा, महाराज, यजमान आता भिक्षा घेऊन येतील. मग स्वयंपाक करून आपल्याला ही भिक्षा वाढते' असे त्या गृहस्वामिनीने सांगून महाराजांना बसायला आसन दिले. त्या दिवशी ती म्हैस कोणी कामाला नेली नव्हती. घरातच बांधलेली होती. महाराजांनी त्या म्हशीकडे पाहिले आणि विचारले, 'बाई, तुमच्याकडे तर म्हैस आहे, आम्हांला काय अन्नाचीच भिक्षा पाहिजे असे नाही. दूध जरी थोडे दिलेत तरी हरकत नाही'. आता काय सांगायचे ! ती दूध देणारी म्हैस नाही महाराज ! वांझ म्हैस आहे ती ! महाराज म्हणाले, 'तुम्हाला दूध द्यायची इच्छा नाही



कां, म्हणून असं सांगताहात. ती दूध देणारी आहे.' आता इथे मोठा पेच निर्माण झाला. प्रत्यक्ष प्रमाण म्हैस दूध न देणारी आहे. सगळी गावातील मंडळी आणि जन्मापासून बघणारी ब्राह्मणपत्नी प्रत्यक्ष सांगते आहे की या म्हशीने एकदासुद्धा दूध दिलेले नाही'. हा महात्मा सांगतो आहे, 'दूध काढा, मला द्या, इच्छा नसली तर मी जातो', म्हणजे शब्दप्रमाणावर विश्वास ठेवायचा का प्रत्यक्ष प्रमाणावर विश्वास ठेवायचा अशी परिस्थिती निर्माण झाली.

आधुनिक बुद्धिवादाच्या दृष्टीने प्रत्यक्षप्रमाण श्रेष्ठ. प्राचीनकाळी प्रत्यक्ष प्रमाणाचे श्रेष्ठत्व मानले नाही असे नाही. पण प्रत्यक्ष प्रमाणालासुद्धा मर्यादा आहेत. त्याची सुद्धा शक्ती मर्यादित आहे. डोळ्यांना समोरचे दिसते, पाठीमागचा पदार्थ दिसत नाही. भिंतीच्या पलीकडे असणारा पदार्थ डोळे पाहू शकत नाही. त्या डोळ्यांतील शक्तीसुद्धा मर्यादित आहे. पाहिल्यानंतर स्पष्ट ज्ञान करून देणे एवढी शक्ती त्या डोळ्यांमध्ये आहे परंतु त्याने जे पाहिले नाही, ते जगामध्ये नाहीच आहे असे मानणे धाडसाचे ठरेल. प्रत्यक्ष प्रमाणावर विश्वास ठेवायचा की त्या महात्म्याच्या शब्दावर विश्वास ठेवायचा हा मोठा प्रश्न निर्माण झाला. परंतु ती स्त्री धर्मशील होती आणि प्रत्यक्ष महाराजांनी सांगितल्यावरून ती धार काढण्याकरिता गेली. तिने दूध काढले, आणि ते दूध महाराजांना अर्पण केले व दूध घेऊन महाराज गेले.

आता 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्।' बाह्य व्यवहारामध्ये सुद्धा श्रद्धेचा उपयोग होतो. पण महात्म्याच्या शब्दावर विश्वास ठेवल्यानंतर तिला ती मिळाली. नास्तिक लोक म्हणणार हे कोणीतरी असेच श्रद्धा वाढविण्यासाठी लिहून ठेवले असेल. असे

खरोखरच घडले असेल कशावरून? परंतु शब्दप्रमाणाशिवाय कांहीही होत नाही. व्यवहारातसुद्धा पुष्कळ शब्दप्रमाण लागते. शब्दावर विश्वास ठेवून कार्य चाललेली आहेत. अमुक शाळेत गेल्यावर अमुक शिक्षण मिळते, अमुक क्लासला गेल्यावर अमुक ज्ञान मिळते. निवडणुकीला उभा राहिल्यावर त्याच्या शब्दावर विश्वास ठेवतात व निवडून देतात. नंतर त्या विश्वासाचे काय फळ मिळते कुणास ठाऊक! परंतु हे आधुनिक युगात विश्वासावर, श्रद्धेवर, कार्य चाललेले नाही का? शब्दावर विश्वास ठेवून चाललेले आहे त्या ठिकाणी।

पण शब्दात सुद्धा श्रेणी आहे, संतांचे शब्द आहेत, त्या शब्दांच्या पाठीमागे त्यांची काही तपश्चर्या आहे. अशी कांहीतरी वाणीत शक्ती असू शकते हे ज्ञान आपल्याला नाही. त्याच्यावर आपली श्रद्धा नाही. त्यामुळे अशा वाणीवर आपला विश्वास बसत नाही. तेव्हां ज्ञानेश्वरमहाराजांसारखे जे महात्मे त्या महात्म्यांचे उपकार सगळ्या जगावरती इतके झाले आहेत! त्यांनी ग्रंथसंपत्ती निर्माण करून ठेवली. मार्गदर्शनही सर्व प्रकारचे करून ठेवलेले आहे. अध्यात्मविद्या इतकी सुलभ करून ठेवली आहे म्हणून नामदेव म्हणतात, 'एकतरी ओवी अनुभवावी' अनुभव घ्या म्हणतात. अनुभव घेण्यास श्रद्धा पाहिजे, इंद्रियांचा निग्रह पाहिजे, त्याच्याबद्दल अभ्यास करताना तन्मय झालं पाहिजे, त्याशिवाय त्याचा अर्थ समजण कठिण आहे. म्हणून हे सगळे लोकोपकार करण्याचे कार्य या महात्म्यांनी करून ठेवले आहे आणि लोकांच्या सद्बुद्धीचे 'संरक्षण करणे, सद्बुद्धीला प्रतिबंध करणारे बुद्धीतले दोष दूर करणे आणि त्याची बुद्धि सन्मार्गावर



ठेवणे, त्याला पुढचा सगळा मार्ग दाखवणे हे कार्य म्हणजे ईश्वराचे दुसरे स्वरूप जे गुरूस्वरूप आहे, त्या गुरूस्वरूपाचे आहे, त्या गुरूस्वरूपांत अखंड चाललेले आहे, दत्तात्रेय, ज्ञानेश्वरमहाराज, शंकराचार्य महाराज याज्ञवल्क्य महर्षि असे मोठमोठे अवताररूप महात्मे झालेले आहेत त्यांच्याकडून हे कार्य चाललेले आहे.

बुद्धीचे संरक्षण झाले पाहिजे. 'बुद्धीनाशात् प्रणश्यति'! ही बुद्धि जर गेली तर सगळं गेलं असं भगवान म्हणतात. राष्ट्र नाही, देश नाही, विश्व नाही, काहीही नाही. अशावेळी तो स्वतःच नाहीसा होतो, तो मग दुसऱ्याचे काय संरक्षण करणार! अशा प्रकारचे जे सद्गुरू स्वरूप आहे, ज्ञानेश्वरमहाराज, त्यांच्या मूर्तीची स्थापना या ठिकाणी करणाऱ्याचे सर्व मंडळीनी ठरविलेले आहे. चांगले आहे, मूळ आदर्श आपल्यासमोर उभा राहतो, इथे दर्शनाला येणे, वर्षातून ज्ञानेश्वरीची पारायणे होणे आणि उत्सव या निमित्ताने कांही ना कांही याचा संपर्क आपल्याला साधता येतो. आपल्या बुद्धीवर कांहीतरी चांगले संस्कार होण्याचा संभव आहे. या दृष्टीने हे कार्य अखंड चालू आहे. पुढेही चालणार आहे. यात कार्य करणारी मंडळी चांगली पदवीधर आहेत, त्यांनी इकडे लक्ष दिलेले आहे, तसेच या भागांत असणारी पुरोहित मंडळी, यांचाही एक संघ आहे. संघरूपाने त्यांनी हे कार्य केलेले आहे. आता पुरोहित वर्गाची ही विद्या आहे, ज्यांच्या विद्येमुळे ज्ञानेश्वरमहाराज इथे प्रत्यक्ष येऊन राहणार आहेत. नुसती मूर्ति म्हणजे ज्ञानेश्वर नाहीत, एक हजार वर्षापूर्वी सोमनाथाच्या मूर्तीचा विध्वंस केला गेला. त्याबद्दल काही विषाद नाही कारण केवळ

मूर्ति म्हणजे सोमनाथ नाही. ईश्वराचे स्वरूप वाटेल त्या वेळेला मूर्तीमध्ये आणण्याची शक्ती ज्या मंत्रांमध्ये आहे, ते मंत्र जोपर्यंत सुरक्षित आहेत तोपर्यंत पुन्हा सोमनाथाला या ठिकाणी यावे लागेल. तसेच ज्ञानेश्वरमहाराज या ठिकाणी येऊन राहाणार आहेत. ग्रंथरूपाने ते आहेतचः पण प्रत्यक्ष मूर्तिमध्ये त्यांचे जे ईश्वरी तेज आहे, त्या तेजाचे संक्रमण होणार आहे.

त्याला कारण असलेली ही जी विद्या आहे त्या विद्येचे संरक्षण करणे हीही जबाबदारी फार मोठी आहे, समाजाचे कोणते कार्य पुरोहितवर्गाकडून, ब्राह्मणवर्गाकडून होते, कोणते कार्य अभिष्ट आहे, हे समजले पाहिजे. कारण नोकरी करणे किंवा काही सभासम्मेलने करणे हेच समाजाचे कार्य आहे कां? ईश्वराचा त्या ठिकाणी अविर्भाव होणारे जे मंत्र आहेत ते मंत्र, मंत्राविद्या टिकविणारी ही मंडळी आहेत. अशा प्रकारची जी विद्या आहे, त्या विद्येचे संरक्षण करणे हे मोठे काम आहे. या विद्येकरिता दहा दहा हजार मैलांवरून, परदेशातून लोक येतात; जीवात्मा राहतो, शरीरांतून बाहेर जातो, त्याची क्रियाकर्म केली जातात, म्हणजे कशा प्रकारे केली जातात? त्याला अस्तित्व आहे किंवा नाही हे विचार करणारी मंडळी परदेशातून इथे येतात. त्या विद्येच्या संरक्षणाकरिता आपणही प्रयत्न केला पाहिजे. भिक्षुक, पुरोहित यांनीच फक्त संरक्षण करावयाचे व इतर गृहस्थांनी मात्र संरक्षण करायचे नाही असं थोडच आहे? सर्वांवर जबाबदारी आहे सर्वांनी ज्ञान करून घेतले पाहिजे. कोणतेही ज्ञान वाया जाणार नाही.

समर्थांनी सांगितले आहे, कोणतेही कार्य करा 'परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे' भगवानूही हेच सांगताहेत 'माम्



अनुस्मरं . . .' 'तू वाटेल ते कर, वाटेल त्याला मार, माझं स्मरण करून कर माझी आज्ञा आहे हे लक्षात जाणून तू कर. तुला भीष्माचार्यांना, द्रोणाचार्यांना, कोणालाच मारल्याचा दोष लागणार नाही' हे जे भवगवंतानी सांगितलेले आहे ते साध्य करून घेण्याकरिता भगवंताचे अधिष्ठान हे आवश्यक आहे. सर्वही चांगल्या मंडळीनी विचार करून हे कार्य सुरू केलेले आहे. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात 'दुरितांचे तिमीर जावो! विश्वस्वधर्म सूर्ये पाहो! जो जे वांच्छिल तो ते लाहो! प्राणिजात!! केवढे मागणं आहे, 'दुरित गेलं पाहिजे, बुद्धि शुद्ध झाली पाहिजे, स्वधर्माकिडे लक्ष गेल पाहिजे. स्वधर्माचे पालन करताना प्राण गेला तरी हरकत नाही इतकी निर्भयता मनामध्ये निर्माण झाली पाहिजे.

विजापूरमध्ये एक खाटिक रस्त्यांत गाय मारत होता १२ वर्षाच्या शिवाजीमहाराजांनी त्याचा हात तिथल्या तिथे छाटून टाकला आहे आणि तोही मुसलमानांच्या राजधानीत जाऊन! त्यांनी १२ वर्षाच्या वयांत हे धाडस केलेले आहे. तर ही जी कांही स्वधर्मनिष्ठा आहे, निर्भयता, ही लोकांमध्ये निर्माण झाली पाहिजे, असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. दुरित गेल्याशिवाय ती निर्माण होत नाही. त्याचे फल, 'जो जे वांछील तो ते लाहो' हे आहे. संकल्पशक्तीचा विकास होतो. स्वधर्म अनुष्ठानाने, दुरितसंरक्षणाने, संकल्पशक्ती इतकी वाढली की इच्छा केल्याबरोबर हे काम होते. आपण सर्वांनी जे जे आपलं आहे ते सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याकरिता अशा प्रकारचे हे स्थान ज्ञानेश्वरमहाराजांच्याच कृपेने निर्माण होत आहे. पुष्कळ कार्य ही मंडळी करणार आहेत. त्यांच्या धर्मशील अशा बुद्धीला

ज्ञानेश्वरमहाराजांनी प्रेरणा करावी. असे कार्य ठिकठिंकाणी होवो म्हणजे आपल्या विद्येचाही उत्कर्ष होईल त्याप्रमाणे त्या विद्येचा बुद्धीवरही परिणाम होईल आणि अशी बुद्धि शुद्ध झाल्यावर राष्ट्राचा उत्कर्ष होण्यास वेळ लागणार नाही. राष्ट्रोत्कर्ष होण्यासाठी बुद्धि चांगली झाली पाहिजे इकडे संतांचे मुख्य लक्ष आहे. हा त्यांचा बुद्धिवाद आहे. बुद्धिवादाला केवळ ऐहिक, म्हणजे एका जन्मांत सर्व मिळाले पाहिजे, ही फक्त बाजू नाही. अन्यायाने वागणे हरकत नाही. पण हाच आमचा शेवटचा जन्म आहे, पुढे येणार नाही, अशी जर खात्री असेल तर हा देह टिकवण्याकरिता अन्यायाने वागायला हरकत नाही. पण हे शक्यच नाही. जीवनदशा ज्याला आहे, जन्माला जो येतो त्याला मृत्यू येणारचः आणि पुन्हा जन्म घ्यावाच लागणार. मग अन्यायाने वागण्यापेक्षा, न्यायाने वागून पुढच्या जन्मात आपली अधिक उन्नति करून घेण्याकरिता प्रयत्न करायला काय हरकत आह? हे सगळे विचार आपल्या बुद्धिमध्ये दृढ व्हावेत व आपल्या बुद्धीचा उत्कर्ष व्हावा, ज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने हे कार्य या सर्व मंडळीकडून व्हावं. भारतवर्षामध्ये अद्यापि अशा प्रकारचे कार्य चालू राहू शकते, वाढू शकते, ही संतांची ईश्वराची मोठी कृपा आहे. त्यांच्या सांगण्याप्रमाणे या ठिकाणी सेवा करण्याचा योग आलेला आहे त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून हे भाषण पुरे करतो.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त ॥**



# ॥ आरती पंचायतनाची ॥

**(सहस्रचंद्र दर्शनशांती महोत्सवासाठी श्री. कृष्णाभाऊ अर्वीकर यांनी प. पू. दत्तमहाराजाचे हे प्रवचन उपलब्ध करून दिले)**

**॥ श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः ॥**

विद्यावन्तं यशस्वन्तं लक्ष्मीवन्तं जनं कुरु ।
रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ॥

देवी पंचायतन याग आजपासून सुरू झाला आहे. अर्वीकर पितापुत्र धर्मशील, आचरणसंपन्न आहेत. आणि इतरही विद्वान मंडळींनी यात भाग घेतला आहे. सर्व मंडळी विधिज्ञ आहेत, आणि ज्ञानपूर्वक जर कर्म झाले तर त्याचे विशेष फळ मिळते.

**यदेव विद्यया करोति ।**
**तदेव वीर्यवत्तरं भवति ॥**

ब्रह्मज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय असंभवनीय आहे असे आचार्यांनी सांगितलेले आहे. पण एके ठिकाणी ज्ञान आणि कर्माचा समुच्चय आवश्यक आहे. हे ज्ञान कर्मांनुष्ठाना करिताच आहे. त्याप्रमाणे ज्ञानपूर्वक कर्मांनुष्ठान चालू आहे. प्रधान देवता, परिवार देवता वगैरे सर्व देवतांची स्थापना झालेली आहे.

भगवतीचे अधिष्ठान या ठिकाणी आहेच आहे. अशा प्रसंगी

काही वाङ्मय सेवा व्हावी अशी आज्ञा संचालक मंडळींनीं केल्यामुळे यथामति सेवा करण्याचा योग आलेला आहे.

ईश्वराचे स्वरुप ''ईश्वरी सर्व भूतनाम'' किंवा ''ईश्वर: सर्वभूतानाम्'' अशा दोन्ही प्रकारांनी वर्णन केलेले आहे. नियामक शक्ति ईश्वररुपानेही आहे व ईश्वरस्वरुपानेही दाखवली आहे. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वति स्वामी महाराजांची एक आरती आहे, पंचायतनाची आरती म्हणून त्यांनी केलेली आहे. त्या आरतीमध्ये पंचायतनाचे स्वरूप काय आहे. पांच ईश्वर भिन्न भिन्न आहेत, की एकच आहे असे विचार देऊन ईश्वरस्वरुप एकच आहे, असे ध्यान त्यांनी केलेले आहे. भेद नाहीसा व्हावा असा उपक्रम त्यात आहे.

**जय सवितर्गजमुख नगतनये ईश हरे ।**
**भेदावलिमपनेतुं ध्याये हृत्कुहरे ॥**

ह्यातली भेदावली घालवण्याकरता मी ध्यान करतो असा विषय आहे. सविता, गजमुख, नगतनया ईश आणि हरि या पांचही स्वरुपाचे चिंतन हा भेद जाण्याकरता मी करतो, असे म्हणत आहेत. महावाक्याचा अर्थबोध होण्याकरता पदार्थ ज्ञानाची जरुरी आहे. वाक्यार्थ बोधाला पदार्थज्ञान लागते परंतु पदार्थज्ञान सुद्धा शुद्ध पाहिजे; तत्पदार्थ शुद्धि, नुसते ज्ञान नाही तर शुद्ध ज्ञान! ज्ञानामध्ये सुद्धा काही शुद्धाशुद्धि राहाते. तर त्या पदार्थाची शुद्धि होण्याकरिता म्हणून हे चिंतन महाराजांनी केलेले आहे. भेदावली दूर करायची मग त्या भेदावलीचेच चिंतन करायचे आहे. अधिष्ठान साहित्य, त्याने चिंतन करायचे आहे. लक्षार्थ चिंतन करायचे आहे.



गजेन्द्राख्यानामध्ये गजेंद्राने स्तुति केली, तो आर्तभक्त आहे. तत्पदार्थ शुद्धि ज्याची झाली असा हा मोठा भक्त दिसतोय--

**नमो भगवते तस्मै यत एतद् चिदात्मकम ।**
**पुरुषाय आदिबीजाय परेशाय अधिधीमहि ॥**

असा उपक्रम त्या स्तुतित आहे. नामोल्लेखन आहे. फक्त कार्याचा उल्लेख आहे. संपूर्ण विश्व ज्याच्या स्वरुपामुळे, ज्याच्या सानिध्यामुळे, कार्य प्रवण दिसते आहे, त्याचा परिणाम शुक्राचार्य महाराजांनी असा वर्णन केला की तळमळीने त्याने हाक मारली प्रार्थना केली, स्तुति केली, सगळे उत्तम सिद्धांत त्यात मांडले तर पदार्थ शुद्धिही त्यात दिसून येते, परंतु बाकी कोणीही देव आले नाहीत. संकटातून सोडविण्याची शक्ति काय देवात नाही असे नाही. नक्रापासून काय कोणीही मुक्त केले असते. परंतु यानेही विष्णु, हरि अथवा विशिष्ट अशा नांवाचा उल्लेख करुन, चिंतन करुन प्रर्थना केली नाही. सर्वात्मक अशा प्रकारचे श्रीहरि त्या ठिकाणी प्रगट झाले.

साधकाच्या अंत:करणामध्ये भेद बुद्धि आहे, ती शुद्ध होता होता ज्यावेळी तत्पदार्थ शुद्धि होईल, त्यानंतर वाक्यार्थ बोध आहे म्हणून महाराजांनी,

**जय सवित: गजमुख नगतनये ईश हरे ।**
**भेदावलिमपनेतुं ध्याये हृत्कुहरे ॥**

अस चिंतन केलं. कार्य वेगळी वेगळी दाखवलीत. मात्र सर्वव्यापी जे चैतन्य आहे त्या चैतन्यामध्ये भेद संभवत नाही. परंतु विशिष्ट

कार्यावरून भेद मानला जातो. म्हणून पंच रूपाने कोणची ईश्वराची कार्ये चाललेली आहेत हे त्याच्यामध्ये महाराजांनीं दाखविले आहे.

सवितृ स्वरूपाचे चिंतन करताना महाराज म्हणताहेत--

**बुद्धि प्रेरक सवितुर्नः सिद्धम् रुपम् ।**
**ध्याये ह्यघहृत् श्रेष्ठं देवस्य च रुपम् ।।**

चिंतन मी करतो, ही भेदावली नको आहे. सविता, गजमुख, नगतनया, हरि हे सगळे एक आहेत.

गायत्री महामंत्राचा जो अर्थ आहे त्यात शुद्ध तत्पदार्थ दाखवलेला आहे. बुद्धि प्रेरक असे ते स्वरूप आहे, ईश्वर एक आहे. पण त्याचे सविता हे जे स्वरुप आहे ते बुद्धीला प्रेरणा करणारे आहे, सविता स्वरुप जो ईश्वर आहे तो बुद्धीला प्रेरणा करतो.

**ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयांति ते ।**

भगवान सांगताहेत, बुद्धि कर्मानुसारिणी असते असाही एक सिद्धान्त आहे. जशी कर्में झाली असतील त्या प्रमाणे बुद्धि उत्पन्न होते. कर्तृत्व जीवाचे आहे. इथे जीवाला काही तक्रार करता येणार नाही. त्यानेच कर्मे केलेला आहेत, कर्मानुसारिणी बुद्धि ही वेगळी मानावी लागते आणि

**ददामि बुद्धि योगम् तम् येन माम् उपयांति ते ।**

ही जी ईश्वरदत्त बुद्धि आहे ती वेगळी मानायला पाहिजे.



'योगक्षेमम् वहाम्यहम्' ही भगवंतांची प्रतिज्ञा आहे. मोठे कार्य आहे. योगक्षेम शब्दाचा अर्थ संसारापुरताच मर्यादित नाही. परमार्थिक दृष्ट्या सुद्धा योगक्षेमाची जरुरी आहे.

अनेक भूमिका परमार्थ साधनात आहेत. त्या करता ईश्वराची उपासना ही योगशास्त्रकारांनी सुद्धा आवश्यक मानलेली आहे. प्रयत्नवाद आहे. योगशास्त्र म्हणजे पुरुष प्रयत्न आहे. परंतु मध्ये मध्ये येणारे जे अंतराय आहेत ते अंतराय दूर होण्याकरता ईश्वराची उपासना पाहिजे.

ईश्वर प्रणिधानाचे फल योगशास्त्रकारांनी दाखविले आहे. साधनाभ्यास जो चाललेला आहे तो काही या कालापुरताच आहे असं नाही. कर्मात्मक साधनामध्ये काही काळाची गणना असते. तीन दिवस, पांच दिवस, सात दिवस, यथाशक्ती आणखी काळ घेतात परंतु योग साधनामध्ये जी सिद्धी करून घ्यायची आहे त्याला काळाचे नियंत्रण नाही, दीर्घ काळपर्यंत ते चालले पाहिजे असे म्हणतात. कारण कर्मानुसारिणी बुद्धि घेऊन, त्या भूमिके-वरूनच जीवाचा साधनाभ्यास चाललेला आहे. कोणाची बुद्धि कशी होईल, कोणाचे कर्म कोणत्या वेळेला होईल, कोणत्या वेळेला त्याचा फलोद्भव होईल काही सांगता येत नाही, त्यामुळे ईश्वराची उपासना जरुर आहे असे म्हणतात.

**ददामि बुद्धियोगं तम् ---**

हा बुद्धियोग त्याच्यापासून मिळायचा आहे. 'कर्मानुसारिणी बुद्धि' हा जरी सिद्धांत घेतला तरी त्याने ईश्वरशक्तीचे महत्व दाखविले आहे. 'ददामि बुद्धि' यात भगवान सांगतात, की

कोणाच्या कर्मात केव्हा फलोद्भव व्हायचा हे सर्व ज्ञान त्यांना (ईश्वराला) आहे. एका जन्माचीच नव्हे तर अनन्त जन्मांची कर्मे जीवाकडून झाली आहेत व क्रियमाण कर्माची त्यात भर पडत आहे. असे चालू असतानासुद्धा त्यातल्या कोणच्या कर्माचा फलोद्भव व्हायचा हे ज्ञान त्या परमात्म्याला आहे. त्यामुळे बुद्धी कर्मानुसारिणी हा जरी सिद्धांत मुख्य घेतला तरी सुद्धा कोणत्या कर्मांला प्रवृत्त करणे हे तरी स्वातंत्र्य आहे की नाही ईश्वराला! तो संत आहे, कर्मफल प्रशंसिता आहे तेव्हा बुद्धि प्रेरणा करण्या-बरोबरच योगक्षेम संपादकत्व हेही त्याच्यामध्ये आहे. कर्मफल प्रसविता तो आहे. त्याच्या शिवाय कसे होणार?

बुद्धि प्रेरक असे जे परमात्म्याचे स्वरूप आहे ते या ठिकाणी दाखविले आहे. बुद्धि प्रेरक ईश्वर म्हणजे सविता प्रकाशरूप आहे. प्रकाशमान् आहे. चक्षुर्वैसिद्धम् श्रेष्ठ स्वरूप आहे. बुद्धि प्रेरणा करणे हे फार महत्वाचे काम आहे. कर्मामध्ये सुद्धा कमी जास्तपणा हा त्याच्या संकल्पाप्रमाणे होऊ शकतो.

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदम् सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥**

भगवान् सगुण ईश्वराचे स्वरूप सांगताहेत, सर्व कर्माचे भोक्तृत्व हे ईश्वराचे कार्य आहे. कर्तृत्व जीवाला आणि भोक्तृत्व ईश्वराला हे कसे संभवनीय आहे? जो कर्ता तोच भोक्ता असायला पाहिजे ना!

संकल्पामध्ये फलाचाही उल्लेख केला जातो. भागवतामध्ये वृषभ देवांचे जे ज्येष्ठ पुत्र आहेत त्यांनी अनेक यज्ञ केले असं वर्णन



शुक्राचार्य महाराजानी केले आहे. ते कर्मानुष्ठान चालू असताना त्यांची दृटी कशी होती यांचे वर्णन करताहेत, यज्ञकर्माची सुरवात त्याने केली आहे. कर्ता तो आहे. त्याचे फळ म्हणजे ईश्वराचे फळ आहे. भगवन्ताच्या विश्वरुपाचेही तो चिंतन करतो आहे, सर्व देवांचा नियामक तो असल्यामुळे साक्षात कर्ता तो आहे. सगळे देव नियम्य आहेत. अर्थात हे अपूर्व क्रियाफळ त्याचे आहे हे त्याला - हिरण्यकश्यिपूला - समजले आहे. तो आपल्या सर्व अनुयायांना - असुरांना सांगतो आहे, ''तुम्ही अगोदर जाऊन ही सगळी ब्राह्मणांची कर्मे बंद करा. कारण ते ब्राह्मण कर्ता साक्षात ईश्वर आहे, या शुद्ध भावनेने कर्म करून सर्व क्रियाफळ त्या ईश्वराला अर्पण करतात. हे फळ त्या विष्णूला मिळते.'' हिरण्यकश्यिपू फक्त विष्णूचे बाह्य स्वरूपच लक्षात घेतो आहे. इतर विष्णु स्वरुप जाणून बोलत नाहीये तो काही, काही सिद्धान्त असुरांनी स्वीकारले आहेत. ''कालात्म नित्यत्वम्'' हा सिद्धान्त हिरण्यकशिपूला मान्य होता 'आत्मनेपुण्य मृदितकषाय:' हे कर्माचे नैपुण्य आहे योग, कर्मसुकौशलम् हे कौशल्य त्यांनी दाखवले आहे त्यामुळे सर्व यज्ञादिक कर्माचा भोक्ता परमात्मा आहे हे ज्ञान पाहिजे.

त्याच्यानंतर ''सर्व लोक महेश्वरम्'' सर्वहि ब्रह्मादि देवांचा नियामक तो आहे. मुख्य नियामक आहे. 'सुहृदम सर्व भूताना' असंहि आहे. सृहृद शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी केलेला आहे--

**प्रत्युपकारनिरपेक्षतया उपकारिणम् ।**

त्याला प्रत्युपकाराची काय आवश्यकता आहे? आपण जर

भक्ताला काही दिले तर भक्त माझ्या करता काय करणार आहे? असे तो अगोदर म्हणत नाही. प्रल्हादजी म्हणाले, ''मलाही काही इच्छा नाही. आणि तुम्हाला ही काही अपेक्षा नाही. काय करतो आहे हा आपल्या करता? असे तुम्हाला ही वाटत नाही.''

भक्तियोगाची सर्व प्रवृत्ती ह्या वात्सल्यभावामुळे झाली आहे. भगवंताच्या या प्रेरक स्वरूपाला बुद्धि दातृत्व म्हणतात. 'योगक्षेम' हे महत्वाचे. योगक्षेम निर्वाह तो करतो. ह्यामध्ये प्रापंचिक योगक्षेम तो वहातोच पण पारमार्थिक योगक्षेमाकडे लक्ष देतो हे मुख्य आहे. आणि असा योगक्षेम तो निरपेक्षपणे करतो.

**दत्तो मया तेह मितीह दत्तः**

असे दत्तात्रयाचे वर्णन करतात. आत्मनिवेदन भक्तांनी करावयाचे आहे. पण इथे देवानेच अत्रिऋषिंना आत्मदान करून टाकले आहे म्हणून 'दत्त' हे नाव पडले. म्हणजे हे जे भक्ताबद्दल वात्सल्य आहे तेहि यामध्ये सूचित केले आहे. वात्सल्य शब्दांचा अर्थ वल्लभाचार्यांनी एके ठिकाणी केलेला आहे.

**आस्तिकजनदोषेषु गुणत्वबुद्धिः ।**

ही वात्सल्याची व्याख्या केली आहे. त्याचे जे भक्त असतील त्याचे दोष नाही फक्त गुणच देवाला दिसतात हाहि वात्सल्यपदार्थ आहे. त्यात दोष दिसत नाही. हे सगळे गुण आहेत. ''मधुराधिपतेरखिलम् मधुरम्'' असे भक्त म्हणतो आहे परन्तु भगवान् म्हणताहेत की भक्ताचे सुद्धा सगळेच चांगले आहे.



कारण त्याच्या पाठीमागे त्याचे प्रेम आहे. परन्तु शास्त्रीय दृष्टीने कदाचित् हा भ्रम होईल, भ्रांती होईल, गुण नसताना गुणत्व बुद्धि देवाला आहे म्हणजे देवेला भ्रांति आहे. असे म्हणावे लागेल म्हणून दुसरी व्याख्या सांगितली आहे. ''तत् दोष अदर्शनम वा वात्सल्यम'' भक्ताचे दोष त्याला दिसतच नाहीत.

तर अशा दृष्टीने बुद्धीला तो प्रेरणा करतो. त्याचे कर्म कोणतेही असले तरी तो त्यात कमी जास्तपणा करु शकतो. नाही तरी शेवटी ब्रह्म साक्षात्कार झाल्यानंतर सगळ्या कर्माचा क्षयच व्हायचा आहे. कर्मशक्ति मोठी आहे. पण सगळ्या कर्माचे फल थोडेच मिळते? शेवटी ज्ञान झाल्यावर सर्व कर्माचा तात्काळ क्षय होऊन जातो. हे ज्ञान महात्म्य आहे. पुण्येही गेली व पापेही गेली. अशीही काही कर्मे असतील. कुठच्या तरी जन्मात शुद्ध कर्मे झाली असतील. गुरुचरित्रातील त्या कथेत वामदेवाला खाण्यासाठी आलेल्या ब्रह्मराक्षसाने पंचविसाव्या जन्मात कर्म केले होते. राजस कर्म असेल तरी त्याचे फल मिळते. तामस कर्माचे मात्र फल नाही. परन्तु ते राजस कर्म यथाविधी केल्यामुळे सकाम जरी असले तरी त्याचे फल मिळते. अनेक जन्माची कर्मे त्या सर्वसाक्षी बुद्धिप्रेरकांच्या समोर आहेत. त्यामुळे परमार्थाला अनुकूल अशी बुद्धि प्रेरणा त्याच्याकडून होऊ शकते.

पत्नीला कधीही माहेरी न पाठविणारे तुळसीदास पण त्या स्त्रीच्याच एका वाक्यावरून निवृत्त झाले. हे कस काय झाले? याचे उत्तर काही देता यात नाही. ''ददामि बुद्धि योगंतम्'' मानलंच पाहिजे. कर्मानुसारिणी बुद्धि घेऊन आलेले विद्वान असून सुद्धा स्त्रीच्या आसक्तित सापडलेच होते आरंभाला.

**बुद्धिप्रेरकसवितुर्नः सिद्धम् रुपम् ।**

आणि त्याचे ध्यान या रुपाने आहे. हे सविताचे वर्णन महाराजांनी केले आहे. सवितारूपी परमात्मा बुद्धीला प्रेरणा करत असतो. परमार्थांमध्येही जी अपेक्षित बुद्धि आहे त्यालाही प्रेरणा करीत असतो. जीवात्मा कर्मानुसारिणी बुद्धि जरी घेऊन जन्माला आलेला असतो तरी सुद्धा परमार्थिक बुद्धि प्रेरणा करण्याची शक्ति त्याच्या जवळ आहे. सूर्य नारायण हे सविता स्वरूप म्हणजे बुद्धि प्रेरक ईश्वराचे कार्य म्हणून सविता हे एक स्वरुप दाखवलं आहे.

आता गजमुख गणेशाचे स्वरूप वर्णन करताना 'गणाचा पति' म्हणजे पालक! गण म्हणजे प्राण, इंद्रिय, हृदय, बुद्धि संपूर्ण सूक्ष्म शरीर घेतले आहे. सूक्ष्म शरीरांतर्गत बुद्धितत्वाला प्रेरणा करणे हे कार्य सवितारुपी ईश्वराचे आहे. त्या सर्वही गणांचे रक्षण करणारा परमात्मा म्हणजे गणपति आहे. मूळ तत्वापर्यंत जाऊन महाराज ध्यान करताहेत. म्हणजे भेदाचा काय संबंध? गणपति निराळा, सविता निराळा, जगदंबा निराळी असे नाही. पंचप्राण आहेत. पंचज्ञानेंद्रिये आहेत, पंचकर्मेंद्रिये आहेत मन आणि बुद्धि आहे. सप्तदर्शतत्वात्मक लिंग शरीर ते आहे, ज्याच्यामुळे अनेक जन्म होतात. नवीन स्थूल देहाचा संबंध म्हणजे जन्म आहे. आणि स्थूल व सूक्ष्म शरीराचा वियोग होणे म्हणजे मृत्यू आहे. आता या सर्वांचे रक्षण करावयाचे हे काम कठिण आहे. प्रेरकत्व निराळे, संरक्षकत्व निराळे. कार्यरुपाने भेद झालेला आहे. प्राणतत्व एकच आहे म्हणतात. परंतु वेगवेगळी कार्ये केल्यामुळे स्थान भेदाने,



कार्य भेदाने पंचप्राण भेद झालेला आहे, असे शास्त्रकार सांगतात, त्याप्रमाणे ईश्वराचा भेद हा उपाधिमुळे आहे.

आता पंचमहाभूतापासून सूक्ष्म शरीरही झालेले आहे. स्थूल शरीरही पंचभौतिकच आहे. पण स्थूल शरीराची कालमर्यादा ठरलेली आहे. ते विनाशी आहे. 'अंतवंत इमे देहा' असे म्हणतात. साक्षात्कारात्मक भक्तियोग जरी उत्पन्न झाला तरी सुद्धा सूक्ष्म शरीराचा विनाश होतो, असे कपिल महामुनि सांगतात, भक्तितत्वाचे प्रतिपादन आपल्या मातेला करीत असताना भक्तीचे स्वरूप त्यांनी वर्णन केलेले आहे. सर्व देव म्हणजे सगळी इंद्रिये. सर्वही इंद्रियाची प्रवृत्ती वासुदेवाकडे करणारा तो भक्तियोग म्हणून त्यांनी वर्णन केला आहे. सर्वात्मक परमेश्वराच्या ठिकाणी या सर्वांची प्रवृत्ती असणे ही भक्ती आहे.

**सत्त्वैकमनसः भक्तिः स्वाभाविकी तू साः**

संसार निवृत्ती सूक्ष्म शरीराचा नाश झाल्यावर होते. जीव भाव संपतो. तो पर्यंत अध्यस्त सर्वही सूक्ष्म शरीर घेऊन जीवात्मा राहातो आहे. त्याची सगळी कार्ये आपल्या ठिकाणी घेतो आहे. ज्ञानात्मक, साक्षात्कारात्मक जी भगवत् भक्ति आहे, शेवटची म्हणा किंवा अशा प्रकारची सर्व इंद्रियाची प्रवृत्ती त्या ठिकाणी लागली म्हणजे ती ज्ञान पर्यवसायिनी झाली, तो पर्यन्त ही सर्व इंद्रिये, मन, बुद्धी प्राण वगैरे भौतिक असून सुद्धा रहात असतात ना! परिणाम सारखा चालू आहे. इंद्रियांच्या वृत्ती आहेत. मनाच्या वृत्ती आहेत. बुद्धीच्या वृत्ती आहेत. प्राणाच्या वृत्ती सारख्या चालू आहेत. हा परिणाम चालू असूनसुद्धा क्षय नाही. परिणाम

असल्यामुळे सगळ्यांचा क्षय आहे हा सिद्धांत जो सांख्यांनी मांडला आहे. तो तिथे कां नाही? परिणामशील असे हे सूक्ष्म शरीर आहे. तरीसुद्धा त्याचे रक्षण करणारे कोणी तरी असले पाहिजे, ते चिंतन महाराजांनी केले आहे.

**प्राणेंन्द्रियहृद्‌बुद्धिप्रसिद्धगणरुपं ।**
**रक्षति तस्मात् गणपतिरिरिति विश्रुतरूपम् ॥**

ईश्वरस्वरूपाचे हे एक कार्य इथे त्यांनी दाखविलेले आहे. संपूर्ण सूक्ष्म शरीराचे संरक्षण करणे. तदंतर्गत बुद्धीला यथायोग्य प्रेरणा करणे हे सवित्ररुपी ईश्वराचे कार्य आहे, प्रपंच, परमार्थ या सर्वांच्या योगक्षेमाची जबाबदारी त्यात सुचविलेली आहे बुद्धीनेच सर्व कार्ये व्हायची आहेत ना! सर्वाला कारण म्हणजे बुद्धीतत्व आहे. असा सांख्याचाही सिद्धान्त आहे.

**सर्व प्रत्थुपभोगं यस्मात् साधयति बुद्धिः ।**
**सैव च निजदृष्टीनां प्रधान पुरुषान्तरं सूक्ष्म् ॥**

उपभोग आणि अपवर्ग हे दोन्ही देणारी बुद्धि आहे. बुद्धि हीच प्रधान आहे. श्रेष्ठ आहे. हे सांख्यानी सुद्धा सांगितलेले आहे. त्यांना ती बुद्धि मान्य आहे. भोगदातृत्व फक्त बुद्धीलाच आहे ना! आणखी अपवर्ग अमोल दातृत्व सुद्धा--

**प्रधानपुरुषांतरं सूक्ष्मं करोति इति बुद्धिः ।**

प्रधान आणि पुरुष यातील भेद म्हणजे अंतर दाखविणारी बुद्धिच आहे. तो भेदाग्रह झाला की भेदग्रह गेलाच, भेदाग्रह मूलं सर्वही ।



भेदाग्रह मूल सर्वही म्हणजे भ्रांती -- तीही गेलीच म्हणतात. म्हणजे भोग अपवर्ग दातृत्व बुद्धीला सांख्यशास्त्रकारांनीही मान्य केलेले आहे.

परन्तु ती बुद्धि संस्कृत झाली पाहिजे एवढेच त्यांचे म्हणणे आहे. आचार्य महाराज म्हणतात दोषापनयन आणि गुणाधानेन असा संस्कार करण्यारता सर्वही साधनांचे आचरण केले पाहिजे. एवढंच, दुसरं काहीही नाही. बुद्धीनेच निर्णय व्हायचे आहेत. साक्षात्कार म्हणजे बुद्धिलाच आहे. विद्या भगवती म्हणून जे देवांनी वर्णन केले आहे, ही ब्रह्मविद्या आहे. ही साक्षात्कारात्मक वृत्ती भगवतीचे स्वरूप आहे म्हणजे बुद्धीनेच सर्व संसारनिवृत्ती होऊ शकते. अशा या सर्वही तत्वांचे संरक्षण करणारे ईश्वरस्वरूप म्हणजे गणपति आहे, हे ध्यान करताहेत (महाराज.)

**प्राणेंद्रियहृद्‌बुद्धिप्रसिद्धगणरुप ।**
**रक्षति तस्मात् गणपतिरिरिति विश्रुतरूपम् ॥**

बाह्य आकाराचे, रुपाचे अवताराचे चिंतन केले नाही. मूळ स्वरुपापर्यंत जाऊन चिंतन त्यांनी केले आहे.

जगदंबेचे स्वरूप चिंतन करतांनाही महाराज सांगताहेत

**मानसमुखजडजातं यभ्दासा रूपं ।**
**भाति श्रुतिरिरिति देवी नगतनयारुपं ॥**

मनापासून बाहेर पर्यन्त हे सर्व जड आहे. अचेतन आहे. प्रकाश नाही त्याला. हे संपूर्ण अचेतन असे विश्व (मनापासून बाहेरपर्यन्त सर्व) ज्या प्रकाशाने भासत आहे तो प्रकाश म्हणजे नगतनया

आहे. चैतन्य रुपाने सर्वांना भासक अशा प्रकारचे भगवतीचे स्वरूप आहे. भासलं पाहिजे ना! आता ते कसं भासलं पाहिजे, काय भासलं पाहिजे ही बुद्धीला प्रेरणा सविता रुपाने होणार आहे. ती बुद्धी स्थिर राखण्याचे काम गणपतिरुपाने केलेले आहे. पण अगोदर त्या मूळ पदार्थाचं भान झाले पाहिजे ना! त्या मूळ पदार्थाच्या अस्तित्वाला मान्यता मिळायला ज्ञानाची जरुरी आहे. ज्ञानाशिवाय अस्तित्व नाही. शशशृंगाच ज्ञानच नाही. अर्थात त्याला काही अस्तित्व नाही. तसे ह्या सर्व स्वरुपाचे चिंतन करीत असताना भासक म्हणूनच चिंतन केलेले आहे. कर्तृत्व यात काहीच दाखवलेलं नाही. प्रेरकत्वसुद्धा भासकच आहे. त्या त्या कर्माचे फल भासविणे किंवा इंद्रियांना तिकडे प्रवृत्त करणे, अशा सर्वही जडजाताला भासमान करणारी जी चित्‌शक्ति आहे ती नगतनया देवी आहे.

त्या नंतर भगवान शंकरांच्या स्वरुपाचे प्रतिपादन करीत असतांना महाराज लिहिताहेत--

**एकादशसुखभासकमीशस्य हि रूपं ।**
**श्रुतिसिद्धं शंकर इति भवहारकरुपम् ॥**

महाराजांची भाषा फार गूढ आहे. त्या भाषेचा अर्थ समजणें म्हणजे ''ददामि बुद्धियोगंतं'' या कृपेशिवाय होणार नाही. एकादश इंद्रिये आहेत. दशेंद्रिये व सिध्दान्तदृष्ट्या अंत:करण म्हणून मन-बुध्दि एकच मानलेले आहे. याच्यापासून निर्माण होणाऱ्या ऐंद्रिय सुखांना भासक असे जे तत्व आहे ते शंकररूप आहे.



सर्वत्र सच्चिदानंद परमात्मा एकच आहे असे शेवटी उपसंहारामध्ये सांगताहेत महाराज, सुखांना भासक अशी परमात्म्याची वेगवेगळी स्वरूपे आहेत. अंत:करण विज्ञेय सुख आहेत, असा सांख्यांचा किंवा वेदांत्यांचा सिद्धांत आहे. वृत्यात्मक सुख आहे. नैय्यायिकांनी सुख दु:ख वगैरे आत्मगुण मानलेले आहेत. म्हणजे आत्मा, ज्ञान असेल तेव्हा पूर्ण मानलेला आहे. ज्ञान नसेल तेव्हा आत्माही जड असे सांगितल्यासारखे आहे. म्हणून हे ज्ञान, सुख, दुख वगैरे सर्व मनोधर्म मनोवृत्त रूप आहेत. असा सांख्यांनी सिध्दांत मांडला आहे. उपनिषद प्रतिपाद्य तोच आहे, ही सर्व मनोरुपे आहेत.

यापैकी शंकरांचं कार्य म्हणजे इंद्रियांनी घेतली जाणारी जी एकादश सुखे आहेत ती भास्य आहेत हा विवेक उत्पन्न करणे. त्या त्या विषयाशी संबंध वगैरे सर्व आले. आता त्या त्या विषयांशी मनाचा संबंध येणे वृत्ती होणे, हे प्रेरकाचे कार्य चाललेलेच आहे. संरक्षण कार्य गणपतींच चाललेलच आहे. त्याचे भान करणे, प्रकाश करणे हे नगतनयारुपाने चाललेले आहे. परंतु ते सुखरुपाने परिणत झाल्यानंतर सुख भासविणे! मनाचा साक्षात संबंध चैतन्याशी आहे. अहंकार, बुध्दि, मन या रूपाने जे अंत:करण झालेले आहे, त्याचा साक्षात् पहिला अध्यास म्हणजे, अंत:करण अध्यास आहे, चित्‌ग्रथी किंवा चिदचित् ग्रंथी म्हणतात त्याला, तिथपर्यन्त सगळं घालविता येतं.

परन्तु चिदचित् ग्रंथींचा भेद होणे अतिशय कठिण काम आहे. चांगदेवासारखे जिथे सांपडले. त्यांचा ग्रंथी भेद होऊ शकला नाही. सर्वही पारमात्मा एक आहे. असं ज्ञान असून सुध्दा चांगदेव,

ज्ञानेश्वर माझ्यापेक्षा कनिष्ठ आहेत, मी त्याच्यापेक्षा ज्येष्ठ आहे ह्या गोंधळात, त्या चिदचित् ग्रंथींचा भेद न झाल्यानेच सांपडले. वास्तविक ते मृत्युंजय झालेले होते. ज्यांनी चौदा वेळा मृत्यु चुकविला त्यांनासुध्दा विवेक झाला नाही. भेद म्हणजे विवेक.

तर सुख भासक असे जे स्वरुप आहे ते शंकराचे रूप आहे. सर्वही सुख ही भास्य आहेत, अर्थात विनाशी आहेत, विवेक ज्ञानाचे फल म्हणजे विनाशीत्वाचे ज्ञान आणि विनाशीत्वाचे ज्ञान म्हणजे वैराग्य आहे. भास्य म्हणजे कदाचित् भास्य आहे. सर्वदा भास्य नाही. कारण त्यालाही कारणे असणारच तेव्हाच भासणार.

**मात्रास्पर्शास्तुकौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ।**

इंद्रियांचा आणि विषयांचा संबंध आला म्हणजे सुखदुःखादिक उत्पन्न होतात, ती विनाशी आहेत अर्थात ती त्याज्य आहेत. भासक जे सुख आहे, मूळ सुख म्हणजे चैतन्य सत्चित् सुख हे भासक जे आहे ते शंकरस्वरूप आहे म्हणूनच शेवटी सांगितलं--

**एकादशसुखभासकमीशस्य हि रुपम् ।**
**श्रुतिसिद्धं शंकर इति भवहारकरूपम् ।।**

शंकर हे संहारकर्ते आहेत असे म्हणतात, संहार करायचा म्हणजे काय? भवहारक ते आहेत. ज्या वेळेला संपूर्ण एकादश इंद्रियांच्या रूपाने निर्माण होणारी सर्व सुखे भासू लागतात. त्यापैकी भास्य आणि भासक हा विवेक ज्या वेळेला होईल त्या वेळेला भव संपला.

भव असून त्याची विरक्ती ही प्राथमिक भूमिका आहे.



वितरेकसंज्ञा, एकेंद्रियसंज्ञा, वशीकारसंज्ञा अशा ज्या वैराग्याच्या योगशास्त्रकारांनी भूमिका सांगितल्या आहेत. त्यात भास्य भासक हा बदल लक्षात आला, हा जर विवेक झाला आणि भास्याचे विनाशीत्व जर पटले, तर ते हरण व्हायला सुरवात झाली, आणि भासकाच्या ठिकाणी वृत्ती स्थिर झाल्यानन्तर काहीच नाही. आत्मतत्वज्ञान झाल्याबरोबर अविद्या व अविद्येचे कार्य नाहीसे होते. कोणच्याहि कालामध्ये त्याला अस्तित्वच नाही.

भगवान् शंकर हे भवहारकरूपम् म्हणतात. हे भव म्हणजे उत्पन्न होणारे जे संसारस्वरूप आहे, हे जे सुख स्वरूप आहे, ज्या सुखाकरता सर्व संसार चाललेला आहे, 'हे सगळे ही भास्य आहे. भासकाचे चिंतन झाले पाहिजे, केवळ भास्याचे चिंतन करणे हा दोष आहे. पण ''हे विश्वची माझे घर'' अशी जर ममता उत्पन्न झाली तर हा दोष नाही, तर याप्रमाणे क्रमाक्रमाने भवहरण करणारे शंकराचे स्वरूप असे आहे की ते सुखभासक आहे. ज्या सुखाकरता सर्व प्रयत्न चाललाय, त्या सुखाचे स्वरुप कसं आहे? तर ते विनाशी आहे. विवेकाने हे समजून घ्यायला पाहिजे. म्हणून भगवान् शंकराचं कार्य म्हणजे भवहरण करणे! सगळी सुखं मुळात जाणारी आहेत. मग त्या सुखाची कार्यकारणे आणि सगळा एकंदर प्रपंच तसाच विनाशी आहे.

आता भगवान् हरिचे वर्णन करताहेत महाराज--

**मानससुखदुःखानाम् हारकमजरुपम् ।**
**हरिरिति वेदो ह्यवदत्सच्चित्सुखरूपम् ।।**

असा शेवटचा उपसंहार आहे तर, हरिस्वरूपाचे वर्णन करीत

असताना 'हारक' असेच केले आहे. 'भवहारक' असे शंकराचे स्वरूप आहे. भास्य, भासक भाव विवेकद्वारा प्रगट करून, ती विवेकवृत्ती बुद्धिप्रेरक सवितारूपाने दृढ करून त्या वैराग्य भूमिका, क्रमाने प्रदान करून संपूर्ण भव हरण करणे हे जसे कार्य शंकरांचे आहे, त्याप्रमाणे हरिचे कार्य दाखविताना सुद्धा म्हटले आहे--मानससुख दुःखानाम् हारक हरिः-सुखदुःख वगैरे सगळ्या ज्या मनोवृत्ती आहेत त्या सगळ्याही मनोवृत्तींचं हरण करणारी 'हरि' देवता आहे. 'हरिर्हरति पापानि' 'हरिति च हरा हरति च हरिः।' दोन्ही व्युत्पत्ती एक आहेत. सर्वही पातकांचा नाश करणारी हरि शक्ती आहे. ते ईश्वराचं कार्य आहे. मानस सुख दुःखाचं हरण करणारी हरि शक्ति आहे. म्हणजे हरिस्वरूप परमात्मा मानस सुखदुखांचं हरण करीत असतो. मनाची वृत्ती त्या सुख दुःखाकडेच लागली व त्यांच्या अनुसंधानामुळे जास्ती जास्ती सुखापेक्षा दुःख वृत्तीच उत्पन्न होत आहेत. मानस सुखदुःखनाम् हारक असे सच्चित्सुखरूप मूळ स्वरूप आहे, त्याला हरि म्हटलेलं आहे, म्हणून त्या दुःखवृत्तींचं हरण करून, भास्य भासकभाव विवेक प्रदान करून, त्या विवेकाच्या ठिकाणी बुद्धीला प्रेरणा करून, तिथे स्थिर करून भवहरण करणे हें शंकररुपी परमात्म्याचे कार्य आहे. इथे मानस जे सुख दुःख आहे त्याचे हरण करण्याचे कार्य चालले आहे. म्हणजे अद्यपि मानसाचे संरक्षण आहे. दुसऱ्या कोणत्याही भूमिकेमध्ये जीवात्मा असताना, सर्वही सूक्ष्म शरीराच्या संरक्षणाचे कार्य चालले आहे. प्रेरणा करणाऱ्या सवित्ररुप ईश्वराने प्रेरणा करता करता ज्यावेळेला अन्नमय, मनोमय, प्राणमय, विज्ञानमय, आनंदमय कोषाच्याही



पलिकडे ते मन जाते, म्हणजे सत्‌चित् सुखापर्यंत प्रेरणा येते तेव्हा मानसवृत्ती संपलेली असते. म्हणजेच उन्मनीवृत्ती उत्पन्न होऊन समाधि अवस्थेची सिध्दी झाली असते.

ब्रह्मज्ञान उत्पन्न झाल्यावरसुद्धा ते दृढ होण्याकरता तत्वज्ञान, मनोनाश, वासनाक्षय यांचा अभ्यास चालू ठेवला पाहिजे म्हणतात. म्हणून चौथ्या भूमिकेवर जरी ज्ञान झाले असले तरी ५वी आणि ६ वी भूमिका अद्याप आहे. व्युत्थानदशा त्यांच्या मध्ये सुद्धा आहे. ७ व्या भूमिकेवर गेल्यावरही व्युत्थान आहे. तोपर्यन्त ज्ञान झालेले असते. तरी सुद्धा समाधिला प्रतिबंध आहे ईश्वर प्राणिधानाने ज्ञान आलेलं आहे, परन्तु कार्य अद्यापि पुढे आहे ना! अंतराय मध्ये मध्ये येत आहेत. त्यामुळे वासनाक्षय आणि मनोनाश होणे याची जरुरी आहे. त्या करता हरिस्वरूपाचे जे चिंतन करायचे आहे ते या रुपाने आहे--मानस सुख दुःखानाम् हारकम्। द्वंद्वांना हरण करणारे म्हणजे मनोवृत्तींचाच उपशम झाला. ब्रह्मज्ञान झाल्यावर सुद्धा ईश्वरप्रणिधान पाहिजे, असे सिद्ध होते. म्हणजे ज्ञानदार्ढ्याचा अभ्यास केला पाहिजे असे म्हणतात. कारण व्युत्थान होते ना! समाधी अवस्थेमध्ये जीवन्मुक्ती सौख्य आहे. ती द्वंद्वातीत अवस्था आहे. पण सुषुप्ति अवस्थेप्रमाणे तीही अवस्था झाली ना ! काही काळ टिकणारी झाली. अद्यापि कर्म पारतंत्र्य सुटलेले नाही. ते कर्मपारतंत्र्य पूर्णपणे जाण्याकरता सर्वही मनोवृत्तींचा लय होणे, याची जरुरी आहे. मनोनाश झाला पाहिजे. त्या शिवाय खरी समाधिसिद्धी झाली नाही. म्हणून ५व्या, ६ व्या भूमिकेपर्यंत हा अभ्यास आहे.

सदाशिव ब्रह्मेंद्रांची गोष्ट सांगतात. ते ५ व्या ६ व्या

भूमिकेपर्यंत गेलेले होते. आधी मोठे विद्वान नंतर योगी मोठे झालेले. ब्रह्मज्ञानी. पण ब्रह्मज्ञान झालेले असले तरीसुद्धा व्युत्थानदशा आहे. टिपू सुलतानाच्या वेळी ते होऊन गेले असं सांगतात. ते असेच एकदा बाहेर पडले. जंगलातून चालले होते. त्या ठिकाणी कोणी एक मुसलमान सरदार शिकारीला आला. त्याचे तंबू ठोकलेले होते. त्यात जनाना होता. ह्यांना काहीच भान नाही, अंगावर वस्त्र नाही. एका तंबूत आत शिरून दुसऱ्या बाजूने बाहेर पडले. हे पाहिल्यावर तो मुसलमान सरदार रागावला आणि तलवार उपसून ह्यांचे दोन्ही हात छाटून टाकले. तरी सुद्धा यांना काहीही भान नाही. त्याला मागाहून पश्चाताप झाला. ह्याच्या मागोमाग तो जाऊ लागला. एका झाडाजवळ आल्यावर हे थांबले. व्युत्थान होऊन त्यांनी डोळे उघडले समोर त्या सरदाराला पाहून त्यांनी विचारले, ''का, बाबा कशा करता आलास?'' तो म्हणाला, ''महाराज माझ्याकडून अपराध झाला मी आपले हात तोडले'' हे म्हणाला, ''कुठे? काही नाही'' दोन्ही हात आले. श्रृंगेरीच्या आचार्यांनी त्यांचे स्तोत्र केले आहे.

त्यांची पूर्वीची अवस्थाहि एका सुभाषितात वर्णन केली आहे. मोठे योगी होते, ज्ञान झाले होते, तरी वासना क्षयाचा अभ्यास पुढेही का चालू ठेवला पाहिजे हे पटवून देण्याकरता ही गोष्ट सांगतात. सदाशिव ब्रह्मेंद्र एकदा गावाबाहेर एका शेतात पडले होते म्हणतात. पण त्यांनी आपले डोके एका मातीच्या ढेकळावर ठेवले होते. गावातली काही मंडळी त्यावेळी तिकडून चालली होती. ह्यांना बघून ती म्हणाली, ''हा योगी मनुष्य, याला उशाला कशाला पाहिजे?'' आता ह्यांनी काय उशी आणली होती का



उशाला घरातली! आपलं मातीच्या ढेकळावर डोकं ठेवलं होतं. तरी ते लोक बोललेच आणि पुढे गेले.

ह्यांनी ते बोलणे ऐकले वाटते. वृत्तीचा उपशम अद्यापि झालेला नव्हता. ते संबंध मातीचा ढेकूळ डोक्याखालचे ह्यांनी काढून टाकले आणि तशीच मान अधांतरी ठेवून निजून राहिले. तेवढ्यात ती मंडळी तिकडून परत आली आणि ह्यांना अशा अवस्थेत पाहून म्हणाली, ''याला एवढा तरी अभिमान कशाला पाहिजे? काय आम्ही एवढं बोललो तर काय झाल? '' म्हणजे उशाला घेतलं तरी चूक न घेतलं तरी चूक! आचार्य म्हणतात ''श्लाघावारवधूटिचे'' हे दास होतात. त्यांना सुद्धा श्लाघा करून दाखवावेसे वाटते पुढे काही नाही, ममता नाहीच. शरीराचे भानही नाही. म्हणजे या भूमिकेपर्यंन्त गेलेले आहेत. तत्व साक्षात्कार झालेला आहे. तरी सुद्धा अद्यपि प्ररब्धकर्म आहे. उत्थानदशा होते आहे, आता त्या प्रारब्धकर्माच्या वेळेला विवेक, वैराग्य, चिकित्सा,दाढर्यहि असेल. पण मिथ्यात्व बुद्धि झाली पाहिजे ना! द्वंद्वातीत अवस्था म्हणजे द्वैतभाव जाऊन द्वंद्वातीत होणं. ही अतिशय कठिण आहे. द्वैतभान होत असेल तर पुन्हा मनोवृत्ती तिथे गेली, तर काय करायचे? काही सांगता येत नाही.

म्हणून हा अभ्यास त्यांनाही सांगितला आहे. ईश्वर-प्रणिधानाचा अभ्यास असला पाहिजे, ज्ञानाच्या वेळेला सुद्धा ईश्वरभक्तीची जरुरी आहे असा शास्त्रकार सांगतात.

तर 'मानस सुखदुःखानाम् हारकम्' हे हरिचे स्वरूप आहे. आतापर्यंत केलेले ध्यान हे या वेळेपर्यंत चालू असले पाहिजे. पद्मपादाचार्यांना आचार्य महाराजांनी तीन वेळेला प्रस्थानत्रयी

सांगितली होती. ते आचार्यांचे पहिले शिष्य होते, त्यांना काय ब्रह्मसाक्षात्कार व्हायचा राहिला असेल काय? परंतु त्यांची नृसिहांची भक्ति कायम होती. त्यामुळे आचार्यांना मारण्याकरता उग्र भैरव येतोय हे त्यांना दिसले. म्हणून ते नृसिंहरुप धारण करून गेले आणि भैरवाला मारले. संन्यासी असून सुद्धा हिंसा अहिंसा असा विवेक नाही. पूर्ण द्वंद्वातीत अवस्थाच त्यांना मिळाली. उपास्य रुप होणे. त्यांची उपासनाही चालू आहे. पण पूर्ण मनोनाश जर झाला नाही, उन्मनी अवस्था प्राप्त झाली नाही, समाधि सिद्धी कायमची झाली नाही, तर त्याबद्दल सुद्धा कथा दिलेली आहे शांकरविजया मध्ये.

आचार्याचा आपला सकाळच्या वेळेला प्रस्थानत्रयीचा पाठ चालायचा. ही मोठी मोठी मंडळी सर्व शास्त्र निष्णात्. उपासनाबलही आहे. ''ददामि बुद्धीयोगंतं'' हे ही बल मिळालेले आहे. ईश्वराची कृपा पूर्ण आहे. हे सगळं आहे. गुरुभक्ति आहे. त्यांचा गिरी नावाचा एक शिष्य होता. केवळ भक्ति आहे. गुरुंच्या ठिकाणी पूर्ण श्रद्धा आहे, आपल्या सद्गुरु महाराजांची सेवा चालली आहे, एके दिवशी सगळी शिष्य मंडळी पाठाला येऊन बसली. ते गिरी यायला थोडा वेळ लागला. नदीवर गेले होते. छाट्या वगैरे धुवून कमंडलू भरून पाणी घेऊन येत होते. बाकीच्या मंडळींनी विचारले, पाठ सुरू करायचा का गुरू महाराज? आचार्य म्हणाले, 'थांबा तो गिरी येऊ दे की' पद्मपादाचार्य त्यावेळेला म्हणाले, भिंतीकडे बोट दाखवून ''काय गिरीची प्रतिक्षा करायची?'' म्हणजे भिंत आणि गिरी सारखेच, त्याला काय कळतंय! हे जेव्हां पद्मपादाचार्यांचे आचार्यांनी पाहिले त्या वेळेला



काही बोलले नाहीत आचार्य.

इथपर्यंन्त बुद्धिदान मिळालेलं आहे, ईश्वर कृपा आहे, गुरुकृपा आहे. सकळे ज्ञान आचार्यांच्या मुखातून मिळालं आहे. परंतु गिरीबद्दल हा जो अनादर त्याच्या मुखातून निघाला तो योग्य नव्हता गिरी नदीवरून परत येत असतानाच आचार्यांनी सर्व विद्या त्याला संकल्प शक्तितून देऊन टाकल्या आणि ते गिरी जे आले ते

**भगवन् उदधौ मृतीजन्मजरे**
**झशे पतितं व्यथितं**
**कृपया शरणागत उद्धरमाम्**
**अनुशाधि उपसन्नमनन्नगतीम्!**

अशी त्रोटक वृतात स्तुति करीतच आले. मनानेच शक्ती त्याला देऊन टाकली. किंवा त्याची शक्ती जागृत केली. शक्तिपात त्याच्यावर केला. पात याचा अर्थ शक्ती जागृत होणं. आचार्यांच्या मानसिक संकल्पशक्तिनेच त्या गिरीची शक्ति जागृत झाली. सगळा वासनाक्षय झाला, सगळं झालं आणि एकदम त्यांना वरच्या भूमिकेवर घेऊन गेलें. तर अशी ही लोकोत्तर गुरुशक्ति आहे. देवाने जरी बुद्धि दिलेली असली तरी सुद्धा सगळं कार्य चाललेलं आहे अनुष्ठान चाललेलं आहे. पण उन्मनिभाव होऊ शकत नाहीं मनामध्ये व्युत्थानदशेत असे विकार उत्पन्न होण्याचा संभव असतो.

सातव्या भूमिकेपर्यंन्त जाईपर्यन्त हे सर्व (अभ्यास) चालू राहिलें पाहिजेत. ते कार्य करायचे म्हणजे मानससुखदुःखानाम हारकमजरुपम् हे कार्य शेवटपर्यंत चाललेलं आहे

"क्लेशकर्मविपाकायशै: अपराविष्ठ पुरुषविशेष ईश्वरा"
योगसूत्रकार म्हणतात

काहीहि संबंध नाही, पण हा संबंध ठेवला पाहिजे ना! शक्ति काही तरी आहे, त्या शक्तीचे कार्य दाखविले पाहिजे. या शक्तीचा कार्य संपादन करणारा जीवात्मा जगाचा द्रष्टा, दृश्य हे सगळ एकदमच जाणार आहे, हे जायचे म्हणजे कृपा पाहिजे ना! अभ्यासदशेमध्ये आणि ब्रह्मज्ञान झाल्यानंतर सुद्धा, फलप्राप्तीला अंतराय येतात.

म्हणून, हरिचे कार्य त्यांनी दाखविलेलं आहे आणि शेवटी प्रार्थना केली आहे. हे सद्चित सुखरुप म्हणजे सर्व भासक आहे त्रिकालाबधित आहे. इतर सर्व भासक त्रिकालाबाधित आनन्दरूप आहे. काल मर्यादा नको आहे. त्याच प्रमाणे नित्य प्रकाश असला पाहिजे. आणि आनन्दही असला पाहिजे एवढीच अपेक्षा आहे. त्या मूल स्वरूपाच्या चिंतनामध्ये माझी बुद्धी रहावी आणि त्याचे ध्यान करता करता ही भेदावली सगळी दूर होते म्हणून उपक्रमातही त्यांनी सांगितले आहे--

**जय सवितर्गजमुखनगतनये ईश हरे।**

असे ध्यान केले आहे. पंचायतने म्हणजे ही अशी आहेत. एकच ईश्वर आहे पण जीवांच्या करता ही भिन्न भिन्न कार्ये चालू आहेत. सृष्टीला जीवांचे कर्मही त्यांनी निमित्त कारणामध्ये मानले आहे. काल कर्म, अविद्या शक्ति ही आहेतच. जीवाची कर्मे जर घेतली तर त्या कर्माप्रमाणे फल देण्याकरता हे सगळं कार्य चालू आहे

म्हणून असं जरी कर्म चालू असलं तरी त्याचं सत्‌चित् सुखरुपत्व कायम आहे. आचार्य महाराजांनी सूत्रभाष्याच्या



उपक्रमातच हे दोन्ही वर्णन केलेले आहे, --'सर्वज्ञ सर्व शक्ती समान्वितंच नित्य शुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव' म्हणतात, ब्रह्म शब्दाचीच व्युत्पत्ती करायला लागलेले असताना ते नित्य आहे, त्यांची वृद्धि त्यांचे महत्व इतके आहे की बाकी सर्वही अनित्य आहे, हे मात्र नित्य आहे. तेव्हा अनित्यत्वापेक्षा अत्यंत भिन्न आहे. त्याला कालमर्यादा नाही. नित्य या शब्दाने ब्रह्मत्व सांगितलेले आहे. हे शुद्ध आहे बाकी सगळं अशुद्ध आहे. बुद्धिज्ञान स्वरूप आहे. असं असून सुद्धा सर्वज्ञ सर्व शक्ति समन्वितच म्हणताहेत आचार्य. कार्य करायच आहे ना! जगत् कार्य करायच आहे, त्याकरता ते सर्वज्ञ आहे व सर्व शक्ति समन्वित विशुद्ध सगुण व निर्गुण तेच आहे. निराकार असून साकारही तेच आहे.

बुद्धिवादी पुष्कळ म्हणतात निराकाराला आकार कसा येतो? अग्निला आकार कुठे आहे? पण अग्निला काष्ठाचा आकार येतो की नाही! तसं निराकार ईश्वराला आकार दिला म्हणून बिघडलं कुठे? तो काही स्वाभाविक आकार नाही. औपाधिक आहे. 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे --' ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, दोन्ही रूप एकच आहेत. एकत्वाच्या अनुसंधानामुळे शोक मोह सगळे दूर होतात. सोळा हजार स्त्रिया त्यांची मूलं बाळं, एकंदर सर्व यादवकुल नष्ट झाले असताना सुद्धा (भगवंतला त्याचं) काही नाही. 'को मोह: की शोक: एकत्वमनुपश्यत' म्हणून सगळेही मनोविकार, सर्व द्वद्वांची निवृत्तीही त्याच ईश्वराकडून होते आहे.

हरिस्वरुपाचे द्वंद्व निवृत्तीचे काम चालू आहे. सुखभासक स्वरुपाने भास्य भासक विवेक प्रदान करून भास्याचं अनित्यत्व

पटवून वैराग्य दृढ करण्याचे कार्य शंकर रूपाने चाललेले आहे. सर्वही एकंदर जे भास्य पदार्थ आहेत त्याचं भान होणे हे कार्य नगतनया रुपाने चाललेलं आहे. भौतिक शरीरापासून सूक्ष्म शरीराचे संरक्षण शेवटपर्यंत करण्याचे कार्य गणपतिरुपाने चाललेले आहे. आणि तशी बुद्धि देऊन त्या त्या साधन भूमिकेवर त्या जीवाला नेणे, कर्मपरतंत्र जीव असताना सुद्धा त्याच्यावर कृपा करून सर्व योगक्षेम निर्वाह बुद्धि त्याला प्रदान करणे हे कार्य सवित्र रुपाने चालू आहे.

ईश्वर निरनिराळ्या रुपात भासला तरी एकच आहे, घरामध्ये असलेले दिवे ज्या वीजेवर चालतात, आगगाडीला जोडलेले इंजिनही त्याच विजेवर चालते. ज्या ज्या ठिकाणी अशी कार्ये चालतात तिथे एकच वीज आहे. तेज एकच आहे. तशी निरनिराळ्या कार्याकरता वेगळी वेगळी कनेक्शन केली असली तरी वीज एकच आहे. इथली जरी वीज सकाळी गेली तरी इंजिनाला मिळणाऱ्या वीजेचे कार्य चालूच आहे. तसे सर्वही इंद्रियांच्या देवता जरी वेगळ्या असल्या तरी त्या सुद्धा जीवरूप आहेत. त्या देवांनाही तशाच प्रकारची बुद्धि पाहिजे आहे. सर्व भान, सर्व संरक्षण करणे प्रेरणा करणे, विवेक प्रदान करणे आणि शेवटी सर्वही मनोवृत्ती थांबवणे, नाहीशा करणे अशी सगळी जीवाला अपेक्षित असलेली सर्व कार्ये करण्याकरता एकाच ईश्वररुपाने कार्य चाललेले आहे, असे या आरती मध्ये महाराजांनी चिंतन केले आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

□□



# चित्तशुद्धीची पराकाष्ठा

## सहस्त्र चंद्रदर्शन सत्कार समारंभात प. पू. दत्त महाराजांनी मांडलेले विचार

भगवान् सांगताहेत की ज्ञानासारखे दुसरे पवित्र काहीही नाही. 'सर्वदर्शन संग्रह' या ग्रंथात माधवाचार्यांनी सर्वही विचारवंतांचे विचार एकत्र मांडले आहेत, सर्वांनी त्यांचा विचार करावा हा त्यांचा उद्देश आहे. भगवंतांनी सांगितलेली स्थितप्रज्ञाची भूमिका शास्त्रीय उपायांचा अभ्यास करून मिळवायची आहे. सर्वदर्शन संग्रहाच्या भूमिकेमध्ये महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकरांनी दोन दृष्टी दिल्या आहेत. चार्वाकदर्शनाने त्याचा आरंभ आहे. पुढच्या दर्शनाने मागच्या दर्शनाचं खंडन केलं आहे, असा एक विचार त्यांनी मांडला आहे. अथवा हा सर्वही विचारांचा समन्वय आहे ही भूमिकासुद्धा त्यांनी विशद केली आहे.

खंडन म्हटलं की आपल्या बुद्धीत कदाचित अभिमान अभिनिवेश उत्पन्न होण्याचा संभव असतो. पण समन्वय पद्धतीने विचार केला असता बुद्धीचा विकास कसा होत जाणे शक्य आहे ते कळते. आपल्या जवळ कोणती भूमिका आहे हे समजून घ्यायला त्याचा उपयोग होतो.

ज्ञानाला किंवा बुद्धि विकासाला काय काय साधने असावीत याबद्दल 'अद्वैत सिद्धी' या ग्रंथाच्या आरंभी 'मधुसूदन सरस्वतींनी

थोडासा स्वत:बद्दलचा उल्लेख केला आहे.

'सहस्त्रचंद्र दर्शन शांती' या समारंभाचे वर्णन आत्तापर्यंत सर्वांच्याकडून झालेले आहे. शास्त्रीय कर्म आहे ते. शास्त्रीय कर्म हे हितकारक, कल्याणकारक असते. या दृष्टीने ही योजना झाली. पण विचार केला असता दुसरी एक दृष्टी दिसून येते ती अशी की सत्कर्म ज्या ठिकाणी घडतात त्या ठिकाणी सामुदायिक जी ईश्वर शक्ती आहे त्या ईश्वर शक्तीचा विशेषरूपाने आविर्भाव झालेला दिसतो.

ऋक् संहिता स्वाहाकार या ठिकाणी झाला. त्या श्रवणाकरताही मंडळी येऊन बसत होती. दहादहा हजार मंत्र ज्यांनी कंठस्थ केले आहेत, तपश्चर्या केली आहे, अशा मंडळींच्या मुखातून मंत्र कधी संपला, स्वाहा: कधी निघाले आणि पुढचा मंत्र कधी सुरू झाला, हे सुद्धा लक्षात यायचे नाही. त्या नंतर आणखी पंचायतन याग झाले आहेत. प्रत्येक देवतांच्या प्रितिकरता याग झाले. तसेच 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वलभ दिगंबरा' नाममंत्राचंही अखंड, अविरत या ठिकाणी मंडळींनी भजन केलं आहे - ते श्रवण करण्याकरता जाऊन बसलं म्हणजे वाणीला द्रुत गती केव्हा आली किंवा पहिल्या प्रमाणे मंद गती केव्हा आली हे सुद्धा लक्षात यायचे नाही.

बाह्य विषय हे सगळे विसरून जाणे हे अंतिम समाधान आहे. शांती, आनंद ज्यांना लाभलेला आहे अशी मंडळी अत्यंत श्रद्धेने इथे कर्म करताहेत. तेही पहायला मिळालं. विषय विसरून जाणे. महत्त्वाचे आहे. 'तेथ उत्पत्ती आघवी विसरीजे।' ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. निर्विशेष समाधान हे सामुदायिक शक्तीचा अविर्भाव



झाला म्हणजे मिळते. कार्य करणाऱ्या मंडळींचे चार पांच महिने काम चाललेले आहे. आर्वीकर, अध्यक्ष महोदय दाते शास्त्री, त्यांना मदत करणारी अनेक मंडळी आहेत राजेश्वर शास्त्री मुद्दाम धारवाडहून हेलपाटे घालतात. त्यांच्याकडेही आचार्य पीठाची सेवा करायचे कार्य आहे पण ते सांभाळून आचार्यांच्या अनुज्ञेने इथे येऊन कार्य करतात. अशा या सर्व कार्य करणाऱ्या मंडळींच्यामध्ये ईश्वर शक्ती जागृत झाल्यामुळे हे कार्य घडलेले आहे.

गुरु महाराजांचे हे शक्ती पीठ आहे - शक्ती जागृत करणे, आविर्भूत करणे हे विशेष कार्य त्यांच्या परंपरेत आहे. या ठिकाणी आता सातआठ दिवस शक्ती विशेषत्वाने जागृत झालेली आहे, आविर्भूत झाली आहे असे म्हणायला काय हरकत आहे? त्याशिवाय एक मताने, सामंजस्याने सर्वही कार्य कशी पार पडतील? अशा तऱ्हेची जी काही श्रद्धा भक्तीने झालेली पुण्य कर्म असतील, त्या पुण्यकर्मांच्या वेळेला, शक्तीचा आविर्भाव कसा असतो, समाधान कसे मिळते हे समजून येते.

'परित्राणाय साधुनाम्, विनाशाय च दुष्कृताम्' हे भगवंतांच्या आविर्भावाचे गौण प्रयोजन आहे. धर्म संस्थापना हे मुख्य आहे. तर साधूंचे संरक्षण करणे आणि असाधुंचा विनाश करणे याचा अभिप्राय असा असेल की असाधुत्व ज्यांच्या ठिकाणी आहे अशा व्यक्तींचा नाश कधीच होत नाही. जीवरूप हे नित्य आहे असे भगवान् सांगतात. तर या ठिकाणी असाधुंचा विनाश म्हणजे असाधुत्वाचा विनाश. 'जे खळांची व्यंकटी सांडो' 'म्हणजे दुष्टांना त्यांचा दुष्टपणा सोडून जावो' म्हणताहेत ज्ञानेश्वर

महाराज. 'खळांचा नाश होवो' असे म्हणत नाहीत ते याच उद्देशाने असेल.

आणखी दुसरे साधुत्व! साधुंचे परित्राण म्हणजे साधुत्वाचे परित्राण! साधुत्वाचं रक्षण करणं आणि असाधुत्वांचा विनाश करणं, हे भगवंताचं कार्य आहे. त्या करिता ती भगवत् शक्ती आविर्भूत होत असते वेळोवेळी! ती अशाही रूपाने कलीयुगामध्ये आविर्भूत होत असली पाहिजे. या आविर्भूत झालेल्या शक्तीचा जसा आविष्कार झालेला आहे त्या प्रमाणे गुरू रुपाने असणारी जी ईश्वर शक्ती आहे तीही आज आपल्यासमोर या ठिकाणी आहे.

मुद्दाम महाराज बेंगळूरहून या ठिकाणी आले. आणि साक्षात् ईश्वराभिन्न असणारी गुरु शक्ती, तीही आपल्यासमोर आहे. हेही आपल्याला पहायला मिळतय. तर हा सगळा ईश्वर शक्तीचा आविर्भाव झालेला आहे. त्यात विशेष आणखी सर्व अहंकार नाहीसा झाल्यानंतर खरं समाधान आहे; ते प्राप्त होतं अनुभव घेणाऱ्याला. असं असतांना अशा ईश्वरशक्तीचा आविर्भाव ज्या ठिकाणी झालेला आहे, गुरु शक्तीरूपाने प्रत्यक्ष आशीर्वाद देण्याकरता ती राहिली आहे, त्यांच्याजवळ एक संशय आम्ही व्यक्त करणार आहोत आज.

वस्तुतः यात अश्रद्धेचा भाग नाही आहे. पोहायला पाण्यात उतरल्यावर आपल्याकडे कोणी तरी लक्ष देणारा आहे, उत्तम पोहोणारा की जो आपण बुडून तळाशी जरी गेलो तरी आपल्याला वर काढू शकतो. तो आपल्याला पाण्यामध्ये बुडू देईल कसा, ही श्रद्धा आहे. परंतु या ठिकाणी सर्व व्यक्तीविशेष गेले पाहिजेत ना!

ईश्वर स्वरूपाचे ज्ञान होण्याकरता भगवंतांनी ज्ञानाची साधना



सांगितली आहेत. सर्वांच्या हृदयामध्ये ईश्वर शक्तीचा आविर्भाव झालेला आहे हे गृहीत धरून त्या ईश्वर शक्तीपुढे ही शंका मांडतो आहे फक्त.

तर ही जी सगळी साधने आहेत यालाच साधुत्व असे म्हणतात. ह्या साधुत्वाचं संरक्षण करायचं आहे भगवंताला, ईश्वर शक्तीचा आविर्भाव त्या करता आहे. असं असताना वैयक्तिक दृष्टीने महाराजांनी कौतुक केलं असं म्हणायला हरकत नाही, आशीर्वाद दिला.

परंतु साधुत्वाच परित्राण याच्या योगाने कसे होईल? भीती आहे ना! 'पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ती कानी नायकावी।। हा आमुका ऐसी नोहावी। सेची लोका।।' शंका आहे, संशय आहे.

'छिद्यन्ते सर्व संशयात' ही भूमिका फार मोठी आहे. अनेक जन्मांनी ती मिळणारी आहे. तोपर्यंत संदेह आहे.

तर हे जे साधुत्व आहे या साधुत्वाला हे सगळं प्रतिबंधक अशा प्रकारचं होणं शक्य आहे का? हा एक संदेह आहे. ईश्वर शक्तीचा आविर्भाव झाल्यामुळे हे मांडावस वाटत आहे. कर्तव्य आहे. आपण सगळ वर्णन केलत. परंतु साधुत्व मिळवणं अतिशय कठीण आहे. ते मिळालं असताना त्याला प्रतिबंधक असं जर काही घडलं तर मिळालेलं साधुत्व जाईल काय? मिळालेलं म्हणजे लोकांनी म्हटलेलं आहे.

**समर्थांच्या घरचे श्वान ।**
**त्यासही सर्व देती मान ।।**

अशी वस्तुस्थिती आहे.

तर हा संशय आपल्या सर्वांच्या हृदयात जागृत झालेल्या ईश्वर शक्तीपुढे मांडलेला आहे. त्या संशयाची निवृत्ती करायला 'कर्तुम अकर्तुम' ईश्वर शक्ती समर्थ आहे. पण प्रतिबंधक असं काही होऊ नये अशी त्या जागृत झालेल्या ईश्वर शक्तीजवळ प्रार्थना आहे.

**ईश्वर सर्वभूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ।।**
**तमेव शरणं गच्छ सर्व भावेन भारत ।**
**तत्प्रसादात परां शांतिम् स्थानम् प्राप्स्यसि शाश्वतम् ।।**

असं आश्वासन त्यांनी दिलेलं आहे. प्रतिबंधक अशा प्रकाराचं जरी ते कार्य भासलं तरी 'विषमपि अमृतम् क्वचित भवेत् .....'

द्रौपदीची विटंबना होण्याचा प्रसंग आला असता, काही कार्य सामुग्री नसताना, ती वस्त्र कशी उत्पन्न झाली? या चमत्काराचा परिणाम धृतराष्ट्रावर होऊन त्याने द्रौपदीला वर मागायला सांगितला. ती म्हणाली 'आम्ही स्वतंत्र झालो असं सांगा आम्हाला राज्य नको आहे.' म्हणजे ईश्वर कृपेने ती मुक्त झाली आहे.

तेव्हा ही ईश्वरकृपा आपल्यावर आहे म्हणून आपल्या हृदयात ईश्वर शक्ती जागृत झाली. म्हणून हा अशा प्रकारचा उत्सव उत्तम रीतीने पार पडला आहे. केवळ मानवीय शक्तीच्या योगाने हे होणे शक्य नाही. विधिज्ञांनी पुष्कळ विधी केले परंतु अशा प्रकारचं हे कार्य सात दिवसपर्यंत अखंड चालू रहाणं, व्यवस्थितपणाने पार पडणं ही ईश्वर कृपा आहे. व्यावहारिक कार्य काय किंवा



पारमार्थिक कार्य काय सगळी सांगणारी मार्गदर्शन करणारी अशी मंडळी गुरू स्थानातून या ठिकाणी आलेली आहेत. आणि त्यांचे व्यवस्थित मार्गदर्शन होऊन हे कार्य पार पडलेलं आहे.

जाता जाता आपल्याजवळ एक संशय व्यक्त केला. महाराज या ठिकाणी उपस्थित झालेले आहेत. हे गुरू स्वरुपही आहे. त्यांचेही आशीर्वाद मिळालेले आहेत. तेव्हां आपल्या सर्वांच्या हृदयात जागृत झालेल्या ईश्वरशक्तीची कृपा अनेक जन्म लाभावी आणि ईश्वर प्राप्तीची योग्यता यावी एवढीच त्या ईश्वरशक्तीच्या चरणी प्रार्थना.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुनेव दत्त ।।**

□□

# सर्वे सन्तु निरामयाः

## ('श्रीतुळजाभवानी आरोग्यधाम पुणे इथल्या उद्‌घाटन प्रसंगी प. पू. महाराजांनी मांडलेले विचार)

**या देवि सर्व भूतेषु बुद्धिरूपेण संस्थिता।**
**नमः तस्यै नमः तस्यै नमः तस्यै नमो नमः ।।**

मर्यादा पुरूषोत्तम भगवान् रामचंद्रांचा आज जयंति दिवस आहे. शास्त्रकारांनी धर्ममर्यादा घालून दिलेल्या आहेत. त्या धर्ममर्यादांचे संरक्षण करणे हे त्या ईश्वराच्या अवताराचे कार्य आहे. ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराज, नामदेव महाराज, तुकाराम महाराज यांच्यासारख्या ईश्वररूप झालेल्या महात्म्यांना कर्तव्य कांहीही उरलेले नाही. परंतु

**सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः**

हा संकल्प मात्र त्यांचा आहे. वासना कोणचीही असू नये म्हणतात. वासना ही मोक्षाला प्रतिबंधक आहे.

पण सर्वेपि सुखिनः... ही वासना जर संत महात्म्यांच्या मनांत नसती तर सर्वांचे कल्याण कसे झाले असते? सर्वांना सुख मिळावे, सर्वही निरामय असावेत. आरोग्यसंपन्न सर्वही असावेत ही संत महात्म्यांची भावना, इच्छा, वासना आहे. आणि त्यांचा वशिला प्रत्यक्ष विश्वेश्वराजवळ आहे. विश्वेश्वरालाही ते नाकारता



येणार नाही. हे विश्व ज्याने निर्माण केले त्या विश्वाच्या कामामध्ये सहाय्यभूत हे सगळे संत महात्मे आहेत ना! स्वार्थ त्यांच्याजवळ बिलकुल नाही.

तर सर्वांनी आरोग्यसंपन्न रहावे हीच संत महात्म्यांची इच्छा आहे. त्याला पुष्कळ प्रतिबंध उत्पन्न होऊ शकतात. कांही पूर्व कर्मामुळेही आरोग्य बिघडते. परंतु आरोग्य प्राप्त होण्याकरता अनेक प्रकारची साधनं, शास्त्र ही देखिल ईश्वराने निर्माण केली आहेत. त्या आरोग्य-शास्त्राचा अभ्यास करणारी मंडळीही पुष्कळ आहेत. त्यांच्या सहाय्याने, त्यांच्या बुद्धीने आरोग्य प्रतिबंध कशाने झाला हे समजून घेऊन ते औषध योजना करू शकतात. हे एक मुख्य महत्वाचे कार्य आहे.

भारतीय संस्कृतीचा हा समाजवाद आहे. समाजवाद पूर्वी कोणाला माहीत नव्हता असे नाहीये. एक वैय्यक्तिक सुधारणा होत जाणं आणि समाजामध्येही सुधारणा होत जाणं. कारण समाज हा व्यक्तींचाच बनलेला आहे. एका व्यक्तीला जे कार्य करता येणार नाही ते, लोकशाहीने म्हणा समाजाने म्हणा, करायचे आहे. त्यात शास्त्रकारांनी

**सर्वे सन्तु निरामयाः**

हे प्रथम घातले आहे. आरोग्य संरक्षण सर्वांचे व्हावे, हे समाजवादाचे मुख्य उद्दीष्ट मनुराजाने सांगितले आहे. मनु राजा क्षत्रिय असूनही त्याची योग्यता इतकी होती की सर्व ऋषि मंडळी त्याच्याकडे जाऊन म्हणाली, ''आपण मोठे समाजशास्त्रज्ञ आहात, आम्हाला आपण आमची कर्तव्यकर्म समजावून सांगा''.

आणि त्यावेळी मनुराजाने सर्व समजावले आहे.

सर्वही एकंदर प्रजानन सुखी असावेत. ऋषि मंडळींनी किती तरी शास्त्र निर्माण करुन ठेवली आहेत. पशुंची चिकित्सा कशी करावी हे देखिल सांगितले आहे. सर्व औषधांचे ज्ञान त्यांनी करून दिलेले आहे.

**सर्वे सन्तु निरामया:**

हा संकल्प आहे सत्पुरुषांचा. नुसतेच स्त्री, पुरुष नव्हे तर संपूर्ण विश्वामध्ये राहाणारे पशुपक्षीसुद्धा निरामय झाले पाहिजेत.

दुसरे अन्नदान करायला सांगितले आहे. एखाद्या नैसर्गिक किंवा अन्य आपत्तीमुळे राजशासनाला बेघर झालेल्या लोकांना अन्न देण्याची योजना करावी लागते ती निराळी आहे. पण

**जे का रंजले गांजले ।**
**त्यासी म्हणी जो आपुले ।**
**तोची साधु ओळखावा ।**
**देव तेथेची जाणावा ।**

हे तुकाराम महाराज सांगताहेत.

आधिव्याधि प्रत्येकाला आहेत. नाहीत कोणाला? त्या आधिव्याधींपासून जीवांना मुक्त करणं ही मोठी जबाबदारी आहे. आणि हा व्यवसाय करणारी डॉक्टर म्हणा वैद्य म्हणा जी मंडळी आहेत त्यांच्यावर तर ही जबाबदारी विशेष आहे. त्यांना ते सगळे ज्ञान आहे ना! कोणचा रोग किती झालेला आहे, किती वाढलाय, किती कमी झालाय, औषधाचा अुपयोग किती झालाय हे सगळे



रोज अनुभव घेऊ शकतात ते. औषध घेणाऱ्या रोगी पुरूषाला एकट्याला अनुभव येईल. कोणाला कोणता रोग आहे याचे शास्त्रीय ज्ञान त्यांना आहे. आणि तशी नैसर्गिक बुद्धि जर ईश्वराने दिली असेल तर त्याच्यामध्ये दयाभावही त्यांना राखता येतो आणि सर्व कार्य ते करू शकतात.

तर सर्वांनी निरामय राहावे म्हणून भारतीय समाजवादामध्ये शास्त्रकारांनी हे कार्य मुद्दाम घातलेले आहे.

आमच्या भारतीय संस्कृतीत दोन सुधारणा आहेत. वैय्यक्तिक सुधारणेसाठी पुष्कळ कर्तव्य धर्म सांगितले आहेत. अर्जुनाला केलेला भगवत् गीतेचा उपदेश अर्जुनाच्या वैय्यक्तिक सुधारण-साठीही आहे आणि सर्व विश्वाला मार्गदर्शन करण्यासाठीही आहे. भगवान् म्हणतात, अर्जुन निमित्त आहे. तर या आरोग्य सुधारणेच्या कार्याला प्रतिबंध असण्याचे कांहीच कारण नाहीये. आरोग्य नको कोणाला? आरोग्याशिवाय प्रपंच तरी कसा होईल आणि परमार्थ तरी कसा होईल? आरोग्य जर नसेल तर राष्ट्रकार्य तरी कसे करता येईल? सद्गुरु लोकनाथतीर्थ स्वामी महाराज हे बंगाल प्रांतातील मोठे तपस्वी पुरूष, मोठे त्यागी महात्मे. महाराजांचे ते दीक्षा गुरु. त्यांचे स्मारक म्हणून 'तुळजाभवानी आरोग्यधाम' हे महाराजांच्या या स्थानात सुरू झालेले आहे, मागच्या वर्षी. आज याचे उद्घाटन झालेले आहे. शिवाजी-रावांसारखे सात्विक प्रकृती घेऊन जन्माला आलेले महात्मे आज आपल्याला मिळालेले आहेत. अनुभवी डॉक्टर वैद्यही मिळालेले आहेत. अशा अनुभवी मंडळींच्या अनुभवांचाही विचार करून कार्य करणारी मंडळी आहेत. त्यांच्या कार्याला निश्चित यश येणार आहे.

स्त्रियांच्याकरता म्हणून हा एक विभाग सुरु झालेला आहे. स्त्रियांच्याबद्दल आपल्या महर्षि, शास्त्रकारांवर मोठे मोठे आक्षेप घेतले जातात, सभा संमेलने होतात. स्त्रियांच्याबद्दल शास्त्रकार पक्षपाती आहेत वगैरे वगैरे ऐकतो, वाचतो आपण. पण तसं नाहीये. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ ऋषिंनी ज्याच्याजवळ जाऊन ''सर्व समाज धर्म आम्हाला ऐकायचेत. आपण सांगा'' म्हणून सांगितले त्या मनुराजाने स्त्रियांच्याबद्दल सांगून ठेवलेले आहे.

जमाखर्चाचे काम स्त्रियांकडे द्यावे असे पहिल्या प्रथम मनुराजा सांगतो आहे. म्हणजे मनुराजाची इच्छा अशीही मानायला हरकत नाही की राष्ट्राचा अर्थमंत्री स्त्री असली पाहिजे. तर व्यवहार बरोबर होईल. अर्थमंत्री नि:स्पृह असला पाहिजे. आणि तो योग्य विचार करणारा असला पाहिजे, अशीही त्याची इच्छा असू शकेल. मनुराजा पक्षपाती नाही. त्या नंतर तो सांगतो स्त्रियांनी शुचिता पाळावी. पवित्रपणा, पापभीरूता त्यांच्या मनांत असल्यामुळे पावित्र्य संरक्षण स्त्रियांनी करावे असे सांगतात. धर्म संरक्षण त्यांनी करावे. पुरूष धर्म कोणचे, स्त्री धर्म कोणचे, मुलांचे धर्म कोणचे, समाजामध्ये असणाऱ्या व्यक्तींचेही धर्म कोणचे, हेही आपल्या बुद्धीने पटवून देणे, सांगणे. ही स्त्रियांवर जबाबदारी आहे. स्वयंपाक स्त्रियांनी करावा हे मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे, इथे वाद निर्माण होतो. त्याचा उद्देश काय असला पाहिजे याचा विचार कोणी करायचा?

घरात राहून स्वयंपाक करायचा, नोकरी करायची नाही, परदेशामध्ये किती स्त्रिया नोकरी करतात, केवढी समृद्धि आहे, स्त्रियांना किती स्वातंत्र्य आहे वगैरे वगैरे ऐकतो आपण, पहातो



आणि त्याचा परिणाम आपल्या मनावर होतो.

स्वयंपाक करणे याबद्दलही संशोधन करून पुष्कळ विचार केलेला आहे. ऑपरेशन करायच्या वेळेलाही पोषाख निराळा पाहिजे. ती उपकरणे उकळत्या पाण्यात घालून व्यवस्थित शुद्ध करून घेतली जातात. याच्यामध्ये दिसायला काय आहे? साधन म्हणून जे आहे त्यात शुचिता पाहिजे. स्वच्छता निराळी आणि शुचिता निराळी. वास घेतलेले फूल देवाला वाहायला काय हरकत आहे? नाही, गेलं ते. वास घ्यायचा नाही. स्वच्छतेच्या दृष्टीने त्यात कांहीच नाही. म्हणजे शुचिता ही फक्त शास्त्रगम्य आहे. शास्त्रीय अभ्यास करणारी ज्याची बुद्धि आहे त्याच्या बुद्धीला ते पटणार आहे. तेव्हां या दृष्टीने मनुराजाने स्वयंपाक करायची जबाबदारी स्त्रियांवर टाकली आहे. काया वाचा मनाने स्त्रियांना पवित्र राहायला सांगितले आहे. आणि वैय्यक्तिक सामुहिक धर्मांचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकली आहे. त्यांनी पवित्र बुद्धीने अत्यंत प्रेमाने तयार केलेल्या स्वयंपाकाचे काय होते?

अन्नमय मन आहे असे उपनिषदामध्ये वर्णन केलेले आहे. जे अन्न आपल्या शरीरामध्ये जाते त्याच्या सात्विकांशापासून आपले मन बनते. तेव्हां मनाला पवित्र अन्न जर मिळाले, त्याचा सात्विक अंश जर मिळाला तर सर्वांची मनं किती पवित्र होतील. किती निर्भय होतील! धैर्यसंपन्न होतील. शिवाजीराजे सगळेच होत नाहीत. शिवाजी राजांना उपदेश करणारे सर्वच समर्थ होत नाहीत. अनेक जन्मांच्या अभ्यासाने त्यांची बुद्धि बनलेली आहे. मार्गदर्शन त्यांना मिळालेले आहे. त्यामुळे अन्नाचा सात्विक भाग

मिळून मनावर संस्कार होऊन मन तयार होते. मन तयार करण्याचे काम हे स्त्रियांचे आहे ही मनुराजाची इच्छा आहे.

मध्यान्ह काली जर एखादा बालक भिक्षा मागायला आला तर त्याला पाहून त्या आईला आपल्याही मुलाची आठवण होते. माझाही बाळ असाच कुठे तरी भिक्षेला गेला असेल. हे मनामध्ये स्मरण होते आणि घरी आलेल्या बालकाला ती अत्यंत प्रेमाने भिक्षा घालते आहे. स्वत: तयार केलेले अन्न देते आहे. असं अंत:करणामध्ये प्रेम आहे. पावित्र आहे. आणि अशा दृष्टीने शुद्ध अन्नाने जर मनं तयार झाली तर राष्ट्र किती श्रेष्ठ होईल!

इस्त्रायल राष्ट्र अगदी लहान आहे म्हणतात. आजूबाजूला इतर धर्माचे कोट्यावधि लोक आहेत. पण डोळाही त्यांना उघडता येणार नाही असा दरारा ज्यू लोकांनी बसवला आहे. ही निर्भयता आहे.

एकटेच मारूतिराय लंकेत गेले होते. कोण बरोबर होते त्यांच्या? पण सीतेची भेट झाली. काय मुद्रिका द्यायची ती दिली, मणि घेतला. निघून यायचे. पण नाही. राजदूत म्हणून ते गेले आहेत. राजदूताचे कर्तव्यही मनु राजाने सांगितले आहे. कसा राजदूत नेमला पाहिजे. राष्ट्राचे हित करणारा कसा पाहिजे. हा जो आपला शत्रु आहे त्याचे सामर्थ्य किती आहे याची परिक्षा घेऊन आपण परत जायचे असे मारूतिरायांनी ठरवले. हे कांही रामांनी सांगितले नव्हते. सीतेचा शोध करून यायचे एवढेच काम होते. सांगकाम्या राजदूत उपयोगी नाही. त्यामुळे मारूतिराय सगळी परिक्षा घेऊन लंकादहन करून परत आले.

राष्ट्रातील प्रत्येक स्त्री, पुरूष, बाल, वृद्ध प्रत्येकाचे मन तयार



करायचे काम मनुराजाने स्त्रियांकडे दिले आहे. सर्वांचा अन्नपाक तयार करायचे काम स्त्रियांना सांगितले म्हणजे कांही त्यांचा तिरस्कार केला नाही. घरामध्ये दागदागिने जुन्यानव्या वस्तू किती आहेत वगैरे सर्व देखरेख करायची जबाबदारी स्त्रियांची आहे. ही सगळी कर्तव्यकर्म स्त्रियांना नेमून दिलेली आहेत. त्या स्त्रियांचेही संरक्षण करणे जरूर आहे ना! जबाबदारी आहे. भिक्षा मागायला आलेला कोणीही अतिथी हांक मारतो, 'बाईसाहेब भिक्षा घाला'. 'अण्णासाहेब' वगैरे म्हणत नाही. अन्नदान हे स्त्रियांकडून व्हायला पाहिजे.

सध्याच्या काळात सर्वच स्त्रिया नोकरी करतात असे नाही आणि नोकरी असली तरी अनेक प्रकारच्या आर्थिक वगैरे विवंचना असतात. आला गेल्याचा खर्च किती चालू असतो. आपले दुखणे त्यांना बोलूनही दाखवता येत नाही. शालीन वृत्ती असल्याने त्या धैर्याने बोलू शकत नाहीत. त्यांनाही त्या दृष्टीने कांही सहाय्य व्हावं. ही जगदंबेची उपासना आहे.

मार्कंडेय महर्षि भगवतीची प्रार्थना करताना म्हणताहेत, सर्व विद्या हे आपलं स्वरूप आहे. सर्वही स्त्रिया ह्यासुद्धा आपलं स्वरूप आहेत. ह्या दृष्टीने त्यांच्याकडे पहाणं हे भारतीय संस्कृतीमध्ये आवश्यक कर्तव्य म्हणून सांगितलेले आहे. म्हणून बदललेल्या परिस्थितीत त्यांनी नि:संकोच वृत्तीने राहावे. वर्तमानपत्रात हृदय शस्त्रक्रियेला आर्थिक मदत करण्याचे आव्हान केलेले असते. लक्षावधि रूपये खर्च येतो म्हणतात. करायचं काय? अशा दृष्टीने आपल्याला संकोच राहू नये म्हणून पेशंटही स्त्रिया आणि त्यांची परिक्षा करणाऱ्याही सुविद्य स्त्रिया अशी ती

योजना इथे ईश्वरकृपेने झालेली आहे.

चांगली परोपकार करणारी मंडळी आहेत. डॉ. मानवी आहेत. त्यांचाही अभ्यास चांगला आहे. चांगल्या चांगल्या सुविद्य स्त्रिया सहाय्याला येणार आहेत. नि:संकोच वृत्तीने आपली व्यथा त्यांच्याजवळ मांडावी आणि त्यांनी दिलेले औषधं म्हणा, मार्गदर्शन म्हणा, त्याप्रमाणें वागून आपण निरामय व्हावं. शरीरातील व्याधि दूर झाल्यानंतर मन प्रसन्न असते. शरीरात व्याधि निर्माण झाल्यावर मनाची प्रसन्नता राहू शकत नाही. त्यामुळे त्यांचे मन प्रसन्न राहिले पाहिजे. स्त्रियांचे मन प्रसन्न राहिले तर प्रपंच परमार्थ दोन्हीही शक्य आहे. त्याप्रमाणे आणखी हे कार्य सुरू झालेले आहे. शिवाजीराव, डॉ. वैद्य, डॉ. देशमुख, डॉ. मानवी आहेत अशी मंडळी मनामध्ये दयावृत्ती बाळगून कार्य करणारी आहेत. हे कार्य सर्व स्त्रियांना उपयुक्त ठरेल हा एक विश्वास आहे, खात्री आहे.

दुसरी गोष्ट हे स्थान महाराजांचे आहे. 'वामन निवास' हे महाराजांचे स्मारक म्हणून तयार झाले आहे. त्यातला एक विभाग लोकनाथतीर्थ महाराजांचे स्मारक म्हणून सुरु झाला आहे.

तर पूर्वकर्मामुळे आपल्याला व्याधी वगैरे होतात. हा एक कर्मवाद भारतीय संस्कृती शिवाय दुसरीकडे कुठेही नाही. तो मानावाच लागतो. कितीही बुद्धिवादाने उत्तर देण्याचा प्रयत्न केला तरी उत्तर देता येत नाही. उत्तम उत्तम औषधे आहेत. त्याचा अभ्यास करणारी उत्तम उत्तम मंडळीही आहेत. पण ते औषध एखाद्याला लागू पडते व तो रोगमुक्त होतो. आणि तेच औषध तशाच प्रकारच्या दुसऱ्या रोग्याला दिल्यानंतर तो बरा होत नाही.



त्याचे आयुष्य संपते. ह्याचे कारण काय? डॉक्टरला नीट निदान झाले नाही असे म्हणायचे? तोच डॉक्टर आहे. त्यानेच निदान केलेला एक रोगी बरा होतो. मग दुसरा कां बरा होत नाही? असे अनेक प्रश्न करता येण्यासारखे आहेत. त्यामुळे शरीरापेक्षावेगळा असणारा हा जीवात्मा आपले पूर्व कर्म घेऊन जन्माला आलेला आहे हे आपोआपच येते. हा कर्मवाद,

**वाढिल्या उद्वेग दु:खची केवळ।**
**भोगणे ते फळ संचिताचे ।**

म्हणून तुकाराम महाराज सांगून ठेवताहेत. पूर्वकर्माचे फल भोगावे लागते. त्यावेळी काय राहावं, कसं राहावं हाही त्यांनी उपदेश केलेला आहे. आणि अशा प्रकारचा एक कर्मवाद, कर्मशक्ती जगताच्या कार्याकरता परमेश्वराने निर्माण केली. जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे फळ द्यायचे एवढेच काम त्याशक्तीचे आहे. परमात्मा स्वत: अलिप्त आहे. ही कर्मशक्ती एकढा सिद्ध झाल्यानंतर ईश्वर मानावाच लागतो. जीवांनी केलेल्या कर्माचे फळ मिळते-सुख किंवा दु:ख - हे एकदा मान्य करावे लागल्यानंतर ते जाणणारा कोणी तरी पाहिजे की नको? ऑफिस मध्ये हा गृहस्थ कधीही रजा घेत नाही. आपली कामं उत्तम प्रकाराने करतो. हे जाणणारा कोणी तरी पाहिजे की नको? तर त्याला बढती मिळेल. त्याचे ज्ञान ज्याला नाही त्याने नुसते कर्म केले तरी फल मिळत नाही. केवळ कर्म हे जड आहे. तेव्हां आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये कर्मशक्ती शास्त्रकारांनी सिद्ध केलेली आहे. आणि आपल्याला अनुभवही येतो. त्याचा ज्ञाता सर्वज्ञ परमेश्वर आहे.

**आपदामपहर्तारं दातारं सर्व संपदाम् ।**
**लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहं ।।**

बुध कौशिक मुनि सांगताहेत. सर्वही आपत्ती आपल्या पूर्वकर्माने आली असो किंवा आपल्या चुकीमुळे आलेली असो ती दूर करण्याची शक्ती त्या परमेश्वराची आहे. ही जाणीव झाली पाहिजे.

**किंबहुना सर्व सुखी ।**
**पूर्ण होऊनी तिही लोकी ।**
**भजिजो आदिपुरूषी । अखंडीत।**

संसार सोडा म्हणत नाहीयेत महात्मे. सर्व सुखं तुम्हाला मिळू देत. परंतु त्या आदि पुरूषाला विसरू नका. एवढं लक्षात ठेवा.

या दृष्टीने वामन निवासाची जागा ही मोकळी आहे. अशीच निरनिराळी कार्य या स्थानांत होतात. निरनिराळी शिबिरे होतात. परिक्षेला उपयुक्त असे मार्गदर्शन देणारे वर्ग चालतात. अशी कार्य चालतात.

तेव्हां ज्या कांही स्त्रिया आरोग्य बिघडल्यामुळे या ठिकाणी येतील त्यांच्यासाठी वरच्या माडीवर विभाग उघडण्यात आला आहे. त्यांच्याबरोबर आलेल्या बायकांनी इथे येऊन बसावे. महाराजांचे स्थान आहे हे. तुळजाभवानीचेही स्थान आहे. इथे कांही तरी प्रार्थना करावी. ईश्वराला तुम्ही माना, अगर न माना, पण ईश्वराला सहाय्यकर्ता मानायला काय हरकत आहे? ईश्वराच्या कृपेने सर्वही प्रतिबंध दूर होतात, असे योगसूत्रकार सांगतात. आणि मी कोण आहे हे खरं समजून घ्या. तो प्रयत्न आहे. देह म्हणजेच मी आहे. हा देहात्मवाद आहे. चार्वाक मतच कधीही



जात नाही, आपल्या मनांतले. तर ईश्वरकृपेने खरा 'अहम्' कोण आहे हे समजून घ्या. त्या ईश्वराची उपासना तुम्ही सोडू नका, म्हणून ज्ञानराज प्रार्थना करताहेत. कृतज्ञ राहा. कृतघ्न होऊ नका. या दृष्टीने त्यांनी या ठिकाणी येऊन तुळजाभवानीची प्रार्थना करावी, नामस्मरण करावे. म्हणजे त्यांच्या नामस्मरणाने त्यांच्याबरोबर आलेला जो पेशंट असेल तोही आरोग्यसंपन्न होईल. त्याला तपासणारी जी तज्ञ डॉक्टर मंडलक्ष आहेत त्यांच्या प्रयत्नांनाही यश येईल. हाही एक उद्देश या ठिकाणी आहे. आणि आरोग्यधामाचे कार्यही या ठिकाणी चालू राहाणार आहे. स्त्रियांच्या मनामध्ये चिकित्सा असेल नसेल पण चिकित्सेबरोबर श्रद्धाही असावी. श्रद्धा हा स्त्रियांचा स्थायी भाव आहे. कितीही शिक्षण झाले तरीसुद्धा ती श्रद्धा मलीन होत नाही. अर्थार्थी भक्त असला तरी हरकत नाही. देवीची प्रार्थना करावी. यश मिळवावे.

तर याप्रमाणें इथे हे कार्य चालू होणार आहे. चांगली मंडळी यात इथे भाग घेताहेत. पूर्ण शक्तीसंपन्न भगवतीमाता आणि गुरुमहाराज यांच्या कृपेने सर्वांना आरोग्य लाभ व्हावा. सर्वांची मनं प्रसन्न रहावी.

**'भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ।'**

हे संत महात्मे काय आपल्या आपल्यापुरते पहातात? राष्ट्राकरता, समाजाकरता कांही करत नाहीत? भूतां परस्परे..... ही प्रार्थना कोणा करता आहे? नेते मंडळी व्याख्याने देऊन 'तुम्ही सगळे एक व्हा' वगैरे सांगतात. हीच प्रार्थना संतांनी देवाजवळ केली आहे. ही राष्ट्राकरता, समाजाकरता आहे. तेव्हां ही भावना

सर्वांच्याही मनामध्ये रहावी. मन प्रसन्न राहिले पाहिजे. विवाह झाल्यावर दंपती श्रेष्ठ पुरुषांना नमस्कार करायला जातात. आमच्या संस्कृतीत काय आशीर्वाद द्यायला सांगितलाय?

**'दंपत्योः अविच्छिन्ना प्रीतीरस्तु'**

दुसरं कांही नाही. यांना संपत्ति मिळावी, सुनेला नोकरी मिळावी हा आशीर्वाद नाही. ह्या दोघांचे अविच्छिन्न प्रेम राहावं. हा आशीर्वाद द्यायला सांगितलाय. एवढीच देवाजवळ प्रार्थना करायला सांगितली आहे. हा मुख्य आशीर्वाद आहे.

तेव्हां मनाची स्थिती चांगली पाहिजे, शरीराची स्थिती चांगली पाहिजे. त्याकरता प्राचीन महर्षिंनी हा समाजवाद आमच्या भारतीय संस्कृतीत घालून दिलेला आहे. आरोग्य पाहिजे. दुःख दूर करण्याचे सगळे उपाय पाहिजेत. मनुराजाने बागबगीचे नगरात तयार करावेत असे सांगितले आहे. सर्व मंडळी जरी मनाला कांही दुःख झाले असले तरी बागेमध्ये जाऊन बसतील. त्यांच्या मनातील दुःख त्यामुळे जाऊन तात्कालिक का होईना त्यांच्या मनाला समाधान होईल. सर्वांच्या समाधानाकरता, मनुने बागा तयार करायला सांगितल्या आहेत. विहीरी, तलाव बांधावेत. धरणं बांधावीत. हा सगळा समाजवाद आहे.

तर अशा दृष्टीने भारतीय संस्कृतीमध्ये सांगितलेले जे जे कार्य आहे, संत महात्मे ज्या कार्याचा पुरस्कार करताहेत त्या संस्कृतीला अनुसरून लोकनाथतीर्थ महाराजांनीसुद्धा त्याचा पुरस्कार केला आहे. नागपूरला परांडे म्हणून सेशन जज्ज प्रसिद्ध होते. त्यांच्या पुतण्याने एक असे आरोग्यमंदिर काढले होते. ह्यांना



त्याबद्दल कळवल्यावर ह्यांनी पत्र लिहिले - आरोग्यमंदिर हे अवश्य झालं पाहिजे. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्ः' कालीदास सांगताहेत. शरीर चांगले असल्याशिवाय धर्माचरण वगैरे कांहीही घडत नाही. भगवंताची इच्छा, संत महात्म्यांची इच्छा, मोठे मोठे विचार करणारे समाजशास्त्रज्ञ जे आहेत ह्यांचीही इच्छा आहे. ह्या सर्व इच्छा आपल्यापुढे मांडलेल्या आहेत. सर्व मंडळींच्या बुद्धीला प्रेरणा करणारी परमात्म शक्ती आहे. मंडळींना विनंती करायची याचा अर्थ

**'ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठती।'**

सर्वांच्या हृदयस्थ परमेश्वराचीच प्रार्थना करायची आहे. त्याचेच ते कार्य आहे. म्हणून अशा प्रकारच्या कार्याला आरंभ झालेला आहे. आर्थिक सहाय्यापेक्षा मानसिक सहाय्य अधिक महत्वाचे आहे. आजारी पडलेल्या मनुष्यावर उपचार चालू आहेत त्याला भेटायला गेलेला चांगले, प्रेमाने बोलला, 'घाबरू नका, कांही घाबरण्याचे कारण नाही, डॉक्टर चांगले आहेत, औषधे चांगली आहेत' असे नुसते बोलली तरी रोग कमी होतो. आरोग्य मिळते. तर नुसत्या वाणीमध्येसुद्धा सामर्थ्य आहे. तेही सामर्थ्य असणारी मंडळी आहेत. तर अशा रीतीने निरामय सर्व व्हावेत, सर्व राष्ट्राचेही कल्याण व्हावे. सर्वांतर्यामी आणि सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारी भगवती तुळजाभवानी माता हिच्या जवळ प्रार्थना करून हे भाषण पुरे करतो.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।**

□□

# बुद्धि दे रघुनायका

## प. पू. महाराजांचे जालना येथील प्रवचन

महर्षि व्यासांनी ईश्वर स्वरूपाचा विचार केला. सद्गुरू स्वरूपाचा विचार केला. नंतर त्यांना थोडा खेद झाला. त्यांना वाटले इतके ग्रंथ केले, महाभारत लिहिले, पुराणे लिहिली, वेगळच्या वेगळच्या देवतांचे महत्व सांगितले. लोकांना शुद्ध बुद्धि व्हावी, निदान तशी वासना तरी व्हावी हा त्याचा मुख्य उद्देश होता. ईश्वरी स्वरूपाबद्दल भक्ती उत्पन्न व्हायला हवी. त्या भक्तीचे फळ पुढे आहे. आत्मानात्म विचार करायला हवा. कठोपनिषदामध्ये आले आहे. इतके लहान वय होते नचिकेताचे. तरीसुद्धा यमधर्मांच्या पुढे विरक्तपणे त्याने कांहीही मागितले नाही. ही बुद्धीची स्थिरता त्याला कांही एका जन्मामध्ये मिळालेली नाही. तर व्यास महर्षींना थोडे वाईट वाटले. कोणीही आपले म्हणणे ऐकून घ्यायला तयार नाही. अर्थ कामाच्याच पाठीमागे सगळे विश्व लागलेले आहे. उत्तम अभ्यास केलेली मंडळी असोत, अभ्यास न केलेली असोत. अर्थ काम सगळ्यांना पाहिजे आहे. प्रपंची पाहिजे सुवर्ण. इतकीच सगळ्यांची बुद्धि आहे. व्यासांच्या नंतर जे झाले ते व्यासांचेच अनुकरण करणारे, त्यांचे मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे बोलणारे. सर्वही संत महात्मे व्यासांनी जे प्रतिपादन केले आहे, तेच निरनिराळ्या पद्धतीने सांगत असतात.

तर हा विचार मनामध्ये उत्पन्न व्हावा म्हणून कालीदासाने



मालविकाग्निमित्र नाटकात एक श्लोक घातला आहे. ईश्वराची कृपा आपल्यावर कशी व्हावी? भगवान शंकरांचे त्यांनी वर्णन केले आहे. भगवान् शंकर कसे आहेत? पूर्ण ऐश्वर्य जवळ आहे. जे कोणी कांही मागेल ते द्यायची शक्ती त्यांच्याजवळ आहे. पूर्ण शक्तीसंपन्न आहेत. हे सगळे असूनसुद्धा आपल्या त्या शक्तीचा वापर ते आपल्याकरता करत नाहीत.

भारतीय संस्कृती पुढे मांडलेली आहे. भगवान् शंकर एक व्याघ्रचर्म पांघरून बसलेले आहेत. कांही आकांक्षा नाही. आणि आकांक्षारहित मन होणे हीच मुक्ती आहे. अकाम महत् श्रोत्रीयाला सर्व आनंद प्राप्त होतात असे उपनिषदामध्ये सांगितले आहे. आनंदाचे अनेक प्रकार ह्यात सांगितले आहेत, ते सर्वही आनंद त्या अकाम महत् श्रोत्रीयाला मिळतात. कांहीही कामना मनांत नाही. रामचंद्रप्रभु भगवान् शंकरांना आपले उपास्य दैवत मानताहेत. शंकरही रामांना उपास्य दैवत मानतात. शंकरांना अर्धनारी नटेश्वर म्हणतात. अर्ध्या शरीरामध्ये पार्वतीमाता आहे. इतके शरीरांतर्गत सान्निध्य असूनसुद्धा संयम आहे. इंद्रिय निग्रह आहे. निर्विषय ज्यांचे मन झालेले आहे असे जे योगी पुरुष आहेत त्यांच्यामध्ये अग्रणी भगवान् शंकर आहेत.

तिसरे सांगताहेत कालीदास; सगळ्या जगाचे संरक्षण करण्याचे कार्य भगवान् शंकर करताहेत. शेवटी प्रलयाच्या वेळी संहार कार्य होईल. तेही एक मोठे जबाबदारीचे काम आहे. सगळ्यांची कर्म कशी संपत आली आहेत त्याप्रमाणे पाहून सर्व करायचे. जगामध्ये शंकरांचे कार्य हे असे चाललेले आहे. पंचमहाभूते ही भगवान् शंकरांची रूपे आहेत असे शाकुंतल नाटकात वर्णन केलेले आहे.

पंचमहाभूते, सूर्य, चंद्र, अग्नि या अष्टतनुंच्या सहाय्याने भगवान् शंकर हे सर्वांचे संरक्षण करतात. पण संरक्षण करणारे असून 'अहं' नाही. हा एक भारतीय संस्कृतीचा मोठा विशेष आहे. ज्यांच्या मनामध्ये पूर्ण संयम आहे, ज्यांच्या मनामध्ये खरे वैराग्य उत्पन्न झालेले आहे त्यांच्यामध्ये असणारी शक्ती सर्वांना उपकारक असूनसुद्धा त्यांना स्वत:ला त्याचा अभिमान नाहीये. हे तर फारच मोठं आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी भिंत चालवली पण ते सगळं विसरून गेले. जड भिंतीत क्रियाशक्ती निर्माण करण्याचा ज्यांचा संकल्प आहे, त्यांना त्या संकल्पाबद्दल कांही जाणीवही नाहीये. फार मोठी शक्ती आहे. इंद्रियांच्या संयमाने, बुद्धीच्या स्थैर्याने ही शक्ती प्राप्त होते. आणखी 'येथ व्युत्पत्ती आघवी विसरीचे' म्हणतात ज्ञानराज.

तर याप्रमाणें सगळं कार्य करणारे भगवान् शंकर आहेत. पूर्ण संयम आहे. पूर्ण वैराग्य आहे. निरहंकार वृत्ती आहे. तर ह्या भगवंतांची कृपा कशी असावी सांगताहेत - सन्मार्गाचा विचार करावा. विचारांची भूमिका प्राप्त होण्याकरता तामसी वृत्ती गेली पाहिजे. मनातले रजोगुण, तमोगुण कमी झाले पाहिजेत. सन्मार्गाचा आचार पुढे आहे अजून. आणि त्याप्रमाणे आचरण करणं हे फार महत्वाचे काम आहे. धर्माचरणाने ज्ञानशक्तीचाही पुष्कळ विकास होतो. अर्थ, कामही त्याच्या पाठीमागे येतात. आंब्याचे झाड हे आंब्याची फळं मिळण्याकरता लावलेले असते. छाया आणि गंध हे त्याच्या अनुषगाने आपोआप मिळतात. छाया मिळावी म्हणून झाड लावायचे नाही. धर्मराजांनी धर्माकरता शरीर असेपर्यंत प्रयत्न केला. त्याप्रमाणे त्यांना शक्तीही मिळाली.



मनाचा पूर्ण निग्रह झाला. धर्मप्रेम वाढत वाढत गेले. तर ज्ञानराजांनीही हेच सांगितले आहे - जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। सत्कर्म करण्याइतकेच सत्कर्माबद्दल मनांत प्रेम उत्पन्न होणे याला विशेष महत्त्व आहे. त्याप्रमाणे धर्मराजांचा उद्धार झालेला आहे. भगवान् रामचंद्र तर मूर्तिमंत धर्मरूपच आहेत. 'विग्रहवान् धर्मान्' असे म्हणतात. रामचंद्रांनी स्वत:च्या चरित्राने धर्माचरण कसे करावे हे सर्वांच्यासमोर मांडून ठेवले आहे. त्यांच्या चरित्राचे चिंतन झाले पाहिजे आणि त्याप्रमाणे आचरण करण्याची आपली बुद्धि स्थिर झाली पाहिजे. 'आमच्या मनामध्ये असलेले सर्व दोष आपणच दूर करा' अशी प्रार्थना कालीदासांनी केली आहे. सन्मार्गाचा विचार हा ऐकायला मिळावा, आपल्याला करता यावा, याकरता आमची बुद्धि चांगली करा, असं त्यांनी सांगितलं.

'बुद्धि दे रघुनायका' हे मागताहेत समर्थ. चांगली बुद्धि आम्हाला द्या. कारण बुद्धीनेच कार्य करायचे आहे. शास्त्रज्ञांना बुद्धिवाद त्याज्य नाही. बुद्धि कार्य करणारी आहे, समर्थ आहे. त्या बुद्धीची शक्ती वाढली पाहिजे. रजोगुण आणि तमोगुणातून ती बुद्धि बाजूला होऊन सत्वसंपन्न झाली पाहिजे, स्थिर झाली पाहिजे, विरक्त झाली पाहिजे, संयमी झाली पाहिजे, निरहंकारी झाली पाहिजे. तर अशा दृष्टीने भगवंताची प्रार्थना कालीदासारख्या ज्ञानी माहात्म्याने केलेली आहे. सन्मार्गाचे आम्हाला आलोचन करता यावे अशी देवाने आम्हाला बुद्धि द्यावी.

निरनिराळ्या ग्रंथकर्त्यांचे अभिप्राय काय आहेत हे समजून

घेतले पाहिजे. नामदेवरायांनी सांगितले -

**एक तरी ओवी अनुभवावी ।**

नामदेव, ज्ञानराज मोठे अधिकारी महात्मे होते. ज्ञानेश्वरीमध्ये किती तरी गहन सिद्धांत मांडून ठेवले आहेत हे आपण समजून घेतले पाहिजे. पण ते कळण्याकरता म्हणून ईश्वराची भक्ती ही आवश्यक आहे. आणि ती भक्ती आपल्या मनामध्ये उत्पन्न होण्याकरता ईश्वरभक्तांची संगती जर आपल्याला लागली तर त्यामुळे आपोआप मार्गदर्शन होते. त्याकरता शास्त्रज्ञ महात्म्यांनी ग्रंथ लेखन केले आहे. त्या ग्रंथांचे वाचन करणं, चिंतन करणं, त्याप्रमाणे आपल्या बुद्धितले दोष जाणून घेणं, ते दोष जाण्याकरता ईश्वराला शरण जाणं, हे उपाय आहेत. त्या ईश्वराच्या कृपेनेच सर्व विघ्न दूर होतात.

**मनी धरावे ते होते ।**
**विघ्न अवघेची नासोनी जाते ।**
**कृपा केलीया रघुनाथे ।**
**प्रचीत येते ।**

केवढा आत्मविश्वास उत्पन्न झालेला आहे! बुद्धि किती स्थिर झालेली आहे! रामरायाची अशी मोठी शक्ती आहे. तर संत महात्म्यांनी हे सगळे आत्मविश्वासपूर्वक सांगितले आहे. त्यांच्या ग्रंथांचे वाचन करायचे, यथाशक्ती आचरण करण्याचा प्रयत्न करायचा. त्यामुळे येणारी जी विघ्ने आहेत ती त्यांच्या कृपेने दूर होतात. धर्मशास्त्राकारांनीच हे सांगून ठेवलय की मध्ये येणारे



सगळे प्रतिबंध ईशकृपेने दूर होतात. प्रयत्न आपल्या हातून होत नाही असे नाही. प्रयत्न करावा अशी बुद्धि असते. परंतु त्या प्रयत्नांमध्ये अनेक प्रतिबंध निर्माण होतात - बुद्धीचे दोष, शरीराचे दोष, वाणीचे दोष, अनेक प्रकारचे दोष आहेत. ते सगळे दोष दूर होतात. आणि ती बुद्धि अंतर्निष्ठ होते. साक्षी जो आहे - प्रत्यग् चेतन - त्या साक्षीस्वरूपापर्यंत बुद्धि जाते. आणि त्या साक्षीस्वरूपाचा आनंद एकदा सांपडला म्हणजे त्या आनंदापुढे दुसरे कांहीच महत्वाचे वाटत नाही. म्हणून आचार्य महाराजांनी अगदी स्पष्ट सांगून ठेवले आहे -

जगातली सुखं मिळतील, सुखाची इच्छा वाढेल, परंतु भगवत् भक्ती जर मनामध्ये नसेल तर त्याचा कांही उपयोग नाही. शरीराचे सौंदर्य आहे, धनही विपुल आहे पण त्याचा काय उपयोग आहे? समजावून सांगा. केवळ बुद्धीने विचार करून याचे उत्तर देता येणार नाही. सगळं मिळालेलं आहे पण ते विनाशी आहे. कोणचेही स्थिर राहाणार नाहीये. हा एक विचार मनामध्ये उत्पन्न झाल्याबरोबर विरक्तता निर्माण होते.

तुळशीदासजींना त्या स्त्रीनेच उपदेश केला की तुम्ही त्या रामरायाकडे लक्ष द्या. ह्या माझ्या हाडामांसाच्या शरीराकडे काय पहाता? त्या स्त्रीचे हे शब्द त्यांच्या बुद्धीला इतके पटले की ते लगेच बाहेर पडले. मनातली सगळी आसक्ती एकदम निघून गेली. हीच ईश्वराची कृपा आहे. कांही काळ लागतो कोणाकोणाला. कोणाला एकदम विरक्ती निर्माण होते, स्थिर होते, टिकते आणि त्या प्रमाणे सर्वही लोकांना मार्गदर्शन होण्याचे कार्य त्यांच्याकडून होते.

रामचंद्रप्रभुंनी अवतार घेऊन हेच कार्य केले. आपण अगदी निरहंकार वृत्तीने राहिले. आपली ओळखसुद्धा दिली नाही. आपण सत्पुत्र आहोत. त्याचप्रमाणे आपण लोकांचेही राजे, खरे स्वामी आहोत, लोकांच्या कल्याणाकडे लक्ष दिले पाहिजे. पित्याची आज्ञा पालन केली पाहिजे. हे जे धर्माचरण आहे त्याकडे लक्ष देऊन अर्थ, काम त्यांच्या पाठीमागे येणार आहेत. भरताला राज्य दिले म्हणून त्यांच्या मनावर कांहीही परिणाम झाला नाही. पुढे वनांत गेल्यावर सुग्रीवाला राजा केले. लंकेमध्ये गेले, बिभिषणाला राजा केले. म्हणजे आपल्या मनांत कांहीही इच्छा नाहीये. दुसऱ्याला राजा जो करू शकतो त्याला राज्याची इच्छा असेल कशी? पेढ्याचा दुकानदार दुकानातला एक पेढासुद्धा खात नाही. तो निरिच्छ आहे.

तशी निर्मोह, निरहंकारवृत्ती आपली व्हायला हवी आणि या सगळ्या एकंदर गुणसमुच्चयाने बुद्धि चांगली तयार झाल्यानंतर होणारे श्रवण, मनन, निदिध्यासन याचा उपयोग होऊन आपल्याला आत्मलाभ होतो. 'यद्योगेन आत्मदर्शनम'. हेच मुख्य आहे आणि भारतवर्षामध्ये जन्म झालेल्यांच्या पुढे संत महात्म्यांनी हेच ठेवलेले आहे. हरि भक्तीच्या मार्गाने चला म्हणजे तुमचे कल्याण होणार आहे. दया त्याचीच मोठी आहे. पूर्ण शक्तीसंपन्न असल्यामुळे तो सर्वही दोष दूर करू शकतो हेच संतांनी सांगितले.

आज रामनवमीचा (२०-४-९४) पूर्वकाळ आहे. सौभाग्य-संपन्न ताईमहाराजांनीही या ठिकाणी स्थान केले. सर्व मंडळींनाही प्रेरणा झाली. मराठवाडा, विदर्भ प्रांतात धर्मवासना असणारी



मंडळी आहेत. या प्रांतात विशेष भूमिका आहे. हरि भक्ती, माणुसकी हे सगळे संस्कार स्वाभाविकपणे त्यांच्या चित्तात आहेत. सद्गुरु वासुनेवानंदसरस्वती महाराजांनी पायीच या प्रांतात पुष्कळ संचार केला. पुष्कळ लोकांना त्यांच्या कृपेचा अनुभव आलेला आहे. मार्गदर्शन घडलेले आहे. ग्रंथरूपानेही मार्गदर्शन त्यांनी करून ठेवलेले आहे. या ठिकाणी ताईमहाराजांनी केलेल्या आवाहनाप्रमाणे ईश्वराचे वास्तव्य झालेले आहे. त्याची उपासना व्यवस्थित चालू राहिल्यानंतर ईश्वराचे स्थैर्य होऊ शकते, ईश्वराचा अंश जो या ठिकाणी प्राप्त झाला आहे तो स्थिर होऊ शकतो. देवाला सगळी काळजी आहे. देवाच्याच कृपेने सर्व कार्य होणार आहे.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।**

# गुण गाईन आवडी

## प. पू. दत्तमहाराजांनी
## प. प. श्रीनारायणस्वामींच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने
## हिंगोली येथे केलेले प्रवचन

**ब्रह्मानंद परम सुखदं केवलं. . . .**

भगवान् गोपालकृष्णांनी उद्धवजींना उपदेश केलेला आहे. भागवत ग्रंथामध्ये ११ वा स्कंध जो आहे तो भगवंतांचा उपदेश आहे. त्यावर एकनाथ महाजांनीही एकनाथी भागवत लिहिलेले आहे, मराठी भाषेमध्ये सर्वांनाही समजून येण्याकरता ! त्यामध्ये सर्व जीवांच्याकरता आपण काय व्यवस्था केलेली आहे हे भगवान् सांगताहेत. संसारसमुद्र मोठा आहे. त्यातून तरून जायचे आहे.

भगवान् गीतेमध्ये 'उद्धरेत् आत्मानात्मानम्' असा उपदेश करतात. आपण आपला उद्धार करून घ्यायचा. काय करायचयं सहाय्य वगैरे असे कोणाला वाटेल. पण ते उत्तम अधिकाऱ्याचे लक्षण आहे. सर्व सामान्य जीवांकरता ज्याने सृष्टी निर्माण केली त्यानेच तिकडे लक्ष दिले पाहिजे, म्हणून भगवान् सांगताहेत.

त्यासाठी पहिले साधन म्हणजे 'मनुष्य देह मी दिला आहे असे ते म्हणतात. जीवाच्या स्वाधीन कांही गोष्टी नाहीयेत. वाटते आम्हाला आमच्या बुद्धीने आम्ही करू शकतो सर्व. पण नाही. मनुष्य देह आपल्याला मिळाला पाहिजे हे कांही आपल्या इच्छेवर



अवलंबून नाही. ईश्वराच्या सृष्टीत ईश्वराच्या कृपेने आपल्याला मनुष्य देह मिळालेला आहे. आणि मनुष्य देह हाच संसार-सागरातून तरून जाण्याचे पहिले साधन आहे.

देवादिकांनासुद्धा इकडे लक्ष द्यायला सवड नाहीये. सुखं भरपूर आहेत. स्वर्गादिक लोकामध्ये इच्छा केल्यावर फलप्राप्ती होते. इतकी समृद्धी असताना कोणाचे लक्ष देवधर्माकडे, भक्तीकडे जाणार? म्हणून मानव हा अधिकारी आहे. तेव्हां मानव जन्म हे पहिले साधन आहे.

मार्गदर्शकाचीही योजना केलेली आहे. 'गुरु कर्णधारम्' सद्गुरु संत महात्मे हे नावाडी आहेत. नांव घेऊन समुद्रातून पलीकडे नेऊन पोहोचवतात. ईश्वररूप ते आहेत. ते उत्तम प्रकारचे मार्गदर्शन करतात. श्रद्धा भक्ती मनामध्ये असेल तर त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें वागून आपले पूर्ण कल्याण होते. ही दुसरी व्यवस्था.

आणि तिसरी व्यवस्था भगवान् सांगताहेत-- नाव पलीकडे तरून जायला अनुकूल वारा पाहिजे तरच नाव व्यवस्थित जाते. मी 'अनुकूल' आहे, म्हणतात भगवान्.

**अनुकूलः शतावर्तः पद्मी पद्मम् निभेक्षणः**

विष्णुसहस्रनामामध्ये 'अनुकूल' असे एक भगवंतांचे नाम आहे. म्हणजे नामाप्रमाणे भगवान् सर्व मानवांना अनुकूल आहेत, परतीरावर नेण्यासाठी, इतकी व्यवस्था केलेली आहे. असे असताना ज्याला भव सुमद्रातच (गटांगळ्या खात) राहायच आहे त्याला मी काय करणार, म्हणाले.

मनुष्य जन्म केव्हां संपेल याचा नेम नाही. या जन्मामध्ये ईश्वराची, सद्गुरुंची सेवा झाली पाहिजे. तर मानव कृतार्थ होऊन जातो. या दृष्टीने संत महात्म्यांच्या चरित्राचे वाचन हे अवश्य करावे, चिंतन अवश्य करावे असे योगसूत्रकारही सांगताहेत. मनाचा निग्रह होण्याकरता त्यांनी पुष्कळ साधनं सांगितली आहेत. प्राणायाम हे मोठं साधन आहे. प्राणायामाच्या बलाने मन, इंद्रिये सगळी एका जागी स्वस्थ राहातात. एवढी प्राणायामाची शक्ती आहे. पर तो अभ्यास सर्वांना शक्य नाही. सांगता सांगता--

**वीतरागविषयं वा चित्तम् ।**

हे योगसूत्रकार सांगतात. 'वीतराग महात्मा' म्हणजे ज्याच्या मनामध्ये कोणतीही वासना शिल्लक राहिलेली नाही. केवढा अधिकार आहे! निर्वासन अंत:करण आहे. संसाराचींही वासना नाही आणि परमार्थाचीही वासना नाही. वासना पाहिजेच कशाला? सर्वज्ञ परमात्मा आहे. त्याच्या कृपेने यथा संभव सर्व होऊन जाते.

**देव ठेविल तैसे रहावे ।**

तर वीतराग महात्मा जो आहे, निर्वासन अंत:करण ज्याचे झालेले आहे अशांची चरित्रं पहावीत, ऐकावीत, चिंतन करावे म्हणजे चित्त स्थिर होते. चित्त स्थिर करण्याचा हा एक स्वतंत्र उपाय त्यांनी सांगितला.

या दृष्टीने भगवत् स्वरूप महान् भगवत् भक्त प. प.



श्रीनारायणस्वामी महाराज नरसोबाच्या वाडीलाच शेवटपर्यंत राहिले. त्यांच्या चरित्रापैकी कांही विषयांचे चिंतन आज आपल्याला करायचे आहे. आपले चित्त शुद्ध व्हावे या दृष्टीने करायचे आहे. नारायण स्वामी महाराजांचे चरित्र पुष्कळ मोठे आहे. ते मोठे प्रसिद्धी पराङ्मुख होते. प्रसिद्धी होऊ न देण्याबाबत ते अतिशय जागरुक असत. त्याबद्दल एक कथा सांगायची आहे. देवाच्या मनामध्ये आले नारायण स्वामींची प्रसिद्धी व्हावी. त्याकरताही भांडण झालेले आहे. कथाभाग उत्तम आहे.

तर नारायण स्वामी मोठे दत्तभक्त होऊन गेले. कर्नाटक प्रांतात राहाणारे. गार्ग्य गोत्र त्यांचे होते. मोठे झाले. उपनयन झाले. वेद, शास्त्राचा अभ्यास पुढे झाला. विवाह झाला. त्यानंतर अध्यापन सुरु झाले. नारायणस्वामींना जवळ जवळ दोनशे वर्षे होऊन गेली असतील. पुण्यात त्या वेळी पेशवाई होती. भारतातल्या मोठमोठ्या पंडितांनां पेशव्यांच्या सभेत निमंत्रण करून बोलावले जात असे. आणि पंडितांची चर्चा व्हायची. अनेक गहन विषयांवर विचार, निर्णय वगैरे व्हायचे.

संन्यास घेण्यापूर्वी नारायणस्वामी महाराजांना पेशव्यांच्या एका अशा सभेत वादविवाद करायला आमंत्रण आले. प्रारब्ध कर्म, पूर्व सुकृत आणि इश्वराची कृपा असल्यानंतर मानव संसारातून एकदम बाजूला कसा होतो याचे हे उदाहरण आहे. त्यासभेत मोठमोठ्या पंडितांची चर्चा सुरू झाली, वादविवाद सुरु झाला. आणि त्या वादविवादामध्ये नारायण शास्त्री महाराज निरूत्तर झाले. त्यांचा पराभव झाला. मनाला अपमान सहन कसा होईल? अपमान सहन करण्याची अवस्था म्हणजे शेवटची आहे.

**मानापमानयोः तुल्यः ।**

ही गुणातीत अवस्था शेवटची आहे.

अपमान झाल्याबरोबर नारायणशास्त्री महाराज पुण्याहूनच काशीला जाण्यास निघाले. इकडे कुटुंबाची काही तरी व्यवस्था केली. पण काशीला जाण्याचा उद्देश काय? आहे त्यापेक्षा अधिक अभ्यास करायचा आणि पुण्याच्या विद्वत् सभेत येऊन सर्वांना निरूत्तर करायचे. देवगुरू बृहस्पति जरी आले तरी ते सुद्धा निरूत्तर झाले पाहिजेत, इतकी विद्या मला आता मिळवायची आहे. ही मनामध्ये वासना आहे. काशीला गेल्यावर एक मोठे ज्ञानी आणि संन्यासी त्यांना गुरु भेटले. भाग्य आहे. बारा वर्षे त्यांच्याजवळ राहून अभ्यास केला. उत्तम पंडित असताना जास्ती शिक्षण घ्यावे, जास्ती मोठेपणा मिळवावा, अपमान कधीही होणार नाही अशी व्यवस्था करायची, अशी बुद्धि मिळवायची ही इच्छा आहे.

त्यांचे जे गुरु महाराज होते त्यांच्या लक्षात हा सगळा प्रकार आला. हा महात्मा चाललाय कुठे, म्हणाले. मनुष्य जन्माला येऊन वादविवाद मानापमानात सापडला. अभ्यास उत्तमरीत्या पूर्ण झालेला आहे. काशीमध्ये मोठे मोठे पंडितसुद्धा त्यांच्यासमोर जायला भिऊ लागले. इतकी विद्या त्यांनी मिळवली.

एके दिवशी गुरु महाराज आणि नारायण शास्त्री महाराज रोजच्याप्रमाणें गंगा तीरावर स्नानाकरता गेलेले आहेत. भाग्य कसे बदलले जाते, महात्मे कसे बदलू शकतात, याचे हे उदाहरण आहे. स्नान वगैरे झाल्यानंतर गुरुमहाराजांच्या छाट्या वगैरे धुवून घेतल्या, कमंडलू भरून घेतला. आता आश्रमामध्ये जायचे. इतक्यात गुरुमहाराज म्हणाले, ''शास्त्री महाराज तुमचा



विद्याभ्यास पूर्ण झाला की नाही? तुमच्या मनाचे पूर्ण समाधान झाले की नाही?'' नारायण शास्त्री महाराज म्हणाले ''हो. आपल्याजवळ राहायला मिळाले. त्यामुळे विद्या मिळाली.'' गुरु महाराजांनी विचारले, ''विद्या मिळाल्यावर गुरुदक्षिणा वगैरे द्यायला नको का?''

सध्याच्या काळात अगोदरच डोनेशन द्यावे लागते. त्याशिवाय प्रवेशच नाही. प्राचीन काळामध्ये सर्व विद्या गुरूने शिष्याला दिल्यानंतर गुरूदक्षिणेचा विचार आहे.

नारायण शास्त्री महाराजांना वाटले हे आता काय मागतात कोणास ठाऊक ते म्हणाले, ''हो आवश्यक आहे. मी गरीब आहे. माझी परिस्थिती पाहून आपण सांगा मी काय द्यावी दक्षिणा. गंगेचे पाणी हातात घेऊन उदक सोडा. आपण मागाल ती दक्षिणा द्यायला मी तयार आहे.'' त्या प्रमाणे उदक सोडल्यावर गुरु महाराज म्हणाले, ''शास्त्री महाराज आजपासून कोणा-बरोबरही वादविवाद करायचा नाही. वादत्याग ही दक्षिणा मला पाहिजे. काय करायचाय वादविवाद? दुसऱ्याला निरुत्तर करुन आपला मोठेपणा स्थापन करण्याचा उपयोग काय आहे? ते कांही बरोबर घेऊन जाता येते?''

नारायण शास्त्री महाराजांनी कबूल केले.

सद्गुरुंची इच्छा आहे. ते आपले अकल्याण कधीही करणार नाहीत. पण मनाला मात्र ही गोष्ट फार लागून राहिली. इतक्या दूर आपण आलो काशीला, बारा वर्षे राहिलो. सर्व संसार बाजूला ठेवला. इतकी विद्या मिळवली आणि गप्प बसायचे? हे कसे शक्य आहे? काय झालं! संसारही गेला आणि परमार्थही गेला.

स्वस्थ बसून खिन्नपणे विचार करू लागले. एवढ्यात गुरु महाराज तिथे येऊन म्हणाले, ''काय शास्त्री महाराज कसला विचार चाललाय? काय म्हणे, वादविवाद करायचा नाही म्हटल्यावर तुम्हाला वाईट वाटले. तुम्हाला कबूल करावे लागले. काय करायचे? मनुष्य जन्म मिळाल्यावर काय करायचे हे तुम्हाला समजलेले आहे. शास्त्राचा अभ्यास तुम्ही केलेला आहे. अनेक ग्रंथांचे अवलोकन केलेले आहे चिंतन केलेले आहे. आणि त्या चिंतनातून एवढेच तुम्हाला समजले? वादविवाद करायचा नाही अशी आपली प्रसिद्धी झाल्यामुळे आपले सगळे ज्ञान फुकट गेले असे तुम्हाला वाटते? हेच तुम्ही गृहीत धरून राहिलात काय?''

मग गुरुमहाराजांनी त्यांना पुढे सांगितले, ''शास्त्री महाराज तुमचे भाग्य फार मोठे आहे. नृसिंहवाडी क्षेत्रामध्ये भगवान् नृसिंह स्वामी महाराज बारा वर्षे राहिले.''

त्या वेळेला कांही वाडी गांव नव्हते. अरण्य होते. औदुंबर वृक्षाखाली नरसिंह सरस्वती महाराज राहाताहेत. ते त्यांचे तपस्थान आहे. ''त्या स्थानामध्ये तुम्ही सेवा करा. नरसिंह सरस्वती महाराजांची कृपा संपादन करा. ते स्वतः तुम्हाला चतुर्थाश्रम दीक्षा देतील. आणि त्यांची सेवा करून मानव जन्माचे सार्थक करून घ्या. मनांतल्या संसाराच्या वासना काढून टाका.''

नारायण शास्त्री महाराजांच्या मनाचे समाधान झाले. गुरु महाराजांची आज्ञा घेऊन आपल्या गांवी ते परतले. कुठे चालले होते आणि कुठे बदलले! भाग्य सबंध बदलून टाकले गुरु महाराजांनी. संत महात्म्यांच्या संगतीचे हे फळ आहे.

पुढे त्यांना दोन मुली व एक मुलगा झाला. आणि पत्नी



निवर्तल्यावर महाराजांनी त्या मुलींची व्यवस्था आपल्या आप्तेष्टांकडे केली. आणि त्यांनी आता हा मार्ग निश्चित केला. आता संसार बंद. आता कांही करायचे नाही. मनापासून ठरले. कोल्हापूर क्षेत्रामध्ये महालक्ष्मीच्या मंदिरापासून कांही अंतरावर कात्यायनीदेवीचे स्थान आहे. तिथे आपली झोपडी बांधून महाराज राहाताहेत. रोज संध्याकाळच्या वेळेला नित्यकर्म वगैरे झाल्यानंतर भजन करायचे. आता भगवत् भजनाशिवाय दुसरे कांहीही करायचे नाही; हा मनाचा निश्चय झाला.

त्याच वेळेला इकडे गांवामध्ये एक ब्राह्मण महालक्ष्मीची उपासना करतो आहे. देवीचे पाठ करतो आहे. कांही त्याचे काम असेल. सकाम भक्ती त्याची चालू आहे. बरेच दिवस त्याची उपासना झाल्यानंतर एक दिवशी मध्यरात्री भगवती महालक्ष्मी त्याच्या समोर प्रगट झालेली आहे. ''काय तुला पाहिजे तो वर मागून घे'', म्हणाली. काय दुर्दैव त्या ब्राह्मणाचे! ते तेज त्याच्या डोळ्याला सहन झाले नाही. आणि तो ब्राह्मण मूर्च्छित पडला. देवीने काय वर देऊ विचारल्यावर तो कांहीच बोलला नाही. आता इथे मध्यस्थ कोणी तरी पाहिजे. इकडे कात्यायनीच्या मंदिराजवळील झोपडीमध्ये महाराज त्यावेळी भजन करीत बसले होते. महालक्ष्मी त्या झोपडीच्या बाहेर उभी राहून ''वर मागा, वर मागा'' म्हणाली. एकदम महाराज सावध झाले. बाहेर आले. साष्टांग नमस्कार केला. त्यांना हे सगळे समजले. ''आईसाहेब, मला वर देण्यासाठी कशाला आलात? त्या ब्राह्मणाची इच्छा पूर्ण करा. त्याच्यावर कृपा करा.''

महालक्ष्मी म्हणाली, ''तुम्ही आमच्याबरोबर चला. त्या

ब्राह्मणाला सावध करा आणि विचारा त्याची काय इच्छा आहे.'' आपल्याकडे देवी आली आहे, आपण अगोदर वर मागून घ्यावा वगैरे काहीच स्वार्थ महाराजांच्या मनांत नाही. इच्छा कांहीही नसणे हे संतांचे मुख्य लक्षण आहे. चांगली इच्छा म्हणजे सुद्धा शेवटी आग्रह होतो ना! आग्रह कसलाच नाही. चित्ती असो द्यावे समाधान. झाल देवाच्या इच्छेने तर ठीक अशी संतांची वृत्ती असते. जगदंबेच्या बरोबर नारायण स्वामी महाराज मंदिरात आले. तो ब्राह्मण अद्यापि मूर्च्छितच पडलेला होता. त्याच्या जवळ जाऊन अंगावरून हात फिरवला. ''उठा. देवी तुम्हाला वर वर देण्याकरता आली'', म्हणाले. सावध झाला ब्राह्मण. त्याला पाहिजे होता तो वर दिला जगन्मातेने. आणि नंतर म्हणाली, ''शास्त्री महाराज तुम्ही आता कांही तरी वर मागून घ्या.'' अगोदर या ब्राह्मणाचे काम झालेले आहे. ''तुम्ही कांही तरी मागून घेतले पाहिजे.''

स्वामी महाराज म्हणाले, ''आपले दर्शन झाले. आता यापेक्षा वेगळा काय वर मागणार? आपली इच्छा असेल तर एवढाच वर द्या. काशीक्षेत्रामध्ये आमच्या गुरु महारांजानी जे आमचे पुढचे भवितव्य वर्णन केलेले आहे--साक्षात् नरसिंहसरस्वती दत्तात्रय स्वामी महाराज तुम्हाला संन्यासदीक्षा देऊन कृतार्थ करणार आहेत-- तो वर आपण द्या. गुरु महाराजांची इच्छा आपण पूर्ण करा. त्यापेक्षा आणखी कांही नको.''

प्रसन्न झाली भगवती लक्ष्मी देवी. आणि सांगितले, ''तुम्ही आता वाडीला गेल्यानंतर पुन्हा कधीतरी इथे या. तुमचे भजन ऐकण्याची आमची इच्छा आहे.'' महाराज काय एकटे बसून



भजन करायचे. परंतु तन्मय अवस्थेमध्ये भजन व्हायचे. देवीलासुध्दा ते ऐकण्याची इच्छा झाली. महाराज म्हणाले, ''गुरुमहाराजांची आज्ञा मिळाली तर येईन.'' भगवती गुप्त झाली. ईश्वरसाक्षात्कार हा त्यांना त्या अवस्थेमध्ये पूर्वीच झालेला आहे. सद्गुरू महाराजांची प्रत्यक्षभेट व्हायची होती अजून.

वाडी क्षेत्रामध्ये नारायण स्वामी महाराज येऊन राहिलेले आहेत. आपल्या उपाध्यायांच्या घरी राहिले. नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी त्यांना दृष्टांत देऊन सांगितले, ''तुमच्या दोन मुलींना इकडे घेऊन या. त्या मुलींना बिचाऱ्यांना आई नाही. तुमच्याजवळ राहाण्याचे समाधान तरी मिळेल.'' महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्या दोन लहान मुलींना वाडीला घेऊन आले. पण महाराजांचा नित्य क्रम मात्र अखंड चालू आहे.

कृष्णा पंचगंगा संगमावर प्रातःकाली जाऊन स्नान करायचे. नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या मनोहर पादुकांवर पाणी घालायचे आणि गुरुचरित्राचे वाचन करायचे, वेदाध्ययन करायचे. स्वयंपाक करून मुलींना जेवायला घालायचे आपणही जेवायचे. संध्याकाळीही मुलींची सगळी व्यवस्था करायची. आपण कांही आहार घ्यायचा नाही. मुली जेवून निजल्यानंतर आपण आसन घालून बसायचे. आणि ध्यानाचा अभ्यास करायचा. सगुण निर्गुण स्वरुपाचे ध्यान चाललेले आहे. सगुण निर्गुण एकच आहे ही भावना आहे.

**तुज सगुण म्हणू की निर्गुण रे।**
**सगुण निर्गुण एकू गोविंदु रे।**

संतांचा हा निश्चय आहे त्यात भेद नाहीये. ध्यानात पुष्कळ वेळ जायचा. निद्रा नाही. आहार कमी झाल्यानंतर निद्राही कमी होते. अर्ध पोटी रहावे योगशास्त्रकार सांगतात. अर्धा आहार, एक चतुर्थांश पाणी आणि एक चतुर्थांश वायू असा आहार घेतल्यावर कशाला आळस येईल,निद्रा येईल?

एक दिवस त्यांनी खाली पादुकांजवळ जाऊन प्रार्थना केली, ''काशीत गुरु महाराजांनी सांगितल्याप्रमाणें आपण आम्हाला संन्यास दीक्षा केव्हां देणार?'' दत्तप्रभु म्हणाले, ''त्याला अद्यापि अवकाश आहे.''

शास्त्राकार सांगतात मनाचा पूर्ण निग्रह झाल्याशिवाय संन्यास घ्यायचा नाही. आचार्य महाराजांचाही तोच सिद्धांत आहे. पांढरी वस्त्रे टाकून देऊन भगवी वस्त्र धारण केली म्हणजे संन्यास झाला असे नाही. पूर्ण वैराग्य मनामध्ये निर्माण झाले असले पाहिजे. संसाराची आठवणसुद्धा राहून उपयोग नाही.

याप्रमाणे कांही दिवस गेल्यावर पुन्हा दृष्टांत झाला. दत्तप्रभुंनी सांगितले, ''तुमची संन्यासग्रहणाची वेळ जवळ आली आहे. काय तुमच्या सामान सुमानाची व्यवस्था करायची असेल ती करा.'' नारायणस्वामींनी आपल्या उपाध्यायांना सर्व सामान देऊन टाकले. प्रत्यक्ष दत्तप्रभुंनी त्यांना संन्यासदीक्षा द्यावी हे त्यांचे केवढे भाग्य आहे! नित्याप्रमाणें पहाटे संगमावर स्नानाला गेले आणि नदीत बुडी मारल्यावर एकदम त्यांचा पाय सरकला म्हणा आणि नाका तोंडात पाणी जायला लागले. आपला जर आता मृत्यु आला तर गुरु महाराजांनी सांगितल्याप्रमाणें संन्यासदीक्षा घेणे राहून जाणार याचे त्यांना वाईट वाटू लागले.



एवढ्यात त्यांना एक विलक्षण दृष्य पाण्यात दिसले. एक मोठा मांडव घातलेला आहे. ब्राह्मणमंडळी वेदपठण करताहेत आणि दत्तप्रभु आसनावर बसले आहेत. नारायणस्वामींना कांही कळेच ना. कुठे आलो आपण? दत्तप्रभुंनी त्यांना सांगितले, ''नारायण शास्त्री तुमची संन्यासदीक्षा घ्यायची वेळ आलेली आहे. तयारीत राहा असे तुम्हाला सांगितले होते. तो दिवस आज आला आहे. लवकर स्नान संध्या आटोपा. आणि इकडे या.'' आणि नंतर त्यांना संन्यास देऊन तारक मंत्राचा उपदेश केलेला आहे. संन्यासधर्माचा उपदेश करून जाण्याची आज्ञा केली. आणि ते सबंध दृष्य नाहीसे झाले. आणि ज्या संगमावर ते स्नान करण्याकरता आले होते. तिथेच ते प्रत आलेले आहेत. नंतर गावात आले.

ह्यांची भगवी वस्त्रे, दंड, कमंडलू वगैरे पाहून गांवातली सर्व मंडळी तिथे आली. विचारू लागली. ''काय स्वामी महाराज तुमचे कोण गुरुजी आहेत? तुम्हाला संन्यास कोणी दिला? काय खरे असेल ते सांगा. नाही तर तुम्हाला इथे आम्ही राहू देणार नाही.'' हा एक प्रसंग आलेला आहे. आता त्यांनी काय प्रत्यक्ष गुरु महाराजांनी संन्यास दिला असे सांगायचे काय? गावांतल्या श्रद्धाळु मंडळींना ते पटेल. सर्वांच्या मनांत श्रद्धा असणे शक्य नाही. त्यांची हेटाळणीच करणार. काय गुरु महाराज संन्यास देतात काय? कलियुगामध्ये असे कधी झाले आहे काय असेच म्हणणार. नारायण स्वामी महाराज गप्प बसले. कांही भाषण केले नाही. गांवातल्या लोकांनी मंदिरात जाऊन देवावर पाणी घालायला बंदी घातली. तिथल्या विठ्ठल मंदिरात कोणी एक महंत होते त्यांनीही सर्व पुजाऱ्यांना सांगितले की नारायण स्वामी महाराज अशास्त्रीय

रीतीने संन्यास घेऊन आलेले आहेत त्यांना स्थान देऊ नका. ह्यांनी कांही भाषण केले नाही. तिथेच एका बाजूला राहिले. भिक्षा नाही कांही नाही. पण भजन करीत राहायचे.

रात्रीच्या वेळेला सद्गुरू महाराजांनी सर्वही पुजारी मंडळींच्या स्वप्नांत जाऊन विचारले, "काय चालवलय तुम्ही? कोणाचा अपमान करता? संन्यास त्यांना आम्ही दिलेला आहे. उद्या मुकाट्याने त्यांना भिक्षा करा. आणि मी जिथे राहातो तिथे त्यांना राहायला जागा करून द्या. त्यांचा अपमान करू नका." असे स्वत: महाराजांनी प्रत्येक पुजाऱ्याला स्वप्नात जाऊन सांगितले. ते सगळे एकमेकांना हे स्वप्न सांगू लागले.

नारायण स्वामी महाराज आपले भजन करीत बसायचे. "तुझी चिंता त्यासी सर्व आहे." त्या विठ्ठल मंदिरातल्या महंतांनी उत्सुकतेने खिडकीतून पाहिले, हे स्वामी महाराज दार बंद करून काय करताहेत. त्यांना असे दृष्य दिसले की नारायण स्वामी भजन करताहेत आणि त्यांच्यासमोर एक मोठा सिंह बसला आहे. त्यांनाही पश्चात्ताप झाला. तेही शरण आलेले आहेत. मग सर्वांनी नारायणस्वामींची भिक्षा केलेली आहे.

वाडीला असा नियम आहे की पहाटे पुजाऱ्याने मनोहर पादुकांची पूजा करण्यापूर्वी नारायण स्वामींच्या पादुकांची पूजा करायची. आपल्या भक्ताला एवढी योग्यता देवांनी दिली आहे. आपल्या आधी आपल्या भक्ताची पूजा करावी.

असे कांही दिवस गेल्यानंतर सद्गुरुंच्या आज्ञेने जगदंबेच्या इच्छेप्रमाणे नारायणस्वामी महाराज कोल्हापूर क्षेत्रामध्ये आलेले आहेत. तिला त्यांचे भजन ऐकायचे होते. मंदिराच्या पाठीमागे



पूर्वी नारायणस्वामींचा मठ होता. तिथे ते राहिले. पंचगंगा नदीवर पहाटे जाऊन स्नान करुन यावे. छत्रपति राजे देवीच्या दर्शनाला आल्यावर दर्शन झाल्यावर नारायण स्वामींची विचारपूस करून येत. आणि संध्याकाळ झाल्यानंतर दोन आसने घालून ठेवलेली असायची. आणि नारायण स्वामी महाराज हे भजन करण्याकरता बसायचे. भजनाला सुरवात झाल्यावर एका आसनावर दत्त महाराज एका आसनावर भगवती देवीने येऊन बसावे. भक्ताचे भजन ऐकण्याकरता यावे. भक्ताच्या मनांत कांही अभिमान नाही. आपण भजन करतो म्हणून देव, देवी ऐकायला आलेली आहे. हा विचारच मनामध्ये नाही. बुद्धीला प्रेरणा करणारी ईश्वरशक्तीच आहे. मग आम्ही करतो' असे कसे म्हणायचे? ही त्यांची भावना आहे. पण त्यांचे कौतुक करावे हे देवालाही वाटते. रोज त्यांनी नारायण स्वामींचे भजन ऐकावे.

एकदा दत्तात्रेय महाराजांना देवीने सांगितले, इथून एक पांच सात कोसावर एक डोंगर आहे. त्या डोंगरावर अरण्य आहे. विजयादेवीचे मंदिर आहे. तिथे जाऊन तुम्ही दर्शन करून या. एवढेच सांगितले. काय काम वगैरे कांही सांगितले नाही. दुसरे दिवशी स्नान वगैरे आटोपून महाराज निघाले. पूर्वाश्रमीचे जे सासरे होते त्यांच्या गांवामध्ये त्या दिवशी मुक्काम केला. आणि संध्याकाळी त्या विजयादेवीचे मंदिर ज्या गांवाजवळ होते तिथे येऊन पोहोचले. महाराजांचा मुक्काम झाला.

दुसरे दिवशी भिक्षा वगैरे झाली आणि त्या दर्शनाला आता जायचे. ते मंदिर अरण्यातच आहे. कोणी तिथे त्यावेळी राहात नव्हते. निर्जन स्थळ होते. आणि प्रसिद्धी अशी होती एक मोठा

वाघ त्या ठिकाणी येऊन राहिलेला आहे. त्यामुळे घाबरुन लोक एकटे दुकटे जायला घाबरत. गांवातल्या मंडळींनी ही परिस्थिती महाराजांना सांगितली. ''तेव्हां आत्ता संध्याकाळी जाण्यापेक्षा उद्या सकाळी सर्व मिळून जाऊ, अग्निसुद्धा आपल्या बरोबर घेऊन जाऊ.'' असें त्यांनी सुचवले. त्यावर महाराज म्हणाले, ''आम्हाला आत्ताच जायचय. वाघ भित्रा असतो. तो उगीच कोणाला त्रास देत नाही. निघा आता'' आणि दंड कमंडलु घेऊन निघाले. आपल्याला इथे कशाकरता पाठवलय हे त्यांना समजले. एका शिष्याला त्यांनी मोठी सुई, दहा बारा बिब्बे बरोबर घेण्यास सांगितले. पांच सहा वाजता त्या मंदिरात येऊन पोहोचले. शेकोटी करण्यासाठी शिष्यांना लाकडे आणायला सांगितली.

देवीच्या पुजाऱ्याने देवीच्या मंदिरातील दिव्यात तेल घातले आणि तो निघून गेला. सगळी मंडळी नित्याप्रमाणे भजन ऐकण्याकरता बसलेली आहेत. इतक्यात त्या भागात जो वाघ आलेला होता तो तिथे येऊन पोहोचला. नारायण-स्वामींच्या सांगण्याप्रमाणे तो तिथेच थांबला. या मंडळींना सांगितले, तुम्ही कांहीही भिऊ नका. भिण्याचे कांही कारण नाहीये. फक्त शांतपणे बसा. आणि थोड्याच वेळात भजन संपल्यावर त्या वाघाला आंत यायला सांगितले. त्याच्या पायामध्ये कांटा मोडला होता. त्याला फार क्लेश होत होते. लंगडत लंगडत तो वाघ महाराजांच्या जवळ येऊन बसला. त्याचा पाय महाराजांनी हातात घेतला.

शांत वृत्ती आहे. अहिंसा ज्याच्या मनामध्ये पूर्णपणें सिद्ध झालेली आहे त्याच्याजवळ येणाऱ्या कोणच्याही प्राण्याच्या मनामध्ये वैरभाव राहात नाही. वाघासारख्या क्रूर प्राण्याला बोलता



येत नाही, नारायण स्वामी महाराज कोण माहीत नाही पण तो त्यांच्यापर्यंत येऊन पोहोचला. महाराजांनी दिवा आणण्यास सांगितले. पंचाईत आली. वाघाजवळ बसलेल्या महाराजांच्या जवळ दिवा घेऊन कसे जाणार. महाराजांनी सांगितले होते, ''भिऊ नका, कांही काळजी करू नका.'' एक मनुष्य तयार झाला. दिवा घेऊन आला. महाराजांनी त्या दिव्याच्या प्रकाशामध्ये त्या वाघाचा पाय स्वच्छ धुवून काढला. सुईने त्याचा फोड फोडला पायावरचा. त्यातून पू. रक्त वगैरे निघाले आणि आंत गेलेला तो कांटाही बाहेर पडला. बिब्बे फोडून त्या जखमेवर घातले. त्या वाघाला पूर्ण समाधान प्राप्त झाले. सगळ्यांना निजायला सांगितले. आपणही निजलेले आहेत. तो वाघही त्यांच्या पायाजवळ मांजरासारखा स्वस्थ निजलेला आहे.

प्रातः काल झाल्यानंतर सगळी मंडळी उठली. वाघ उठलेला आहे. त्याला सांगितले, ''बाबा, इथे तूं येऊ नकोस. दिवसा येऊ नकोस. कोणाची हिंसा करू. नकोस.'' तो वाघ कोणीतरी पूर्व जन्मीचा अधिकारी महात्मा असला पाहिजे. त्या शिवाय का दत्तात्रेय प्रभु व जगदंबेने त्याचे क्लेश दूर करण्याकरता नारायणस्वामी महाराजांना तिथपर्यंत पाठवले! असा कोणीतरी अधिकारी महात्मा. त्याच्यावरती महाराजांनी कृपा केली. त्याचे क्लेश दूर केले. तिथून महाराज परत येताना गांवामध्ये भिक्षा वगैरे केली.

आणखी एक कथा महाराजांच्या चरित्रामध्ये आहे.

देवाचे आणि भक्ताचे केव्हा केव्हा पटत नाही. भांडण होते. सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी तो प्रसंग एका

अभंगामध्ये वर्णन केलेला आहे. चिखलदा किंवा कोणत्या तरी गांवात त्यांचा चातुर्मास झाला होता. त्यांच्या बरोबर एक दत्तमूर्ति असायची... लोक म्हणाले हे आत्ता दुपारी नदीवर कुठे निघाले. कांही कल्पना नाही. आंत नदीमध्ये जाऊन ती मूर्ति त्यांनी आणली. 'यथा देहे तथा देवे' ही भक्ती असेल तर हे असे घडते नाही तर मूर्तिमध्ये कुठे देव आहे, दगडामध्ये कुठे देव आहे हे नुसते काथ्याकूट करण्यामध्येच जन्म फुकट जातो.

सर्वांनी महाराजांना विचारले, काय झाले. महाराज म्हणाले, "देवांचा हट्ट आहे आज दिवाळीचे त्यांना अभ्यंग स्नान हवे आहे. मी कुठले गरम पाणी आणू, काय करू? सकाळी आमचे भांडण झाले." लोकांनी पाणी तापिवलेले आहे, अत्तर वगैरे लावले, अभ्यंग स्नान देवाला घातले. महाराजांनी त्या वेळेला एक अभंग केला आहे--

**मित्र मित्र जरी भांडती ।**
**तरी पुन्हा एक होती ।**

भांडण होते, म्हणाले, पण ते खरे भांडण नाही.

**दंपतीचा हो कलह ।**
**लवमात्र न तुटे स्नेह ।**

स्त्री पुरुषांचा कलह होतो. संसारामध्ये चालायचेच. पण स्नेहभाव कधीही तुटत नाही.

**देव भक्तांचे भांडण ।**
**पराभक्तीचे ।**



सद्गुरुमहाराज सांगताहेत. आमचे भांडण म्हणजे ही परा भक्ती आहे.

**वासु म्हणे हा विनोद ।**
**देतो दत्ता परानंद ।**

अशीच एक घटना नारायणस्वामी महाराजांच्या चरित्रामध्ये घडलेली आहे.

वाडीमध्ये नारायण स्वामी कायमचे राहिले. ध्यानाचा अखंड अभ्यास करायचा पादुकांना पाणी घालून पूजा करायची, गंध फूल अर्पण करायचे, गुरुचरित्र वाचायचे. हे सगळे चालले आहे. रोज सकाळी कृष्णा पंचगंगानदी संगमावर स्नान करून यायचे. त्यावेळी वाडी गांवाबाहेर एक महारोगी मनुष्य झोपडीत राहात होता. देवाच्या कृपेने आपण या रोगातून मुक्त होऊ अशी त्याची इच्छा होती, भक्ती होती.

त्याला एके दिवशी देवाने दृष्टांत दिला. "तुझा रोग बरा होईल" देव म्हणाले. त्याने विचारले, "कसा काय?" देवांनी सांगितले, "इथे एक नारायण स्वामी म्हणून एक साधू आहेत. ते रोज सकाळी संगमावर स्नान करण्याकरता जातात. ते स्नानाकरता नदीत उतरले की तू त्यांच्या खालच्या बाजूला नदीत स्नान कर. त्यांनी बुडी मारल्याबरोबर तूंही बुडी मार. तुझ्या अंगावरुन त्यांचे पाणी गेले म्हणजे तुझा रोग जाईल." नारायण स्वामी कोण वगैरे याला कांही माहीत नाही. गांवात चौकशी केली. गांवातल्या लोकांनी सांगितले, "पहाटे ३/४ वाजता सर्वांच्या आधी जे संगमावर स्नानाला जातात ते नारायण स्वामी.

हा रात्रीच त्या रस्त्यामध्ये जाऊन बसला. पहाटे स्वामी महाराज भगवन्नामस्मरण करीत संगमावर जाण्याकरता निघाले. त्यांच्या पाठी मागून हाही जाऊ लागला. त्यांनी ह्याच्याकडे पाहिले. सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. देवाचे कारस्थान आहे, म्हणाले. हा रोगी मनुष्य नदीच्या खालच्या बाजूला जाऊन उभा राहिला. महाराज स्नानाला नदीत उतरले की आपणही उतरायचे.

महाराजांनी त्याला विचारले, ''इतक्या पहाटे आत्ता तूं इथे कशा करता आला आहेस?''

तो म्हणाला, ''स्नान करण्याकरता आलो आहे.''

नारायण स्वामी स्नान करताच वर आले. त्याला म्हणले, ''जा. स्नान कर'' तो ''नाही'' म्हणाला.

तो पुढे म्हणाला, ''तुम्ही स्नान केल्यानंतर मला स्नान करायचयं.''

त्यांनी विचारले, ''ते तुला कोणी सांगितले? कशाकरता सांगितले?'' वकील ज्याप्रमाणे काढून घेतात त्याप्रमाणे त्याप्रमाणे त्याच्याकडून महाराजांनी सगळे काढून घेतले. तो म्हणाला, ''मला नरसिंह सरस्वती महाराजांनी सांगितले. तुमच्याबरोबर खालच्या बाजूला मी स्नान केले म्हणजे माझा रोग बरा होणार आहे, महाराज.''

महाराज म्हणाले, ''चल बाहेर'' आणि स्नानबिन तसेच ठेवून त्याला घेऊन इकडे देवाकडे आले. अजून गांवातली मंडळी उठायची होती. त्याला खाली देवासमोर नदीपर्यंत आणलेला आहे. आपणवर उभे राहिले. ''तिथे नदीवर स्नान कर, बुडी मार'' असे त्याला सांगितले. बुडी मारून तो वरती आलेला



आहे. महाराज म्हणाले, ''सगळे शरीर पाहून घे.'' त्याने पाहिले. कांही नाही. रोग नाही, कांही नाही. उत्तम शरीर झालेले आहे. त्याला सांगितले, ''आत्ताच्या आत्ता हे वाडी गांव सोडून तुझ्या गांवाला चालता हो. जर सूर्योदयानंतर तूं इथे राहिलास तर पुन्हा पूर्वीसारखे तुझे शरीर होईल.'' तो म्हणाला ह्यांच्या भांडणामध्ये आपण कशाला राहायचे. जाऊ या. वाडी सोडून निघून गेला.

लगेच महाराज वर आले. स्नान नाही कांही नाही. दंडाला परशु मुद्रा बांधली. गांवाला जाण्याची तयारी केली. आणि खाली वंदन करण्याकरता आले. बाकी कोणीच मंडळी नव्हती. दत्तप्रभुंनी आंतून विचारले, ''काय स्वामी महाराज परशुमुद्रा बांधलीत, काय गांवाला निघालात काय? आत्ता यावेळी? कांही कल्पना नाही आम्हाला कांही बोलला नाहीत.''

नारायण. थोडेसे रागामध्ये होते. ''काय करायचे, महाराज, इथे राहून. आमचा तुम्हाला कंटाळा आलेला दिसतोय.''

दत्ताप्रभु म्हणाले, ''तुमचा आम्हाला कंटाळा आला? कोणी सांगितले तुम्हाला?'' 'त्या ब्राह्मणाला माझ्या बरोबर स्नानाला पाठवायचे आणि त्यामुळे त्याचा रोग बरा झाला अशी जगात तुम्हाला प्रसिद्धी करायची आहे. हे कोणी केले? हे कंटाळा आणायचेच काम आहे. आमच्या अनंत जन्मांच्या प्रारब्धाने आपल्या कृपेने आपली सेवा करुन आनंदात राहाण्याचा योग या जन्मात आला. किती जन्म गेले कोणाला ठाऊक. आणि याही जन्मात तुम्हीच उपाधि द्यायला लागलात? मग आमचे व्हायचे कसे? मान सन्मान मिळाल्यानंतर आमच्या हातून साधनाभ्यास कसा होईल? ह्याला कंटाळा म्हणायचा नाही तर काय म्हणायचे?''

दत्तप्रभु म्हणाले, "अहो जगाचा उद्धार तुमच्यासारख्या लोकांनी केला पाहिजे. तुम्ही जर उपेक्षा केलीत तर जगाचा उद्धार कसा व्हायचा?"

नारायण स्वामींनी लगेच उत्तर दिले, "जगाच्या उद्धाराची आम्हाला जरूर नाही. जग ज्याने निर्माण केलं त्याच्यावर ती जबाबदारी आहे." ते, काशीमध्ये तोच अभ्यास केल्याने, जरासे चतुर झाले होते. ते पुढे म्हणाले, "गुरु महाराजांनी वादविवाद करायचा नाही असं सांगितलय, महाराज. क्षमा करा."

लगेच वर आले. दंड धरला हातात, दत्तप्रभुंनी, परशु मुद्रा सोडून टाकली आणि नारायण स्वामीना म्हणाले, "आता जा. तुमच्या वाटेला आता आम्ही जाणार नाही. तुम्ही अगदी आनंदाने राहा." मग नारायण स्वामीनी दत्तप्रभुंच्याकडून हे कबूल करून घेतले आणि नंतर मग स्नानाला गेले.

तेव्हां अशा दृष्टीने आपला मानसन्मान करुन घेण्यात सांपडलो तर आपली सेवा होणार नाही. कशाचीही अपेक्षा उपयोगी नाही, महाराज. देवाकडूनच कबूल करून घेतलेले आहे.. त्यामुळे प्रारब्धसुद्धा बाजूला झालेले आहे. पुढे बरीच वर्षे महाराज त्या ठिकाणी राहिले. आणखी कांही घटना त्यांच्या चरित्रात घडलेल्या आहेत. लोकांचे कल्याण झाले. अनेकांना त्यांनी पुष्कळ मार्गदर्शन केले. त्यांची शिष्यमंडळीही बरीच झाली.

कृष्णानंदस्वामीमहाराज म्हणून त्यांचे एक शिष्य होते. त्यांनी गांवातल्या मंडळींना सांगून पुढे उत्सव वगैरे चालू ठेवले, अन्नदान केले.

वाडी क्षेत्रामध्ये विश्वनाथ ठोबळे म्हणून होते. त्यांना गुरुभक्त



म्हणत. ते सद्गुरु नरसिंहसरस्वती स्वामी महाराज फार मोठे भक्त होते. संसारी असून फार मोठे भक्त होते. दुपारच्या वेळेला सहज म्हणून महाराज त्यांच्या घरात जायचे. "काय विश्वंभर ढोबळे, बरं आहे आहे की नाही?" त्यांनी बायकोला सांगावे, "लवकर पाट आण. महाराज आलेले आहेत." बायकोला कांही जे दिसायचे नाहीत. महाराज बसायचे, बोलायचे. गुरुभक्त म्हणूनच त्यांचे काव्य मोठे प्रसिद्ध आहे.

'ओवाळू आरती माझ्या सद्गुरुनाथा!' अशा कांकडारतीपासून शेजारतीपर्यंत अनेक आरत्या, काव्य त्यांनी केले आहे. तेही नारायण स्वामीचे मोठे शिष्य होते.

तेव्हां अशा अनेक मंडळींनी महाराजांच्या सान्निध्यामध्ये राहून शुद्ध भक्ती करुन महाराजांचे मार्गदर्शन प्राप्त करुन घेतलेले आहे. प्रसंग पडला तर देवाचेसुद्धा ऐकायचे नाही. हे खऱ्या भक्ताचे लक्षण आहे. पराभक्ती याला म्हणतात. विरोध करायचा नाही. याला द्वेष म्हणत नाहीत. असेही त्यांनी आपल्या चरित्रावरून दाखवून दिलेले आहे.

आणखी आजच्या दिवशी सकाळी ८/९ वाजता स्नानाला गेले नारायण स्वामी आणि अचानक ब्रदेवांनी पाठवलेले एक दिव्य विमान तिथे आले. त्या विमानामध्ये बसून ते निघून गेले. असे गोपाळ स्वामी नांवाच्या एका महापुरुषांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यांनी सांगितले, "महाराज आज ब्रह्मलोकाला गेले. याच देहाने गेले." इतकी योग्यता जीवाला प्राप्त करून घेता येते.

केवळ प्रारब्धवादही उपयोगी नाही. शास्त्राने सांगितलेली भगवत् भक्ती नामस्मरण, ध्यान, धारणा वगैरे (शास्त्रीय) प्रयत्नांनी

अनेक जन्मांच्या पातकांचा नाश होऊ शकतो. पापक्षय झाल्यानंतर चित्त स्थिर होऊ शकते. आणि स्थिर चित्ताने जर ध्यान सुरु झाले तर त्या पुण्याला कांही अंतच नाही.

नारायण स्वामींचा ध्यानयोग अत्यंत श्रेष्ठ होता असे सांगतात. ध्यानयोग म्हणजे मानसपूजा. डोळे झांकून मानसपूजेला बसल्यानंतर मनानेच सगळे उपचार देवाला अर्पण करायचे. देवाला मनानेच स्नान घालायचे पाणी घालायचे, फुले वाहायची. दागदागिने घालायचे. देवाला स्नान घालताना देवाच्या अंगावरचे दागिने काढून ठेवायचे आणि मग देवाला स्नान घालायचे. एकदा असे करताना देवाच्या बोटातील अंगठी काढून स्वत:च्या हातात ठेवली. स्नान वगैरे झाल्यावर ती अंगठी देवाच्या बोटात परत घालायची विसरले. पूजा वगैरे समाप्त करून महाराजांनी बाहेर येऊन डोळे उघडून पहातात तो त्या रत्नजडीत अंगठीचा प्रकाश जिकडे तिकडे पडलेला आहे. एकदम त्यांच्या लक्षात आले. आंत गेले क्षमा मागून ती अंगठी परत देवाच्या बोटात घातली. हे सगळे सत्य आहे ना! ईश्वर आहे हे सत्य मानले पाहिजे. तर ईश्वर नाही असे मानले तर या घटना कशा सत्य ठरतील? इतका ध्यानयोगाचा अभ्यास अखंड चालू राहायला किती पुण्यसंचय झाला असेल! किती मन एकाग्र झाले असेल! संसाराची विस्मृती किती झाली असेल! त्याशिवाय इतका ध्यानयोगाचा अभ्यास होणार नाही. ही खरी ईश्वराची कृपा आहे. संसारामध्ये काय लागेल ते परमात्माच देतो आहे. त्याच्याशिवाय देणारा दुसरा कोणी नाही. संसारही देवानेच करायचा आहे. योगक्षेम शब्दाचे दोन्ही अर्थ आहेत. संसारातील योगक्षेमही तोच चालविणारा



आहे. आणि परमार्थातही काय कमी आहे, काय पाहिजे आहे, ही सगळी व्यवस्थाही तोच पहाणारा आहे. हा संत महात्म्यांचा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे अशी दिव्य चरित्रं आपोआप घडतात.

देवालासुद्धा संतांची भीती बाळगावी लागते. हे स्वामी महाराज वाडी सोडून निघून गेले तर काय करावे, असे देवाला वाटले. कबूल करतात, तुमच्या नादाला आम्ही लागणार नाही बाबा. तुम्ही तुमचे ध्यानबिन करत बसा.

हे नारायण स्वामीच्या चरित्राचे चिंतन आपल्यासारख्या श्रद्धाळु मंडळींच्या सान्निध्यात त्यांच्याच कृपेने घडून आले आहे. त्यांनी आपल्या मानव जन्माचे सार्थक करून घेतलेले आहे. मूर्तिमध्ये देव आहे की नाही? हे खरे कशावरून? मूर्तीपूजा शास्त्रामध्ये नाही. असे कांही शास्त्रकारांचेही आक्षेप आहेत.

युवाशिक्षा म्हणून सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांनी एक छोटा ग्रंथ केलेला आहे. उपनिषदांमध्ये किती प्रकारच्या उपासना सांगितल्या आहेत त्याचे सगळे वर्णन करून शेवटी त्यांनी हा विषय काढलेला आहे. मूर्तीमध्ये देव नाही असे लोक म्हणतात. रामदास स्वामी हे मूर्तिपूजकच होते की म्हणाले. मूर्तीपूजा करूनच त्यांनी रामचंद्रांची कृपा संपादन केली, सर्व लोकांना मार्गदर्शन केले. हे या कलियुगातच केलेले आहे. आणि त्या युवाशिक्षेच्या शेवटी दहा पानामध्ये नारायण स्वामींचे संक्षिप्त चरित्र दिलेले आहे.

कृष्णा पंचगंगानदीच्या संगमावर श्री दत्तात्रेयांच्या ज्या पादुका आहेत, त्यांनी स्थापन केलेल्या त्याची ज्यांनी पूजा केली, चिंतन केले, ध्यान केले असे नारायण स्वामी जीवनमुक्त झाले. देह

असून संसार सुटला त्यांचा. देहापासून वेगळे झाले. ही योग्यता त्या पादुकांचे अर्चन करूनच नारायण स्वामींनी मिळवली. मूर्तीमध्ये देव नाही असे म्हणायचे कसे? मूर्तीपूजा योग्य कशी आहे याबद्दल पुष्कळ युक्तीवादही आहे. निराकार ईश्वराला आकार कसा येईल, असे म्हणतात लोक. पण निराकारालाच आकार येऊ शकतो. अग्नीला आकार कुठे आहे? पण ज्या लांकडात अग्नि पेटलेला आहे त्याचा आकार त्या अग्नीला येतो. पाण्याला आकार कुठे? पण जसं गोल, चौकोनी आळ केलं असेल तसा आकार त्या पाण्याला येतो. निराकाराला आकार येत नाही ही फक्त समजूत करून घेऊन काय उपयोग आहे?

सर्व जगत् कर्माप्रमाणे निर्माण केले भगवंतांनी. कर्माप्रमाणें फल देण्याचे कार्यही अखंड चालू आहे. अधिकारी नेमलेले आहेत सगळे. शंकराचार्य महाराजांच्या रूपाने, दत्तात्रेय प्रभुंच्या रूपाने, स्वतः सद्गुरुरूप अवतार धारण करून महाराज येताहेत, ईश्वर परमात्मा येतोय. आणि सद्गुरु स्वरुप धारण करूनच सर्वांना मार्गदर्शन करण्याचे काम चाललेले आहे. म्हणून दत्तात्रेय अवतार हा कायमचा राहाणारा आहे असे मोठ्या महाराजांनी एका ठिकाणी सांगितलेले आहे. रामकृष्णादि अवतार त्यांचे कार्य झाल्यावर अदृष्य झाले. रावणाला मारले, कंसाला मारले, जरासंधाला मारले, काम झाले निघून गेले. पण सद्गुरुंचे कार्य संपणार नाही असे मोठ्या महाराजांनी सांगितले. अनेक अज्ञानी जीव आहेत. त्या सगळ्या अज्ञानी जीवांचा उद्धार करायचा म्हणजे त्याला कालमर्यादा राहून कशी चालेल? कायम अवतार आहेत. दत्तात्रेयांचे.



तेव्हां नृसिंहसरस्वती दत्तात्रेय स्वामी महाराजांकडून संन्यास दीक्षा घेतल्यामुळे नारायण सरस्वती हे नामाभिधान त्यांना प्राप्त झाले. त्या ठिकाणी अखंड ध्यान करुन, सर्व लोकांना मार्गदर्शन करुन नारायण सरस्वती महाराज अदृष्य झालेले आहेत. त्यांचीच सर्वांवर कृपा व्हावी आणि आपली बुद्धी शुद्ध व्हावी. आपल्या बुद्धीमध्ये काम, क्रोध, लोभ वगैरे अनंत दोष आहेत. एक दोष गेला की दुसरा निर्माण होतो. इच्छा उत्पन्न होणे हा मोठा दोष आहे. कोणचीही इच्छा न होणे म्हणजे जीवन्मुक्त अवस्था आहे. स्थितप्रज्ञ त्याला म्हणतात.

अमूक एक मला मिळाले पाहिजे अशी इच्छा उत्पन्न झाली की न्याय अन्याय कसलाच विचार होत नाही. 'काम' म्हणतात इच्छेला. त्याला कोणी प्रतिबंध केल्याबरोबर लगेच क्रोध उत्पन्न होतो. आपल्या इच्छेला प्रतिबंध करणारा आपला शत्रू बनतो. आणि ती इच्छा जर पूर्ण व्हायला लागली तर त्याच्यापेक्षा जास्ती मिळावे अशी इच्छा निर्माण होते. पैसा मिळण्याची इच्छा पूर्ण झाल्यानंतर त्याचे रूपांतर लोभामध्ये होते. इच्छेला प्रतिबंध झाल्यानंतर कामाचे रूपांतर क्रोधात होते, म्हणजे कोणचा तरी विकार मनामध्ये कायम राहातो. लाभ व्हायला लागल्यानंतर लोभ उत्पन्न होतो म्हणतात. पुरा होतच नाही लोभ. त्यामुळे संग्रह वगैरे करणे योग्य नाही. संग्रह केल्यानंतर त्याचे दान व्हायला पाहिजे. 'मम मम' म्हणण्यामध्ये सगळा जन्म जातो आमचा. हे माझे ते माझे 'मम मम' सुटण्या करता दान करायला सांगितले आहे. 'न मम, न मम, न मम,' म्हणजे दान आहे. ती इच्छा उत्पन्न झाली पाहिजे.

भगवंतांच्या कृपेने हे सर्वही साध्य होते. सद्गुरुनारायण स्वामी महाराज यांची कृपा सर्वही भगवत् भक्तांच्या ठिकाणी व्हावी, श्रद्धाळू भक्तांना त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळावे आणि मनाची शुद्धी होऊन मन ईश्वरभक्तीकडे लागावे एवढीच त्यांच्या चरणाजवळ प्रार्थना करतो. या ठिकाणी सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती महाराज सद्गुरु सीताराम महाराज मोठ्या मोठ्या मंडळींचा संचार झालेला आहे. हे स्थान पवित्र आहे. देवराजींसारखी, आपल्यासारखी श्रद्धाळु मंडळी या ठिकाणी आहेत. ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी मानणारी आहेत. धार्मिक कार्यक्रम चालू आहेत. श्रद्धेने सत्पुरुषांची चरित्र ऐकण्याचीही इच्छा होते आहे. हे एक मोठे भारताचे भाग्य आहे. आणि हे भाग्य राहिले तरच भारताला चांगले दिवस येणार आहेत. संत महात्म्यांचे याकरता प्रयत्न चाललेले आहेत. ईश्वराला विसरू नका एवढेच ते सांगतात.

**किंबहुना सर्व सुखी...**
**पूर्ण होवोनि तिही लोकी**
**भजिजो आदिपुरुषी। अखंडीत।**

सगळी सुखं तुम्हाला मिळू देत. संसार सोडू नका तुम्ही! पण त्या देणाऱ्याला विसरु नका. ज्ञानराजांनी देवाजवळ ती प्रार्थना केली आहे.

तेव्हां हे चरित्र थोडे आपल्याला सांगितले. त्यांची निस्पृहता कशी होती, शक्ती किती होती मेलेल्याला जिवंत कसे केले असा आणखी काही कथाभाग आहे. भगवत् भक्त गुरुवर्य आत्मारामशास्त्री जेरे यांनी नारायण स्वामीचे मूळ चरित्र



संस्कृतमध्ये लिहिले. त्याचे भाषांतरही प. पू. गुळवणी महाराजांनी छापून प्रसिद्ध केले आहे. पुण्याला ते आश्रमामध्ये मिळते. त्याच्यावरुन नारायण स्वामीचे संपूर्ण चरित्र आपल्याला कळून येणार आहे. तेव्हां अशा संत महात्म्यांचे मार्गदर्शन हे भगवंतांनी करुन ठेवलेले आहे. त्यांनी सर्वांना मार्गदर्शन करणे म्हणजे देवाचेच कार्य आहे. त्याच्या मार्गदर्शनाने त्यांच्या संकल्पाने, त्यांच्या नुसत्या दृष्टीपाताने हे कार्य होऊ शकते. ज्यांचे मन पूर्णपणे निर्वासन झाले आहे त्यांची नुसती दृष्टी जरी आपल्यावर पडली तरी आपली मनोवृत्ती पूर्णपणे पालटून जाते. इतके सामर्थ्य त्यांच्या दृष्टीमध्ये आहे. तेव्हां अशा प्रकारे संत महात्म्यांची संगती प्रत्यक्षरूपाने जरी घडली नाही तरी त्यांच्या ग्रंथांचे वाचन, चिंतन ही संगती आपल्याला करता येते. त्यामुळे आपला उद्धार कसा होईल, आपली योग्यता कितपत आहे हेही कळून येईल. दोष किती आहेत. गुण किती आहेत. मनामध्ये, कमी आहेत का जास्ती आहेत हाही विचार त्या ग्रंथांच्या वाचनाने करता येईल आणि आपला उद्धार होईल.

तेव्हां ईश्वराच्या, सद्गुरुंच्या कृपेने सर्वांना सद्बुद्धि निर्माण व्हावी, सन्मार्गाचे आचरण त्यांच्याकडून अखंड व्हावे आणि सर्वांचा उद्धार व्हावा. एवढीच भगवत् स्वरुपनारायण स्वामींच्या, सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज आणि याच भागात होऊन गेलेल्या प. प. ओक स्वामी महाराजांच्या चरणी प्रार्थना. यथामति केलेले चिंतन त्या परमेश्वराला अर्पण करतो.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरु देव दत्त ।।**

□□

# लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ।

**(प. पू. श्रींनी रामनवमीच्या दिवशी श्रीदत्त आश्रम, जालना येथे केलेले प्रवचन २०-४-१९९४)**

आरंभालाच आपण ऐकले की दोन वर्षांपूर्वी इथल्या जागेत कांही नव्हते तिथे आज कायाकल्प झालेला आहे. दोन वर्षांपूर्वी भूमिपूजन झाले आज या ठिकाणी दत्तात्रेयांची स्थापना त्याचप्रमाणे ताईमहाराजांचे पूज्य पिताजी आणि सद्गुरूमहाराज यांच्या मूर्तींची स्थापना झालेली आहे. चित्र हेसुद्धा ईश्वराचे प्रतीक आहे. शास्त्राने ज्यांच्या पूजा करायला सांगितल्या आहेत अशा प्रतीकांपैकी प्रतीमा हीसुद्धा मूर्ती आहे. आणि त्या मूर्तींची पूजा हेसुद्धा मोठे पुण्यकारक कर्म आहे.

स्थापना झाल्यावर आता इथे यज्ञ व्हायचा आहे. देवतांचे आवाहन करायचे आहे. सत्पुरुषांच्याकडून देवतांना फक्त आवाहन केले जाते.

**सर्वेपि सुखिनः सन्तु**
**सर्वे सन्तु निरामया:**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु......**

सर्व सुखी व्हावेत म्हणून संत, महंत, सत्पुरुष हे देवतांना आवाहन करीत असतात आणि त्यांनी आवाहन केल्यावर



देवतांचे वास्तव्य होते.

मीराबाईने मनानेच भक्तीपूर्वक संकल्प करून गोपालकृष्णांची मूर्ती स्थापन केली होती. त्यांचे वास्तव्य त्याठिकाणी असायचे. विषाचा प्याला मीराबाईने घेतल पण ती मूर्ती काळी झाली म्हणतात. मीराला काही विषबाधा झाली नाही. त्याप्रमाणे सत्कर्म करणारी, अंत:करणात ज्यांच्या देवाने सद्वासना दिलेली आहे त्यांनी, दोन वर्षात दत्तमूर्ती आणि पिताजींच्या मूर्तीची स्थापना या ठिकाणी केली.

भगवंतांनी गीतेत सांगितले हे की देव, द्विज, प्राज्ञ वगैरेंची रोज पूजा व्हावी. संसारातील कर्म आपल्याकडून पुष्कळ घडतात. पण ही पूजा झाली पाहिजे. 'गुरू' शब्दाचा अर्थ ज्ञानेश्वर महाराजांनी दोन प्रकारे केला आहे.

मातापितरांची पूजा करावी. आणखी

**संसार ऐसा दारुण**
**भेटताची हरि शीण**
**ज्ञानराजे......**

मातापितरांची आणि गुरूंची पूजा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचीच पूजा आहे. त्याप्रमाणे ताईमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे मूर्तींची पूजा या ठिकाणी झालेली आहे. मूर्तींची स्थापना करण्याकरता भक्त मंडळींनी हा दत्ताश्रम निर्माण केला. त्याची व्यवस्था केली. 'सत्कर्म योगे वय घालवावे' हे समर्थांनी म्हटल्याप्रमाणे कांही तरी पुण्यकर्म रोज घडले पाहिजे. तेच आपल्या बरोबर येणार आहे. पैसा अडका किंवा कीर्ति बरोबर येत नाही. शास्त्राने सांगितलेले

पुण्यकर्म आपल्या यथाशक्तीने करीत राहाणे म्हणजे पुण्य जोडल्यासारखे आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी हे मोठे पुण्यकर्म झाले. या कार्याला सहाय्य करणाऱ्या मंडळींवर ईश्वराची कृपा व्हावी. सर्वांचे चांगले व्हावे एवढीच ताईमहाराजांची इच्छा आहे. संतांचा तो स्थायी भावच आहे. ताईमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे हे सर्व घडून आले आहे. सर्व मंडळी त्यात सहभागी झाली आहेत. सर्व मंडळींना या ठिकाणी येऊन नामस्मरण करता येते. यज्ञ याग तर आता होणारच आहेत पण यापुढे प्रवचन वगैरे कार्यक्रम इथे होणार आहेत.

आज राचचंद्रांचा जन्मदिवस! तसेच आज सौभाग्यसंपन्न ताईमहाराजाचाही वाढदिवस आहे. फार चांगली घटना आहे. रामचंद्रांच्या चरित्राचे अवलोकन करणारे भावार्थ रामायण एकनाथ महाराजांनी लिहिले आहे, समर्थांनी तर रामचंद्रांचे गुण वर्णन करून पुष्कळ साहित्य निर्माण केले. वाल्मिकी महर्षी म्हणतात --

**'रामोविग्रहवान् धर्मान्'**

वाल्मिकी रामायणामध्ये हे वाक्य त्या मारिचाने उच्चारले आहे. रावणाने त्याला बोलावून सांगितले, ''तू सुवर्णमृगाचे रूप घेऊन सीतेला मोहात टाक, राम तुझ्यामागे गेले म्हणजे मी सीतेला घेऊन जाईन.'' पण राक्षस असूनसुद्धा मारिचाने सांगितले, ''राम हे धर्मशील आहेत. त्यांच्यावाटेला तू जाऊ नकोस.'' पण रावणाने ते ऐकले नाही. रावणापेक्षा रामांच्या हातून मरण आले तर आपल्याला चांगली गती तरी मिळेल असे वाटून त्याने



रावणाचे म्हणणे कबूल केले.

तर अशा रितीने संपूर्ण धर्मस्वरूप म्हणजे भगवान रामचंद्र आहेत. त्यांनी सगळ्या जगाला धर्म मर्यादा कशा असाव्या, त्या कशा पाळाव्यात हे नुसते समजावूनच सांगितले नाही तर त्याप्रमाणे अचारण करून दाखवले आहे. त्यांच्या चरित्रात अनेक मोठे मोठे भक्त आलेले आहेत. मारूतीराय तर प्रसिद्धच आहेत. सबंध आयुष्य रामचंद्रांच्या सेवेकरता त्यांनी वाहिलेले आहे. प्रत्यक्ष शंकर परमात्माच या रूपाने जन्माला आलेले आहेत असे म्हणतात. त्यांना रामांची सेवा करायची इच्छा झाली. कोणचे रूप घ्यावे असे वाटल्यावर विचार करून ठरविले की वानराचे रूप आपले बरे आहे. कोणाकडे भिक्षा मागायला नको, कोणाची चाकरी करून वेतन घ्यायला नको कांही नको. झाडाची फळे खावीत, नदी, तळ्यातले पाणी प्यावे आणि रामांची सेवा करावी. निष्काम भक्ती आहे. कांही याचना नाही. तेव्हां भगवान शंकरांनी रामचंद्रांची सेवा करण्याकरता हे रूप घेतले. हनुमंतांचे चरित्र प्रसिद्ध आहे.

तुलसी रामायणातील सुंदरकांड म्हणजे मारुतीरायांचे चरित्र आहे. त्याचे वाचन, चिंतन मनन करणे, यथाशक्ती त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करणे आणि तो प्रयत्न यशस्वी होण्याकरता त्यांचीच प्रार्थना करणे तर तो यशस्वी होतो. त्याच प्रमाणे भरताचे चरित्र आहे, लक्ष्मणांचे चरित्र आहे. रामचंद्र मुद्दाम लक्ष्मणांना बरोबर घेऊन गेले. कारण त्यांच्याकडून मोठे काम होणार होते ना! रावणाचा नाश रामचंद्रांनी केला पण इंद्रजितचा नाश लक्ष्मणानी केला. इंद्रजितसुद्धा तपस्वी होता. देवीचा

उपासक होता. त्याच नाश फक्त बारा वर्षे ब्रम्हचर्य व्रत धारण करून सेवा करणारा जो असेल तोच करू शकत होता. म्हणून रामराय लक्ष्मणांना बरोबर घेऊन गेले. आणि रामांचे ते कार्य लक्ष्मणांनी केले. लक्ष्मणाने चौदा वर्षपर्यंत फक्त रामांची सेवा केली. दुसरं काही केलं नाही.

त्या मातेने, सुमित्रेने, वनात जाताना आनंदाने लक्ष्मणाला सांगितले, ''रामाची सेवा करण्यासाठी जा.'' आपला मुलगा वनामध्ये जायचा! कोणत्या आईला बरे वाटेल? रामांनी वनवासात जाऊन पित्याला वचनातून मुक्त करायचे होते. पण सुमित्रेने लक्ष्मणाला अनुज्ञा दिली. तिने सांगितले, ''राम व सीता हे तुझे आई-बाप आहेत. रामांना दशरथांच्या ठिकाणी मान आणि जानकीला मातेसमान बघ. वन हे अयोध्या आहे असे समजून राहा. आनंदाने सेवा कर.''

रामायणातल्या काही काही पात्रांची चरित्रं इतकी प्रसिद्ध नाहीयेत. सुमित्रा अत्यंत धर्मशील होती. लक्ष्मणाला इंद्रजिताने मारलेली शक्ती लागून तो मूर्च्छित पडला. त्याला जर सूर्योदयाच्या आंत सोमवटी वनस्पती मिळाली तरच तो जिवंत राहाणार होता, असे वैद्यांनी सांगितले होते. रामरायांनी ही हकीकत मारूतीरायांना सांगितली. ते ती वनस्पती आणण्यासाठी निघाले आणि त्यांना ती सोमवटी ओळखता आली नाही म्हणून त्यांनी द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला.

सुमित्रेला लक्ष्मण मूर्च्छित पडल्याचे समजले. आपला मुलगा मूर्च्छित पडला असून सोमवटी दुसऱ्या दिवशीच्या सूर्योदयापूर्वी मिळाली नाही तर तो जिवंत राहाणार नाही. पण सुमित्रेला रामांची



काळजी जास्ती. रामांना सहाय्य करण्याकरता गेलेला लक्ष्मण आता पडला. तिला प्रश्न पडला रामांना आता कोण सहाय्य करणार? एवढ्यात दुसऱ्या मुलाची शत्रुघ्नाची आठवण झाली. शत्रुघ्नाला तिने मारुतीरायांच्या बरोबर जाऊन रामाला सहाय्य करायला सांगितले. आईची आज्ञा म्हणून तोही निघाला. म्हणजे दोन्हीही मुले रामांच्यासाठी तिने वाहिली आहेत. 'वाहू हा संसार देवा पायी।' तुकाराम महाराज सांगताहेत. पण त्यांची वृत्ती नुसती सांगण्यापुरती नाही.

ताईमहाराजांना लोकांनी दिले पण त्या ते या यज्ञाला द्या, त्या कार्याला दया असे करून देऊन टाकतात. स्वत:करता काहीही ठेवत नाहीत.

एक मुलगा गेल्याचे दु:ख नाही. दुसऱ्या मुलाला रामांना सहाय्य करण्याची आज्ञा केली. तो निघाला. पण वसिष्ठांनी सांगितले, ''तुला जायची जरूरी नाही. मारूतीराय द्रोणागिरीच घेऊन येताहेत. त्यावरची ती वनस्पती वापरून औषध दिले की लक्ष्मण पुन्हा सावध होईल.'' मग शत्रुघ्न थांबला. शत्रुघ्नाच्या मातेची तयारी इतकी होती; मग तो शत्रुघ्न किती तयारीचा असेल! त्याचा तर फार कोंडमारा झाला आहे. लक्ष्मण निघून गेला, भरत राहिला. रामाने भरताला राज्य करण्याची आज्ञा केली. ते म्हणाले, ''मला वनवासात जायची आज्ञा आहे आणि तुला राज्य करण्याची आज्ञा आहे. तुला माझ्याबरोबर येता येणार नाही आणि मीही तुला बरोबर नेणार नाही.'' भरताने रामांच्या पादुका मागून घेतल्या. आणखी त्या पादुकांची सिंहासनावर स्थापना करून रामचंद्र आहेत ही भावना धारण करून जटा धारण

केल्या, अन्नपाणी वर्ज्य केले. बिछान्यावर न झोपता साध्या चटईवर झोपायचे. अशा तऱ्हेने त्याने राज्य केले. पण त्याग भावनेने केले. चौदा वर्षे झाली की रामांच्या हातात राज्य सोपवून द्यायचे. संसारातून आपण केव्हा बाहेर पडू ही उत्कंठा धारण करून एकेक दिवस मोजतोय. रामांना वनवासात जाताना त्याने सांगितले, ''चौदाव्या वर्षाच्या शेवटच्या रात्रीपर्यंत मी राज्य सांभाळीन पण १५ व्या वर्षाचा सूर्योदय भरत पहाणार नाही तो पहायला भरत जिवंत राहाणार नाही.'' म्हणून रामरायांनी मारूतीरायांना तत्परतेने भरताकडे पाठवले १४ वर्षे झाल्यावर आणि म्हणाले त्याला सांग, राम येताहेत. तर ही झाली भरताची स्थिती.

शत्रुघ्नाचे व्यक्तिमत्व एक वेगळेच होते. प्रत्यक्ष भगवंताची सेवा ही तर आहेच आहे पुण्यकारक परंतु भगवत् भक्तांची सेवा करणे हे जास्ती महत्वाचे आहे. देव न्यायी व थोडेसे कठोर आहेत. ते म्हणतात, ''तुम्ही कर्म केले आहे त्याचे सुख दु:ख रूपी फल तुम्ही भोगले पाहिजे. आम्ही त्यात कांहीही बदल करणार नाही. पण एखाद्या वेळेला भगवत् भक्तांनी मध्यस्थी केली, वशिला लावला तर! मग देवाला नाही म्हणता येत नाही. ही वृत्ती शत्रुघ्नाची होती. मातेची सेवा करायची भरताची सेवा करायची; (भरत सावत्र का असेनात), तिन्ही मातांनी त्याला सांगितले, ''जटाबिटा वाढवून राहू नकोस. तुला भरताप्रमाणे करता येणार नाही. राजवेश धारण करूनच तुला राहिले पाहिजे.'' म्हणजे मनामध्ये त्याग जरी असला तरी तो त्याग प्रगट करायचा नाही. ही त्याला आज्ञा होती. हे किती कठीण आहे! रामचंद्र



म्हणाले, ''माझ्यापेक्षा तुझा त्याग मोठा आहे. मला वनवासात जायची आज्ञा होती पण तुला तुझ्या आईने राज्य मिळवून दिले होते, वसिष्ठादिकांनी तुला राज्य करण्याची आज्ञा केली होती. पण तू विरक्ती धारण केलीस.'' रामापेक्षा भरताचा त्याग फार मोठा आहे. वाल्मिकी महर्षींनी सर्व लोकांची बुद्धी शुद्ध होण्याकरता रामायण लिहिलेले आहे, ब्रम्हदेवांच्या आज्ञेवरून. कशी वृत्ती पाहिजे, मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर कसे वागले पाहिजे हे शिकवण्याकरता रामायण आहे.

तर शत्रुघ्न राजवेष धारण करून राहिला. नामधारी म्हणून राजसभेत बसायचा. भरतासारखा त्याग दाखविता येत नाही. खरंतर दाखवण्याकरता त्याग नाहीच आहे. पण राम वनवासातून परत येईपर्यंत राजवेष धारण करून त्याप्रमाणे राहाताना त्याच्या मनाला किती क्लेश झाले असतील! पण ते सर्व सहन करून त्याने सर्व एकंदर कारभार सांभाळला. आणखी भगवत् भक्तांची सेवा केली. त्या सेवेमुळे रामरायांची त्याच्यावर कृपा झाली.

लक्ष्मणाची पत्नी उर्मिला ही सुद्धा तशीच मोठी होती. तिला कांही वनामध्ये जाता आले नाही. आणि तसे शक्यही नव्हते. उर्मिलेने लक्ष्मणाला सांगितले, ''मी जर तुमच्या बरोबर वनांत आले तर माझ्याकडेच तुमचे जास्त लक्ष लागणार. तुम्ही रामांची सेवा करण्याकरता चाललेले आहात. तुमच्या बरोबर मला येता येणार नाही.'' लक्ष्मणाची तशी इच्छा नव्हती. पण तिने उलट त्याला सांगितले, ''नाही, मी इथेच राहाणारं.'' म्हणून तिनेही आपल्या सासूसासऱ्यांची उत्तम प्रकाराने सेवा केलेली आहे. रामाची सेवा लक्ष्मणाने भगवंताची सेवा आपण करतोय या

भावनेने केली. अशा रीतीने मनामध्ये कोणतीही आसक्ती न ठेवता सेवा करणाऱ्या भक्तांनी चरित्र आली आहेत. ईश्वराच्या सेवेचे हे मुख्य फल आहे.

सद्गुरू वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी तर असे सांगितले आहे की संसाराची इच्छा असल्यास तो परमेश्वराजवळ मागा. आपल्या प्रयत्नांनी तुम्ही संसारात सुखी होण्याचा प्रयत्न करू नका. 'मुक्ती' ही त्या मागणीत मुद्दाम घातली आहे. त्याचा विशेष फायदा म्हणजे देवाचे आपल्याकडे लक्ष राहाते. देव म्हणतो, ''आपण याने मागितले म्हणून का होईना संसारसुख दिले आहे. तेव्हा आपणच याला यातून काढले पाहिजे.'' म्हणजे अशा रीतीने देवाचे तुमच्याकडे लक्ष राहील.

त्याग कसा असावा, त्यागाने काय मिळते हे सर्वही त्यांनी सांगितले. आणि एक मोठे दिव्य चरित्र रामायणात आलेले आहे.

रामचंद्र आलेले आहेत. त्यांना गंगेपलीकडे जायचे आहे. निषादगुह, लक्ष्मण आणि सीता त्यांच्याबरोबर आहेत. तिथल्या एका नावेजवळ ते आले. त्यांना पाहिल्यावरसुद्धा तो नावाडी आपल्या त्याच्या जागेवर स्तब्ध बसून राहिला. जागचा हललासुद्धा नाही. रामजवळ आले. त्याला म्हणाले, ''बाबा, आम्हांला तेवढे पलिकडे पोहोचवशील का?'' ब्रम्हांड निर्माण करण्याची ज्यांची शक्ती आहे त्यांनी त्या सामान्य नावाड्याजवळ याचना केली, तरी तो काही बोलला नाही. लक्ष्मणाला राग आला. त्याने दरडावून विचारले, ''पोहोचवतोस की नाही?'' आणि धनुष्याला बाण लावला. ''हा बाण. तुला मारू?'' तरी काही नावाडी बोलेना सीतेलाही आश्चर्य वाटले त्या नावाड्याची



ही वागणूक पाहून. तिनेही त्याला विनवले.

तेव्हां तो म्हणाला, ''देवा, तुमची मी कीर्ति ऐकली आहे.'' (अहिल्या शिळा राघवे मुक्त केली' हे समर्थांनी वर्णन केलेले आहे.) तुमच्या पायाचा धुरळा पडल्यावर ती पुन्हा पूर्वीप्रमाणे सामर्थ्यशाली ऋषि पत्नी झाली, उद्धरून गेली. तेव्हा तुम्ही जर माझ्या नावेत आल्यावर तुमच्या पदस्पर्शाने माझ्या नावेची स्त्री झाली तर!'' त्याची एक वेगळी दृष्टी आहे. खरी भक्ती त्याच्या अंत:करणात आहे. पण बाहेरून ही भूमिका आहे. तो पुढे म्हणाला, ''या नावेवर माझे पोट भरतो मी. या नावेची स्त्री झाली तर मी उदरनिर्वाह कसा करू? माझ्या घरात आणखी एक स्त्री येऊन राहाणार. तिचे पालन पोषण मलाच करावे लागणार. तेव्हा माझे जर म्हणणे तुम्हाला कबूल असेल तर मी तुम्हाला पलीकडे पोहोचवतो.'' रामचंद्र म्हणाले, ''तू काय सांगशील ते करायला मी तयार आहे.'' त्यावर त्याने सांगितले, ''नावेत बसण्यापूर्वी मी स्वत: तुमचे पाय स्वच्छ धुणार आहे. आणि मग नावेतून तुम्हाला घेऊन जाणार.'' रामचंद्रांनी हे कबूल केले. लक्ष्मण, सीता, निषाद गुह हे सगळे पहाताहेत.

त्या नावाड्याने त्याच्या घरातल्या मंडळींना बोलावून एक लाकडी चौरंग आणला. त्याला एकीकडे रामचंद्रांची परिक्षाही पहायची आहे ना! त्याच्या बायकोने आणलेल्या पाण्याने त्याने रामांचे स्वच्छ पाय धुतले. सगळ्यांना ते तीर्थ दिले. आणि आपणही तीर्थ घेतले. रामचंद्र म्हणाले, ''बस झाले. चल आता लवकर. आम्हांला आता उशीर झाला आहे.'' तो म्हणाला, ''थांबा जरा. नंबराप्रमाणे तुम्हाला पाहोचवणार आहे.'' राम

म्हणाले, ''इथे तर दुसरे कोणीच दिसत नाही.'' तो म्हणाला, ''हे माझे पितर आहेत ना. त्यांचा नंबर लागलेला आहे. ते आगोदर तीराला जाणार आहेत. तुम्ही आणि मी एकच काम करणारे आहोत. मी प्रवाशांना परतीरावर पोहोचवतो आणि आपण भक्ताला भवसागरातून परतीरावर पोहोचवता. मी मात्र तुम्हाला पैलतीरावर पोहोचवणार आहे पण त्याचा काहीही मोबदला घेणार नाही. हे तुम्ही कबूल केले पाहिजे.'' रामचंद्र म्हणाले, ''ठीक आहे. चला.''

त्याने रामचंद्राचे स्वच्छ पाय धुतले. तीर्थ सगळ्यांना दिले. आपण प्राशन केले. आणि नंतर त्या सगळ्यांना घेऊन पलीकडे गेला. सगळ्या पितरांना मुक्त केले. भगवत् प्रेमामुळे सगळ्या पितरांचा उद्धार झाला. पलीकडे सगळी मंडळी उतरली. नावाड्याला काहीतरी द्यायला पाहिजे. देण्यासाठी जवळ तसे काहीच नव्हते. सीतादेवींच्या लक्षात आले. त्यांच्या बोटातली रत्नाची अंगठी काढून त्याला देताना त्या म्हणाल्या, ''हे घे. तुझे आमच्यावर उपकार नकोत.'' तो म्हणाला, ''तुम्हाला अगोदर सांगितले होते मी. कांहीही मी घेणार नाही.'' देवाची सेवा करणाऱ्याने हे लक्षात ठेवले पाहिजे. सेवा करायची पण त्या बद्दल कांहीही देवाजवळ मागायचे नाही. देव देत असले तरी घ्यायचे नाही.

तो पुढे म्हणाला, ''मी कांही येणार नाही हे तुम्ही कबूल केले होते. आज तुमची ही जी सेवा घडली त्यामुळे माझ्या पितरांचाही उद्धार झाला, पुन्हा तुम्ही याच रस्त्याने या, देवा आणि पुन्हा मला तुम्हाला पलीकडे नेण्याचे भाग्य लाभो.'' बाकी कांहीही मागून



घेतले नाही कारण मनामध्ये काही इच्छाच नव्हती. त्याने देवाची परिक्षा पाहिली, असे वाटण्याचा संभव आहे. पण ही परिक्षा नाही.

हा भक्त कसा आहे पहा! पायाचा धुरळा थोडासुद्धा शिल्लक राहिला नाही, तर नावेत बसिवणार. म्हणजे त्याला देवाचे पाय धुवायचे होते. ते आपल निमित्त त्याने काढले. ओळखणाऱ्याने ओळखले. वाल्मिकी रामायणामध्ये हे सर्व त्यांनी लिहिले आहे. एकेक लोकात्तर भक्त होऊन गेलेले आहेत. फक्त सेवा करायची, बाकी कांही इच्छा नाही. तर अशा रीतीने भगवान् रामचंद्रांचे दिव्य चरित्र सर्वांनी श्रवण करावे म्हणून संत महात्म्यांनी त्यांची चरित्रे लिहून ठेवली आहेत. ती वाचणं, ऐकणं त्यांचं चिंतन करणं, मनन करणं आणि मनावर त्याचे चांगले संस्कार व्हावेत म्हणून रामरायांचीच प्रार्थना करणं हे आपलं कर्तव्य आहे.

आजचा चांगला दिवस आहे रामनवमीचा! ताईमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे आपण सर्वही मंडळींनी हे स्थान निर्माण केले. भगवान् दत्तात्रेयांची आणि सद्‌गुरूंची उपासना या ठिकाणी चालू आहे.

रामरायांच्या काळात मोठे भक्त होऊन गेले आहेत. कैकयी फार मोठी भक्त होती. कैकयीने सगळ्या जगाची अपकीर्ति आपल्या डोक्यावर घेतली. आणि रामाला राज्याच्या बाहेर काढले. राम जर राज्यभिषेक होऊन राज्य करीत राहिले असते तर रावणाचा नाश कसा झाला असता? कोणी मारले असते त्याला? प्रजेचे रक्षण कसे झाले असते? रामचंद्रांनी एकट्याने १४,००० राक्षस एका प्रहरात मारून टाकले.

तर सरस्वतीदेवीने कैकयीच्या वाणीत देवांच्या प्रार्थनेप्रमाणे प्रवेश केला, तशी तिला बुद्धि निर्माण केली. मंथरा दासी भेटली आणि कांही तरी कार्य झाले. देवांचे कार्य! रावण जरी शंकरांचा भक्त असला तरी तो पापपुण्याचा विचार न करता उद्दाम झाला होता. त्याचा नाश करण्यासाठी रामांना राज्याबाहेर काढणे आवश्यक होते. ते देवांनी त्या सरस्वतीदेवीला प्रार्थना करून कार्य साधले. कैकयीलासुद्धा शेवटी पश्चाताप झाला. कैकयीसारखी दुष्ट कोणी नाही अशी तिची अपकीर्ति झाली. भरताने तर तिच्याबरोबर भाषण बंद केले. रामांनी वनवासातून आल्याबरोबर त्याला बोलावून आणले. त्याला सांगितले, ''आईच्या पाया पड. क्षमा माग. आईला असे दु:ख देणे योग्य नाही.'' चित्रकूट पर्वतावर सर्व मंडळींची भेट झाली. कैकयीसुद्धा गेली. तिला वाटले. आपण देवापुढे कसे जायजे? रामरायचं पुढे आले. कैकेयीला नमस्कार करून म्हणाले, ''माझ्यावर किती प्रेम आहे तुझे! मला वनवासात पाठवून तुझे माझ्यावर जास्ती प्रेम आहे हेच दाखवलेस. कारण तिथे मला काही काळजी होती का? भूक लागली की फळे खायची, पाणी प्यायचे, संपले. राज्यामध्ये काय चाललंय, कुठे संघर्ष चाललाय, सगळं नीट आहे की नाही वगैरे काही नाही वनवासात. तेव्हा वनवासात जायचे सोपे काम माझ्याकडे आणि पोटचा मुलगा भरताला मात्र सबंध राज्य सांभाळायची जबाबदारी दिली. त्याला राज्य सांभाळायचे म्हणजे काही शांत झोप लागली असेल का? हे अवघड काम भरताला दिले म्हणजे मुलावर तुमचे जास्ती प्रेम आहे की माझ्यावर? तेव्हां तुम्ही काही मनाला लावून घेऊ नका.'' अशी उलट तिची समजूत



काढली. 'कैकयी दुष्ट' ही बदनामी डोक्यावर घेऊन तिने आयुष्य कंठले, असेही एकेक भक्त झालेले आहेत. संत महात्म्यांचीही चरित्र लिहून ठेवलेली आहेत. म्हणून आपल्याला त्यांचे ज्ञान, त्यांचे चिंतन करता येते, विचार करता येतो; ईश्वराची कृपा असेल तर त्याप्रमाणे अनुकरणही घडते.

या स्थानात ताईमहाराजांनी देवतांचे आवाहन केलेले आहे. देवतांचा वास या ठिकाणी आहे. देवतांच्या प्रेरणेनेच सर्व मंडळी येतात-जातात. सात दिवसांचा नामसप्ताह आम्ही कुठे कुठे करताना पाहिला आहे. पण इथे महिना महिना संकीर्तन चालायचे. दिगंबरा....चे अखंड नाम मात्र चालू आहे. त्या आपल्या बसलेल्या असतात. देवाचे कार्य जास्ती जास्ती चाललेले पाहून आनंद मानायचा. हे फार मोठे कार्य आहे. त्या काही एकट्या नाहीत. संसार आहे, मुले आहेत, सुना आहेत, नातवंडे आहेत. हे सर्व असूनसुद्धा सर्वोपिसुखिन: संतु...... या प्रमाणे सर्व सुखी व्हावेत. सुखी होण्याचे मुख्य साधन म्हणजे ईश्वराची भक्ती आहे, भगवत् भजन आहे हे सर्वांना पटावे ही त्यांची प्रार्थना चालू आहे. त्याकरता हे स्थान निर्माण झाले. हे केंद्र आहे. अशी केंद्र संतांच्या संकल्पाप्रमाणे निर्माण झालेली असतात. त्या ठिकाणी जाऊन आपली संकटे दूर करण्याकरता प्रार्थना करावी किंवा आपल्या जीवनाचे कल्याण व्हावे अशी प्रार्थना करावी पुढच्या जन्मांत आपण कुठे जाणार आहोत कांही माहीत नाही. लांबचा प्रवास आहे. हे जीवन फार लहान आहे. त्या लांबच्या प्रवासामध्ये कांहीही सोय करून ठेवता येत नाही. पुण्याहून आम्ही जालन्याला येणार असल्याचे फोनवर कळवतो.

अगरवालसाहेब लगेच सांगतात, 'आम्ही गाडी पाठवतो'. पण त्या लांबच्या प्रवासात कांहीही सोय नाही, पैसा असून कांहीही विकत घेता येत नाही, पण त्या दूर मार्गाने जावेच लागते आपल्याला. त्याकरता कांही तरी ईश्वराची कृपा आपल्याजवळ असावी. म्हणजे त्या कृपेने त्याही मार्गामध्ये आपल्याला सुखी राहाता येते. दु:ख त्या ठिकाणी होत नाही. धर्मराज हे स्वर्गलोकापर्यंत देहाने गेलेले आहेत. इतकं पुण्य त्यांनी केलं. बाकीचे सगळे भाऊ, द्रौपदी खाली पडले पण धर्म आपल्या पुण्याने स्वर्गाला गेले. अशा रीतीने सर्वांच्या अंत:करणात पुण्यवासना निर्माण व्हावी, वृद्धिंगत व्हावी. सर्वांकडून पुण्यकर्म झाल्यानंतर सर्व सुखी होतील. ज्याला पुण्यवासना नाही त्याच्या ठायी पुण्यवासना निर्माण होईल. आणि त्याच्याकडूनही पुण्यकर्म होईल. त्यादृष्टीने आपण सर्व मंडळींनी दत्ताश्रम निर्माण केला. याबद्दल आपल्यावर ईश्वराची कृपा आहे. अहंकार उत्पन्न न होणं हे पुण्याकर्माचे मोठे फळ आहे. 'कर्म मी केलय', अशी जर भावना उत्पन्न झाली तर त्याचे फळ पदरात पडत नाही. या प्रमाणे चांगले स्थान निर्माण झाले, चांगले मार्गदर्शन यांच्याकडून आपल्याला मिळतय. त्याचा फायदा सर्वांनी करून घ्यावा, संसार करता करता परमार्थ साधावा, सर्वांना तशी सद्बुद्धि उत्पन्न व्हावी एवढीच प्रार्थना करून आज भगवान् रामचंद्रांच्या चरणी, त्यांनी दत्तात्रेय प्रभुंनी, सर्वांना प्रेरणा करावी एवढीच प्रार्थना.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त ॥**

□□



# सर्वेऽपि सुखिनः सन्तु

**(प. पू. दत्तमहाराजांनी पुणे येथे श्रीवासुदेव निवासातील २२-५-९४ रोजी रौद्रीशांतीच्या सत्काराला उत्तर देताना केलेले प्रवचन)**

**मूकं करोति वाचालं.......**

वयोवृद्द, तपोवृद्द अशा सर्वही मंडळींच्या आशीर्वादाने त्याचप्रमाणे सर्वही विश्वस्त मंडळी, आत्मीयता व्यक्त करणारी आपण सर्वही मंडळी या सर्वांच्या सदिच्छेने ८० वर्षांपासून ८५ वर्षांपर्यंत आयुर्वृद्धी झाली असा अनुभव सांगायला हरकत नाही. जास्ती आयुर्वृद्धी व्हावी किंवा नाही, त्याची इच्छा करावी किंवा नाही हाही एक प्रश्न आहे. आयुष्याचे सार्थक अशा प्रकारच्या थोर मंडळींच्या आशीर्वादाने होत असते.

ह्या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी ईशावास्योपनिषदातला महत्त्वाचा विषय मांडलेला आहे. पूर्ण ब्रह्मापासून पूर्ण जगत् निर्माण झालेलं आहे. ते सर्वही जगत् ईश्वररूप आहे. ईशावास्योपनिषदाला असुसरून त्यांनी तो विषय सार रूपाने मांडलेला आहे. द्वैतवादी, अद्वैतवादी अशा प्रकारची विरोधी भूमिका त्यांनी त्या वेळेला घेतलेली नाही. आणि तशी विरोधी भूमिका नाहीच आहे.

भारतीय परंपरेमध्ये ईश्वराचे, सद्गुरुंचे अधिष्ठान सर्वमान्य

आहे. वेद हे त्याला प्रमाण आहेत. ज्ञान आणि विज्ञान या शब्दांचा अर्थ टीकाकारांनी भागवतामध्ये दिलेला आहे.

**'ज्ञानौ वेद तात्पर्य निर्णय:'**

संपूर्ण वेदांचे तात्पर्य समजून घेणे, परोक्ष ज्ञान ज्याला म्हणतात, हे मोठे कठिण आहे. मीमांसादिक शास्त्रांचा अभ्यास हा वेदांचा पूर्वभाग जो आहे, कर्म मार्ग आहे, उपासना मार्ग आहे, त्याचा अभिप्राय, त्याच भाव समजून घेण्याकरता आहे. आणि

**'विज्ञान तदर्थ अनुभव:'**

म्हणतात, वेदाचा जो मुख्य अर्थ आहे

**'वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो'**

भगवान् सांगताहेत. वेदांचे वेद्य परमात्मा आहे. त्याला समजून घेणे, त्याचा अनुभव घेणे याला विज्ञान असे म्हणतात, शास्त्रज्ञ पुरुष, आधुनिक काळात आपण याला ''भौतिक विज्ञान'' असे नांव ठेवतो परंतु खरा ''विज्ञान'' शब्दाचा अर्थ विशेष ज्ञान, अनुभव, हा शास्त्रकारांच्या मताने आहे. हे मुख्य प्राप्त करून घेण्याकरता मानव जन्म आहे. मानव जन्म परमेश्वराच्या कृपेने मिळालेला आहे. वासनेने जन्म येतो असा सिद्धांत जरी असला तरी त्या वासनांचे ज्ञान असणारा जो सर्वज्ञ परमात्मा आहे तो प्रत्येक जीवाची वासना जशी जशी असेल, त्याप्रमाणे योग्य जन्माला घालणे, हे त्याचे काम आहे.

परमात्मा सर्वज्ञ आहे, त्याच्या प्रेरणेनेच सर्व विश्वाचे कार्य



चालू आहे असा संतांचा, ज्ञानी महात्म्यांचा विश्वास असल्यामुळे त्यांच्या दृष्टीने प्रपंच आणि परमार्थ यांच्यात विरोध नाहीये.

**' सुहृदं सर्व भूतानां ।'**

भक्तीमार्गाचा फार मोठा सिद्धांत भगवान् या वाक्यामध्ये सांगताहेत. सर्व संत महात्मे भगवंताकडे का वळलेले आहेत? कारण सर्वांचा तो सुहृद आहे. 'सुहृद' शब्दाचा अर्थ भगवान् शंकराचार्य महाराजांनी केलेला आहे.

**'प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम्'**

तो दयाळु आहे. त्याची पूजा केली पाहिजे, त्याचे मंदिर बांधले पाहिजे, त्याच्याकरता राजकारण केले पाहिजे. नको, कांही नको. मंदिर बांधून त्याचे काय होणार? त्याची किती तरी मंदिरे आहेत. सबंध त्रैलोक्य निर्माण करणाऱ्याला आपले मंदिर बांधले जाते अशी इच्छा कशाला असेल! परंतु धर्माचे संरक्षण करण्यामध्ये सर्वांचे हित आहे. ही जाणीव करून देणाऱ्या मंडळींना तुम्ही आग्रही म्हणा, जातीय म्हणा, कांहीही म्हटलं तरी त्यांना तसे लागू होत नाही. मंदिर बांधण्याचा हा आग्रह योग्य आहे.

परमेश्वराचे मंदिर हे एक प्रकारचे केंद्र आहे. भावाधिष्ठान आहे. त्रेतायुगापासून ते आजपर्यंत हा संप्रदाय इतका दीर्घकाल चालू राहिलेला आहे. याचाही कांही विचार व्हावा. असा त्यांचा कांही आग्रह असेल तर त्या प्रमाणे परमात्मा हा असा आहे की त्याला प्रत्युपकाराची अपेक्षा नाहीये. निरपेक्ष आहे. नित्यतृप्त

आहे आणि सर्वज्ञ आहे. हे ज्ञान त्यासंत महात्म्यांच्या बुद्धिमध्ये निश्चित असते.

**'मानापमानयो तुल्य:'**

हे कांही नुसते सुभाषित नाहीये. अनुभव आहे. स्थितप्रज्ञ महात्म्याचे ते एक लक्षण आहे. निरनिराळ्या प्रकारांनी भगवंतांनी स्थितप्रज्ञाची स्वरूपं सांगितली आहेत.

त्याप्रमाणे मानापमान दोन्ही तुल्य दृष्टीने पहाणाऱ्यांची, सर्वही ईश्वररूपं आहेत, ही त्यांची भावना झालेली आहे. आणि विश्वरूपाने सर्व विश्वात्मा परमात्मा आहे. 'आता विश्वात्मके देवे।' असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**नमो आदि रूपा। ॐकार स्वरूपा।**
**विश्वचिया रूपा। पांडुरंगा।**

ही त्यांच्या बुद्धीची धारणा आहे. आणि त्यामुळे त्यांना कोणचीही चिंता राहात नाही. सत्कर्माची चिंता बाळगणे हा दोष आहे असं नाहीये. परंतु विरोध निर्माण होतो. विरोधी पुरुषही तसेच आहेत.

देवदैत्यांचे युद्ध नेहमी चालू आहे असे उपनिषदांमध्ये वर्णन आहे. ते देव दैत्य म्हणजे सत्वगुण, तमोगुण आणि रजोगुण. ते आपल्या मनामध्ये आहेत आणि त्यांचा परस्पर संघर्ष अखंड चालू आहे. एखाद्या वेळेला सत्वगुणाचा उत्कर्ष होतो एखाद्या वेळेला रजोगुणाचा, तमोगुणाचा उत्कर्ष होतो. चाललेले आहे. परंतु अशा वेळेला सुद्धा मनाची प्रवृत्ती संयत असेल, संयमाने



प्रयत्न केलेला असेल तर त्याला ईश्वराचे सहाय्य असते. त्याकरता योगशास्त्रकारांनी ईश्वरांचे अस्तित्व मान्य केलेले आहे.

योगशास्त्रकार प्रयत्नवादी आहेत. ते ईश्वरवादी झालेले आहेत. ईश्वराचे माहात्म्य त्यांनी मुद्दाम मांडलेले आहे.

मी कोण आहे हे समजून घ्यायला पाहिजे. भगवान् रमणमहर्षि हेच सांगायचे - मी कोण आहे याचा अभ्यास करा. तो 'अहम्' सांपडत नाही. वेदांतशास्त्रामध्ये त्या 'अहम्'चे शुद्ध स्वरूप सांगितलेले आहे. देह, मन, बुद्धि या सर्वांच्या पलिकडे तो सर्वसाक्षी जो 'मी' आहे त्या 'मी' पर्यंत जाता येणं, ही विज्ञानाची मोठी भूमिका त्याला प्राप्त करून देणं हे ईश्वराच्या सहाय्याने शक्य आहे. हे ईश्वराचे सहाय्य आहे. आणि त्या भूमिकेपर्यंत जाताना इच्छा पुष्कळ आहेत आपल्याला तेसुद्धा अनेक प्रतिबंध आहेत. शारीरिक व्याधी आहेत. मानसिक दु:ख आहेत. अनुकूल-प्रतिकूल प्रसंग निर्माण झाल्यामुळे मानसिकही सुख-दु:खाचे प्रसंग निर्माण होतात. अशाही प्रसंगांच्या वेळेला सगळेही अंतराय, सगळीही विघ्नं दूर करणारी ईश्वरशक्ती आहे. म्हणजे सहाय्याकरता तरी ईश्वर मानायला पाहिजे.

ईश्वर नाही असे छापून प्रसिद्ध करण्याचा उपयोग काय आहे? ज्यांच्या मनामध्ये ईश्वराच्या, सद्गुरूंच्या कृपेने ईश्वर-आस्तिक्य भावना दृढ झालेली आहे त्यांच्या मनावर या अशा सांगण्याचा, बोलण्याचा, छापण्याचा कांहाही परिणाम होत नाही. ही आस्तिक्य भावना दृढ रहावी म्हणून सर्व संतांचे प्रयत्न आहेत. ते म्हणतात तुम्ही इतर सुखांचा

उपभोग घ्या पण ईश्वराला विसरू नका.

**किंबहुना सर्व सुखी ।**
**पूर्ण होवोनी तिन्हीं लोकी ।**
**भजिजो आदिपुरूषी । अखंडित ।**

त्याला विसरू नका. एवढेच ते सांगत असतात.

आणि त्याचा विसर पडू नये म्हणून मंदिरांची आवश्यकता आहे. सर्व मंदिरे म्हणजे धर्माचे अधिष्ठान आहे.

धर्माने एक दृष्टी निर्माण होते. प्रत्यक्ष प्रमाण हे श्रेष्ठ प्रमाण असे सर्व शास्त्रकार मानतात. चार्वाकांनीसुद्धा प्रत्यक्ष प्रमाण मानलेले आहे. पण प्रत्यक्ष प्रमाण नाकारणारा इतका नास्तिक कोणीही झालेला नाही. डोळ्याने दिसणे, नाकाने वास येणे वगैरे इंद्रियांनी आपल्याला ज्ञान होते हे एक प्रत्यक्ष प्रमाण आहे. त्या पदार्थाचे ज्ञान करून देणे हा एक इंद्रियांचा संबंध आहे.

आणि दुसरा संबंध त्यांनी (म्हणजे शास्त्रकारांनी) मानलेला आहे तो 'योग सन्निकर्ष', जो तर्कशास्त्रज्ञ मानतात. योगाभ्यास याचा अर्थ योगानुष्ठान, धर्माचरण! आज आपले वेदाचार्य घैसास गुरूजी संध्येची वेळ झाल्यावर जाऊन संध्या करून आले. वेळेवर संध्या झाली. संबंध आयुष्य त्यांनी आपल्या गुरुजींचे अनुकरण करून कर्मानुष्ठानात घालवले. या धर्मानुष्ठानाचे फल न्याय-शास्त्रकार 'योग संन्निकर्ष' म्हणून सांगतात. म्हणजे डोळ्यांनी जरी दिसले नाही तरी त्याची प्रज्ञाशक्ती इतकी विलक्षण आहे की त्याला जे समजत ते या इंद्रियांच्या शक्तीच्या समजण्याच्या पलीकडे आहे.



मोठे मोठे महर्षि कांही विचारल्याबरोबर लगेच सांगून टाकतात. कांही डोळ्यांनी दिसत नाही, कांही नाही. अमूक झालेले आहे अमूक होणार आहे. कांही कांही मंडळींना थोडा विचार करावा लागतो. असेना. पण हा एक सन्निकर्ष त्यांनी निराळा मानलेला आहे. म्हणजे धर्मानुष्ठान शास्त्राची आज्ञा, ईश्वराची आज्ञा म्हणून व्यवस्थित चालू राहिले तर हाही सन्निकर्ष मिळतो.

पण त्याच्याहीपेक्षा महत्वाचा हा सन्निकर्ष आहे. इतरांचे भविष्य सांगू शकणाऱ्याला स्वत:चे कांही कळणार नाही का? आपण केव्हा जाणार आहोत, कसे जाणार आहोत, स्वत:च्या मृत्युबद्दल सगळे समजते.

तर अशा रीतीने धर्माचे फळ हा एक स्वतंत्र सन्निकर्ष निर्माण होतो आणि त्याला अतिंद्रिय पदार्थाचे ज्ञान होऊ शकते, असे तार्किक मानतात.

योगशास्त्रकार ''ईश्वराचे सहाय्य घ्या'' असे सांगतात, ''ईश्वराला माना.'' आणि त्यापेक्षाही पुढची भूमिका म्हणजे तो प्रत्युपकाराची अपेक्षा करणारा नाही, म्हणून त्याची पूजा केली किंवा नाही केली, हे महत्त्वाचे नाही. त्याच्याशी संबंध आला तरी पुष्कळ आहे. द्वेष करणारा शिशुपालही मुक्त झाला.

तर अशा प्रकारचे ईश्वराचे अस्तित्व आपण मान्य करावे हेच आजपर्यंत संत महात्मे सांगत आले आहेत. आणि ती आस्तिक्य बुद्धि, ते संस्कार आपल्या चित्तावर दृढ होण्यासाठी असे पंचायतन याग वगैरे शास्त्रोक्त कर्मे सांगितलेली आहेत. वर्धापन विधी वगैरेसुद्धा शास्त्रकारांनी आपल्या अभ्युदयाच्या दृष्टीने सांगितलेला आहे. दीर्घायुष्य मिळावे, आरोग्य मिळावे, कल्याण

व्हावे, ऐश्वर्य मिळावे, यश मिळावे या दृष्टीने सांगितलेले आहेत. करण्याची इच्छा पाहिजे. यात अमुक एक इतकच केलं पाहिजे, अमुक एक इतकं दिलं पाहिजे असा कांही आग्रह नाही. श्रद्धा मुख्य आहे. शास्त्रावर, संतमहात्म्यांच्या वचनावर ईश्वरावर श्रद्धा ठेवून केले म्हणजे हे सर्व आपल्याला मिळते.

आरोग्य मिळाले, दीर्घायुष्य मिळाले, पण ही जर आस्तिक्य बुद्धि नसेल तर त्याचा काय उपयोग आहे? अश्वत्थ वृक्षही पांचपांचशे वर्षांचा असतो. काय उपयोग आहे? जर त्याला प्रदक्षिणा घातल्या तर त्याचे फळ आहे. एक विभूती म्हणून तो मानलेला आहे भगवंताची. पण दुसऱ्या दृष्टीने त्याचे आयुष्य पुष्कळ आहे.

तर या प्रमाणे भगवंताच्या कृपेने सर्वांच्या अंतःकरणात जी भगवत् भावना जागृत रहावी या करता सर्व सांप्रदाय, प्रयत्न करतात. लोकनाथतीर्थ महाराजसुद्धा मोठे देवीभक्त होते. भजन करायचे. आज त्यांची जयंति आहे. त्यांच्या द्वाराने महाराष्ट्र प्रांतात शक्तीपात सांप्रदाय प्राप्त झालेला आहे. मोठा सांप्रदाय आहे. त्याचे विवेचन करणारे सूत संहितेसारखे ग्रंथही पुष्कळ आहेत. आत्मज्ञानापर्यंत पोहोचवणारा, निर्विचार मनाची स्थिती प्राप्त करून देणारा हा सांप्रदाय आहे. विचार मनामध्ये येणे बंद व्हायला हवे.

मन स्वस्थ बसणे असा शांती शब्दाचा अर्थ शास्त्रकार करतात. त्याला शांती म्हणतात. ते स्वस्थ बसत नाही. कधीच बसत नाही. सकाळी जागे झाल्यापासून रात्री झोपेपर्यंत अनेक विचार तरंगत येताहेत त्यामध्ये. परंतु सद्विचार जास्ती जास्ती



वाढवून दुर्विचार कमी कमी करणे, असुरी संपत्ती कमी करून दैवी संपत्ती प्राप्त करून घेणे हे घडायला हवे. शेवटी दैवी संपत्ती तरी काय करायची आहे? स्वस्थ मन राहाणे महत्त्वाचे आहे. निर्विचार मन झालेले आहे. आत्मानंदामध्ये निमग्न झालेले आहे. ही शेवटची भूमिका आहे, स्थितप्रज्ञाची भूमिका आहे. भगवत भक्ताची भूमिका आहे, गुणातीताची हीच भूमिका भगवंतांनी सांगितली आहे. आणि त्याकरता मार्गदर्शक म्हणून ईश्वराने जग निर्माण केले, मानव जन्म दिला. आणि मार्गदर्शन करण्याकरता सर्व संत महात्म्यांना आदेश दिलेला आहे. कर्णधार म्हणून सद्गुरू हे जगामध्ये कार्य करताहेत. आणि त्यांच्या द्वाराने सद्वासना निर्माण होतात. वृद्धिंगत होतात आणि क्रमाक्रमाने त्याचे फल मिळते.

तेव्हा हा सत्कार म्हणजे सर्वांचे आशीर्वाद, सर्वांच्या सदिच्छा. या सदिच्छेचा आज लाभ झाला.

अशी सर्वांची बुद्धि, मनोवृत्ती ईश्वर स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर रहावी, नास्तिक्य बुद्धि भारतीय म्हणता येणार नाही. ईश्वर आस्तिक्य बुद्धि, ज्याच्याजवळ आहे तोच खरा भारतीय. मग तो कोणीही असो.

सद्वासना निर्माण करणारी ईश्वर शक्ती भारतामध्ये जागृत आहे, हा एक विश्वास आमच्या मनामध्ये उत्पन्न झाला. आणि त्यामुळे पुष्कळ समाधान झाले तेव्हां याप्रमाणे

**सर्वेपि सुखीनः संतु सर्वे संतु......**

हेच कल्याण सर्वांचे व्हावे. सुख मिळावे आरोग्य मिळावे. दुःख

सगळी दूर व्हावीत. मंगल प्रसंग सर्वांना पहायला मिळावेत. हाही मंगल प्रसंगच आहे. लोकनाथतीर्थांची जयंती आहे. पंचायतन याग झालेला आहे. अनेक वैदिक मंडळी या ठिकाणी आली होती. वैदिक मंडळींच्या समुदायाचे नुसते दर्शन झाले तरी पापनाश होतो.

**दुरितांचे तिमिर जावो ।**

ज्ञानराज प्रार्थना करताहेत. वैय्यक्तिक, सामुदायिक दुरित वाढत चालले आहे. ते दुरित गेल्याशिवाय 'जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात ।'

हे राज्यशासनही करू शकणार नाही. 'जो जे वांछिल तो ते लाहो। प्राणिजात' ही जी भूमिका आहे, हे जे फल आहे ते प्राप्त करून देणे राज्यशासनाला तरी शक्य आहे का? चाळीस पन्नास वर्षांचा हा अनुभव आहे.

तेव्हा सुख मिळाले पाहिजे, दु:ख दूर झाले पाहिजे, असे मंगल प्रसंग पहायला मिळाले पाहिजेत. त्या पहाण्याचाही आपल्या बुद्धिवर परिणाम होतो. त्याला कल्याण म्हणतात. या कल्याणाची इच्छा संत महात्म्यांनी केलेली आहे आणि करताहेत ते. त्याप्रमाणे सर्वांचे कल्याण भगवान् कृपेने व्हावे आणि सर्वांच्या अंत:करणामध्ये शास्त्र, वेद त्याचप्रमाणे ईश्वराबद्दल सद्भक्ती सद्भावना निर्माण व्हावी अशी सर्वसाक्षी सर्वधि-प्रेरक परमेश्वराजवळ प्रार्थना करून हे शेवटचे भाषण आटोपतो.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।**

□□



# परिशिष्टे

## १
## परमेश्वरी अवताराचे कार्य

**(प. पू. श्रींनी आशीर्वादपर केलेले प्रवचन - श्रीदत्त आश्रम, जालना)**

**परित्राणाय साधुनां विनाशायच दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ।।**

भगवंतांची प्रतिज्ञा आहे. धर्मराजासारख्या धर्मशील महात्म्याचे रक्षण करण्याकरता भगवंतांचा अवतार झाला. त्यांना धर्माचरण न करू देणारे, विरोध करणारे जे आहेत त्यांचा विनाश करायचा, त्यांना जिवंत ठेवायचे नाही. क्षमा नाही. आणि त्या रूपाने धर्माची स्थापना करायची. हे भगवंतांचे अवतार कार्य त्यांनी स्वत:च सांगितले आहे.

धर्म हा कांही दिसणारा नाही. धर्म अधर्म शास्त्राने सांगितले आहेत. शास्त्र म्हणजे ईश्वराची वाणी आहे या शास्त्रद्वाराने आपल्याला धर्माधर्माचे ज्ञान होते. आणि तसेच ज्ञान धर्मशील महात्म्यांच्या आचरणावरूनही होते. शिष्टाचार हेही एक प्रमाण स्मृतीकारांनी दाखविलेले आहे.

धर्मराज हे धर्मशील होते म्हणून गोपालकृष्णांचे त्यांच्यावर पहिल्यापासून प्रेम होते. धर्मराजालाच राजा करायचा असा त्यांचा

निश्चय झालेला होता. धर्मराजांचीही निष्ठा तशीच होती. शेवटपर्यंत धर्माचरण करायचे. संयमी राहून, तितिक्षासंपन्न राहून, सर्व सहन करून धर्म विरोधी आचरण कधीही न करता वागायचे. त्यामुळे द्रौपदी, भीम यांनासुद्धा फार वाईट वाटत होते. द्रौपदीनेही त्यांना वारंवार सांगावे, 'तुमच्या धर्मांचा उपयोग काय झाला? धर्माचे फळ या काळात मिळत नाही असं मला वाटायला लागलंय. फळ देणारा ईश्वर, आहे की नाही असं मला वाटतय.' असं तिने बोलून दाखवावं.परंतु धर्मराजांची धर्माचरणाबद्दल इतकी निष्ठा होती की त्यांनी सांगावे, ''द्रौपदी, धर्माचरण करून कांही फळ माझ्या पदरात पडावे अशा इच्छेने मी धर्माचरण करीतच नाही. कांही फळ मिळवण्यासाठी धर्माचरण करणं हा धर्माचा व्यापार केल्यासारखा आहे. तेव्हा ही ईश्वराची आज्ञा समजून धर्माचरण करायचे आहे'' त्यामुळे श्रीकृष्णांचे त्यांच्यावर अत्यंत प्रेम होते. सर्व देवतांचे प्रेमही त्यांच्यावर होते. म्हणून यमधर्मांनी त्यांची यक्षरूपाने परिक्षा पहाण्यासाठी प्रश्न विचारले आणि धर्मराजांनी आणि योग्य उत्तरे देऊन चारही भावांना जिवंत केले. हे धर्माचे सामर्थ्य आहे.

गोपाळकृष्णही त्या करताच अवतार घेऊन आलेले होते. धर्मराज्य व्हायला पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. आणि भारतवर्षामध्ये असे धर्माचरण करणारे संत महात्मे सर्व काळात होऊन गेले आहेत.

आजही या ठिकाणी सौभाग्य संपन्न ताईमहाराजांचे धर्माचरण सर्वांच्या दृष्टीला पडले आहे. अनेक श्रद्धाळू लोकांना मार्गदर्शनही मिळते आहे. त्या प्रमाणे त्याचे फळही त्यांना मिळते.



हा पंचायतन देवतायाग हे त्याचेच उदाहरण आहे. पांच दिवसपर्यंत अनेक वेदशास्त्रज्ञ मंडळी या ठिकाणी आली. कर्माचरण हे ईश्वराने करायला सांगितले. ते जर अशा रीतीने मन:पूर्वक झाले तर त्याचे फळही ईश्वराकडून अवश्य मिळते. श्रीदत्त आश्रम हे एक स्थान या ठिकाणी निर्माण झाले आहे घरामध्ये आपल्याला इतका अवसर मिळत नाही, शांती व समाधान मिळत नाही त्या दृष्टीनेही का होईना अशा स्थानामध्ये येऊन नामस्मरण करणं, भजन करणं शक्य होईल असे एक केंद्र जालन्यामध्ये निर्माण झाले आहे. या ठिकाणी भगवंतांच्या चरित्राचे चिंतन झाले.

धर्माचरण ही मोठी भगवत् भक्ती आहे. ईश्वराच्या आज्ञेचे पालन करायचे. त्याच्या फळाकडे लक्ष द्यायचे नाही. राज्य गेले म्हणून ईश्वर विरुद्ध आहे अशीही कल्पना नाही. जे कांही ईश्वराने सांगितले असेल ते संयमाने राहून करायचे ही भूमिका अजातशत्रू धर्मराजांची होती त्यामुळे त्यांना भगवंतांचे सहाय्य झाले. सर्व बंधूही अनुकूल झाले सर्वांनाही फलप्राप्ती झाली.

तेव्हा आज हा याग समाप्त झालेला आहे. संध्याकाळच्या वेळेला चित्ताला समाधान देणारे कार्यक्रम आयोजित केले होते. अशा प्रकारची वैयक्तिक सामुदायिक सत्कर्म घडत राहिली तर कांही तरी ईश्वर कृपेने सर्वांना समाधान प्राप्त होणार आहे. ईश्वराचे भजन सर्वांनी करावे अशी संत महात्म्यांची इच्छा आहे.

**'भजिजो आदिपुरूषी अखंडीत।'**

असे मागतो मागताहेत ज्ञानराज, सर्व सुखं मिळू देत, कोणीही

दु:खी राहू नये. पण त्या आदिपुरुषाला कधी विसरू नये. कृतज्ञ राहिले पाहिजे. हे देवाजवळच त्यांनी मागितले आहे. संत महात्म्यांचे हे मोठे कार्य आहे.

त्या प्रमाणे आज हा मोठा समारंभ पूर्ण झालेला आहे. या समारंभात सर्वांनाही निरनिराळ्या दृष्टीने मार्गदर्शन झालेली आहे, पुण्यकर्मांचे दर्शन झाले. पुण्यकर्म कसे आहे याची प्रत्यक्ष माहिती जरी आपल्याला नसली जिज्ञासू बुद्धीने त्याचे ज्ञानही करून घेता येते अशा ठिकाणी. सर्व देवतांचे आवाहन झाले. सर्व दृष्टीने उपकारक अशा प्रकारचे पुण्यकर्म या ठिकाणी घडून आलेले आहे. इथल्या तन मन धनाने सहाय्य करणाऱ्या मंडळींचे पुष्कळ सुकृत आहे, ईश्वराची त्यांच्यावर कृपा आहे. म्हणून अशा सर्व मंडळींच्या सहाय्याने, भाग्याने अशा प्रकारचे कार्य पार पडलेले आहे. यामुळे सर्वांनाही सद्बुद्धि उत्पन्न व्हावी, आणि अशीच सत्कर्म वारंवार होऊन सर्वांचा पापक्षय व्हावा, ज्ञानराजांनी सांगितल्याप्रमाणे पापक्षय झाल्यानंतर सुखलाभ होणार आहे, तेव्हा भगवान महाविष्णु इतरही त्यांच्या परिवार देवता या सर्वांच्याही कृपेने सर्वांच्या मनामध्ये सद्बुद्धि राहावी, सद्वासना निरंतर राहावी, आणि त्याप्रमाणे ईश्वराची आज्ञा पालन करण्याकरता म्हणून त्यांच्याकडून निरंतर सत्कर्म घडावीत म्हणजे रामराज्य व्हायला कांही वेळ लागणार नाही अशी प्रार्थना विश्वरूपी परमेश्वराजवळ करून हे निवेदन संपवतो.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त ॥**



## २
## ईश्वराचे स्वरूप--काही विचार

**प. पू. श्रींनी श्रीदत्त आश्रम जालना येथे केलेले प्रवचन**

ज्ञानेश्वर महाराजांनी जगाच्या उद्धारा करता काय उपकार करून ठेवलेले आहेत हे ज्ञानेश्वरीचा आदराने अभ्यास करणाऱ्या, चिंतन करणाऱ्या मंडळींपासून आपल्याला समजून येते. नित्य वाचन असावे. वाचलेलंच वाचावं, चिंतन केलेलं करावं. त्या चिंतनाचा संस्कार आपल्या चित्तावर झाला पाहिजे.

भगवान् सर्वज्ञ आहे आणि सर्वशक्ती संपन्न आहे, ही संतांना जाणीव आहे. त्यामुळे चिंता करण्याचे कारणच नाहीये ना! आपण इच्छा केल्यानंतर भगवंतांनी आपल्याला दिलं किंवा न दिलं तर आपली चित्तवृत्ती बिघडून जाईल. इतकी मी सेवा करतो, इतकी भक्ती करतो पण देवाचे माझ्याकडे कांही लक्ष नाही, असेही वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्यांच्या मनामध्ये भगवान् सर्वज्ञ आहेत ही भावना आहे त्यांना खात्री असते की सर्व त्याला कळते, आपण सांगायलाच पाहिजे असे नाही. "तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥" नाथमहाराजांनी सांगितले आहे. सर्वही विश्वाचं संरक्षण करणाऱ्या परमात्म्याला किती मोठं ज्ञान असलं पाहिजे! किती विशाल बुद्धि असली पाहिजे! ही एक भावना फार मोठी आहे. सर्वज्ञ आहे परमात्मा आणि सर्वज्ञ असून सर्व शक्ती संपन्न आहे. सगळी शक्ती आहे प्रारब्धभोग जरी विरुद्ध असले तरी त्याच्या कृपेने ते दूर होतात, अनुकूल होतात. अशी त्याची शक्ती आहे.

म्हणून संत महात्म्यांच्या चरित्रावरून आपल्याला हे सगळे समजून येते. त्यांची भावना कशी आहे आणि त्या भावनेप्रमाणे त्यांचे मनोरथ कसे पूर्ण होतात हेही आपल्याला ह्यावरून दिसून येते. आणि आपल्याही मनामध्ये तशा प्रकारची वृत्ती उत्पन्न होते.

ईश्वर स्वरूपाचे ज्ञान तीन प्रकाराने होते असे भगवान गीतेमध्ये सांगतात.

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोक महेश्वरम् ।**
**सुहृदं सर्व भूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ।।**

ईश्वर कसा आहे हे तीन प्रकाराने समजून घ्यावे असे भगवान् म्हणतात. भारत वर्षामध्ये कर्मयोग अखंड चालू आहे. वेदाध्ययन, शास्त्राध्ययन हे त्याकरता आहे, आचरण करण्याकरता आहे. या सर्वही कर्मांचा भोक्ता परमात्मा आहे. ही जाणीव पाहिजे. भरत राजा मोठा ज्ञानसंपन्न होता, ईश्वरभक्त होता. त्याने अनेक यज्ञयाग करावेत परंतु त्या यज्ञाच्या देवता ह्या परमेश्वराचे अंश आहेत अशी त्याची भावना होती विशिष्ट एक देवता वगैरे असा कांही संबंध नाही. अनेक देवता अशा यज्ञकर्मात असतात. त्या सर्वही देवता विश्वरूपी परमेश्वराच्या स्वरूपांतर्गत आहेत. त्यांच्यापासून आपल्याला सर्व भोग मिळणार आहेत. कर्म करणाराही त्याच्या स्वरूपामध्ये अंतर्गत आहे. म्हणजे कर्मनुष्ठान करतानासुद्धा सर्व यज्ञकर्माचा भोक्ता परमात्मा ही भावना अंत:करणामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. आहे. 'मी कर्ता आहे', अशी भावना असेपर्यंत भोक्ता परमात्मा आहे ही भावना होणार नाही. कर्ता एक आणि भोक्ता दुसरा, असे कसे



असू शकेल? जो कर्ता तोच भोक्ता असणार. म्हणून कर्तृत्व भावनाही गेली पाहिजे. म्हणजे कर्मबंधन नाही.

**ऐसा कर्तृत्वाचा मदु । आणि कर्मफळाचा आस्वादु ।**
**या दोहोंचेही नांव बंधु । कर्मासाठी ।**

नाथमहाराज म्हणतात. मी कर्ता ही भावना सोडणे म्हणजे परमात्माच भोक्ता आहे ही जाणीव निर्माण होणे. कर्ताही तोच आहे. कर्तृत्व बुद्धि त्याच्याच कृपेने उत्पन्न होते म्हणजे खरे कर्तृत्व त्याचेच आहे. ही भावना हवी.

**त्यानंतर, 'सर्वलोकमेहश्वरम्.'**

ब्रम्हादिक देवांचाही ईश्वर आहे. परमेश्वर आहे. तो नियामक आहे. सर्वांची बुद्धि नियंत्रित करणारा परमात्मा आहे हे ज्ञान पाहिजे.

आणि तिसरी भावना जी आहे ती भक्तीयागाची! भक्तीयोग सर्व संतांच्या मनामध्ये उत्पन्न झाला त्याला कारण आहे. 'सुहृदं सर्व भूतानां' म्हटलंय. भगवान् सर्वही भूतांचा सुहृद आहे. 'सुहृद्' याचा अर्थ भगवान् आचार्य महाराजांनी केलेला आहे -

**प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम् ।**

माझी पूजा करावी. मला चांगले म्हणावे, माझी स्तुती करावी असे झाले की मग काही तरी उपकार करायचा, हा व्यवहार झाला. पण ईश्वराला प्रत्युपकाराची अपेक्षा नाही. काय मागेल ते द्यायचे. सकाम असतील त्यांची कामना पूर्ण करायची निष्कामांची योग्यता अधिकाधिक वाढवायची. त्या बद्दल कांहाही अपेक्षा नाही.

परमात्मा सर्वज्ञ आहे, सर्व शक्तीसंपन्न आहे आणि निरपेक्ष

आहे. हे जर ईश्वर स्वरूपाचे ज्ञान झाले तर पूर्ण शांती प्राप्त होते. त्या करता भक्तियोग आहे. काहीही द्यायचे नाही. देवाला कांहाही लागत नाही. सर्वांचा तो सुहृद आहे. आपल्यावर परत उपकार करावेत, आपला लोकांनी मान-सन्मान करावा अशी त्याला कांहीही अपेक्षा नाही. म्हणून सर्व संत महात्म्यांची भगवंताची भक्ती करण्याकडे नैसर्गिक प्रवृत्ती आहे. तर हा भक्तीयोग समजावून सांगणे हेही अधिकारी पुरूषांचे काम आहे. ज्यांचा ज्ञानेश्वरीचा अखंड व्यासंग आहे, त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांच्या, ईश्वराच्या प्रसादाने ज्यांच्या बुद्धीमध्ये ज्ञानेश्वरीचा (गीतेचा) सगळा भावार्थ प्रकाशित केलेला आहे. तो त्यांना समजून येऊ लागतो. ज्ञानेश्वरीला भावार्थ दीपिकाच म्हटलेले आहे. श्रद्धेने, आदराने त्याचे चिंतन, मनन झाल्यानंतर तो कळून येतो. असा व्यासंग करणारी श्रद्धाळू मंडळी आहेत.

जे संत महात्मे आहेत ते खरा लोक संग्रह करू शकतात. 'लोक संग्रहाकरता तुला कर्म केले पाहिजे,' असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले. ते पुढे म्हणतात, ''मी करतो. वास्तविक मला कांही आवश्यकता नाही.'' तर तो खरा लोक संग्रह म्हणजे कुमार्गाकडे झालेली प्रवृत्ती बदलणे. सन्मार्गाकडे प्रवृत्ती करणे. हा लोकसंग्रह करण्याची योग्यता संत महात्म्यांच्या चरित्राचे उत्तम प्रकाराने, आदराने चिंतन ज्यांच्याकडून घडलेले आहे, अशा महात्म्यांच्या मुखातून आपल्याला समजली पाहिजे. म्हणजे आपल्या चित्तावर चांगले संस्कार होतील. असे झाले तर आपल्यावर ईश्वराची कृपा झाली असे समजयला हरकत नाही.

**।।अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।**



## ३

## अर्जुनाचा मानसिक गोंधळ

**प. पू. श्रींनी श्रीदत्त आश्रम, जालना येथे केलेले प्रवचन**

अर्जुनाने गीतेच्या पहिल्या अध्यायात स्वत:चा बुद्धिवाद मांडला. हे आप्तेष्टांना मारणे पापकर्म आहे आणि या पापकर्मामुळे मला नरकाला जावे लागेल, वगैरे विचार त्याने मांडले. हे सर्वही विचार व्यास महर्षिंनी महाभारतात भगवत् गीतेच्या रूपाने लिहून ठेवले आहेत. त्याच्या नंतर भगवत गीतेची भावार्थ दीपिका म्हणून ज्ञानेश्वरी लिहिली गेली. आपले सद्गुरू निवृत्तीनाथ हेच लेखन करीत आहेत असे ज्ञानराज सांगतात. अलौकिक कार्य जरी झाले तरी ते सर्व विसरून जाणं, ते सद्गुरूंना अर्पण करणं, म्हणजे कर्तृत्व सगळं सद्गुरूंना देणं हे मोठे कार्य आहे त्याशिवाय ते कसे होणार?

मराठी भाषेमधल्या या ग्रंथात भगवत् गीतेचा भावार्थ सगळा सांगितला आहे. तरीसुद्धा त्याचा अभ्यास केल्यावाचून कांही लक्षात येणार नाही. मराठी भाषा आहे. आपण वाचू शकतो. पण ज्ञानेश्वरांचा अभिप्राय काय आहे हे समजून घ्यायला पुष्कळ वाङ्मय तप केले पाहिजे. या ठिकाणी रोज कर्मयोग चालू आहे. पण त्याच्या बरोबर भक्तीयोगही आहे. प्रत्येक कर्म करताना 'यस्य स्मृत्याचः नामोक्त्या तपः पूजा क्रियादिषु न्यूनं संपूर्णतां यांति'......

असे शेवटी म्हणतात. म्हणजे नुसत्या स्मरणानेसुद्धा कर्माची पूर्तता होते. प्रत्येक कर्मामध्ये भक्तीयोग हा अंतर्भूत आहे.

संध्याकाळच्या या कार्यक्रमात संत महात्म्यांचे विचार काय आहेत हे ऐकायला मिळाले आणि आपल्या मनाची परिस्थिती कशी होऊ शकते, मनाचा गोंधळ कसा उडू शकतो याची कल्पना आली अर्जुनाचा गोंधळ कसा झाला, आणि त्यातून कोणी त्याला बाहेर काढला हे त्या गीतेच्या शेवटी आहे.

**करिष्ये वचनं तव।**

हे मान्य केले. तुमची आज्ञा मला मान्य आहे. मला आतां विचार करायचा नाही. मी विचार करू शकतच नाही. पहिल्या अध्यायात त्याने बुद्धिवाद मांडला. आपल्या मनाची भ्रांत अवस्था दाखिवली. परंतु दुसरा अध्याय सुरू झाल्या नंतर त्याने म्हटले,

**'शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम्'**

मला कळत नाही देवा. माझ्या बुद्धीला कल्याणाचा मार्ग कोणचा आणि अकल्याणाचा कोणचा हे समजणे अवघड होऊन बसले आहे'. अगोदर त्याने पुष्कळ बुद्धिवाद मांडला. पण ज्या वेळेला, 'मला कांही कळत नाही' असे म्हणून जेव्हां तो भगवंतांना शरण गेला त्या वेळेला गीता ज्ञानाच्या उपदेशाला आरंभ झाला आहे. त्याला आता वर काढायचे देवांनी ठरविले.

ज्ञानराजांची ज्ञान भूमिका पूर्ण आहे. मनांत कोणचीही वासना नाही. इच्छा नाही कांही नाही. सर्व लोकांचे कल्याण व्हावे अशा प्रकारचीच इच्छा आहे. संतांचा तो स्वभावच आहे. त्यामुळे निवृत्तीनाथांनी आज्ञा केली आणि ज्ञानराजांनी निवृत्तीनाथांकडे



कर्तृत्व देऊनच ज्ञानेश्वरीची रचना केली. विवेक, विरक्ती उत्पन्न होणे, अहंकाररहित मन होणे ही सगळी साधनं आहेत. या साधनांचा जेव्हा आपल्याकडून अभ्यास होईल त्या वेळी अशा ग्रंथांचे विशेष ज्ञान आपल्याला होईल. अभ्यास झाल्यावर ज्ञानराजांचा भावार्थ आपल्याला कळून येईल आणि मनाला शांती प्राप्त होईल.

तेव्हा इथे विष्णुयागाच्या निमित्ताने कर्मांतर्गत भक्तीरूप यज्ञ चालू झालेला आहे. मोठी मोठी शास्त्रज्ञ मंडळी या यज्ञाकरता सहाय्य करताहेत. सौ. ताई महाराजांचेही इकडे पूर्ण लक्ष आहे, या यज्ञामधे असा एक ज्ञानयज्ञ या निमित्ताने घडून आला. ज्ञानेश्वरीचे सामान्य रूप आपल्याला आज कळलेले आहे. जास्ती अभ्यास करायला पाहिजे. अधिकारी महात्म्यांच्या वाणीतून ते ऐकले म्हणजे आपल्याला विशेष बोध होतो. अशी वाणी पाहिजे. लोकांना हे रहस्य समजून यावे आणि त्यांचेही कल्याण व्हावे अशी प्रार्थना करून त्यांना हा यज्ञाचा प्रसाद देतो.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।**